पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : २ । अंक ११ वा । मराठी पाक्षिक । मूल्य : २५। दिनांक १६ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२०


# इतिहास उकरायचा की घडवायचा ?





प्रो. सुखदेव थोरात

**फक्त वाद नको, तर गरिबाभिमुख वाद आणि प्रशासन हवे**


जयदेव डोळे

**'मूकनायक' विरुद्ध मौनव्रत**


देविदास तुळजापूरकर

**कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे?**


With Best
Compliments
Sos. Agrotech Pvt.Ltd

पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : २ ।
अंक ११ वा । मूल्य : रु. २५ । दिनांक १६ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२०

**संपादकीय :** इतिहास उकरायचा की घडवायचा? ५

इराण विरूद्ध अमेरिका – **विजय नाईक** ७

अमेरिका–इराण संघर्षाचे सामरिक परिणाम – **डॉ. विजय खरे** १२

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शंभर वर्षांपूर्वीचे मूकनायक – **डॉ. हरिश्चंद्र निर्मळे** १४

'मूकनायक' विरूद्ध मौनव्रत – **जयदेव डोळे** २०

कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे? – **देविदास तुळजापूरकर** २३

फक्त वाढ नको, तर गरिबाभिमुख वाढ आणि प्रशासन हवे – **प्रो. सुखदेव थोरात** २८

जेएनयूवरच सतत हल्ला का होतो? – **सुरेश गायकवाड** ३१

जेएनयूवरील हल्लाः वैचारिक लढाई कसली, ही तर हिंसाच – **प्रा. मिलिंद आवाड** ३४

टोपियाँ बदल गई, पर कुर्सियाँ वही है – **डॉ. सूर्यनारायण रणसुभे** ३६

**व्यक्तिविशेष :** डॅशिंग राजकारणी मात्र साधी राहणी : ममता बॅनर्जी – **प्रकाश खंडेलोटे** ३८

**ग्रंथपरिचय :** खंडित महाराष्ट्राची व्यथा : माझी मैना गावावर राहिली! – **प्रा. डॉ. सोमनाथ कदम** ४०

**आजकालचे प्रश्न :** **पंक्चरवाला** ४२

**ग्रेट थॉट्स :** ४५

**कविता :** हम देखेंगे – **फैज** ४६

**कोण काय बोलतं :** ४७

**● संपादक**
चेतन शिंदे

**● मांडणी व सजावट**
सचिन ओव्हाळ

**● संपादकीय पत्रव्यवहार**
श्री गणेशसाई बिल्डींग फ्लॅट नं.८०२
जनरल अरूणकुमार वैद्य मार्ग, वडाळा
(पूर्व) मुंबई – ४०००३७

**● संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)

*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी
संपादक सहमत असेलच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२

**● जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२

**● वर्गणीदारांसाठी संपर्क**
**महाराष्ट्र / मुंबई :**
**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**मुंबई / कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२

● वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460




## सीएए विरोधातील अंक आवडला

*सरकार देशावर नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (एनआरसी) हे दोन्ही कायदे लादण्यासाठी केंद्र सरकार दबावाचे राजकारण करीत आहे. त्यामुळे देशभरात सर्वत्र या कायद्यांच्या विरोधात चित्र दिसते. या अनुषंगाने १ जानेवारी ते १५ जानेवारीच्या अंकात प्रसिद्ध झालेले लेख वाचनीय आणि वस्तुस्थितीवर बोट ठेवणारे होते. 'खूने दिल मे डुबो ली है उंगलिया मैंने' हे संपादकीय, 'इशान्येतील राज्यांवर दुसरा आघात : आता हिंदूंचे तुष्टीकरण' हा विजय नाईक यांचा लेख, 'सीएएविरोधी आंदोलनाने मिळतेय भाजपच्या राजकारणाला खतपाणी' (दिलीप मंडल), 'त्या हिंसाचाराला जबाबदार कोण?' (भीमराव बनसोड), अलिगढ मुस्लिम विद्यापीठात पोलिसी अत्याचाराचा लेखाजोखा मांडणारा 'विद्यापीठात पोलिसांचा धुडगूसः मानवी हक्कांची पायमल्ली' या शीर्षकाचा अहवालवजा लेख इत्यादी लेख सरकारच्या दबावाच्या राजकारणाचा निषेध करणारे असल्यामुळे आम्हाला आवडले. 'आजकालचे प्रश्न' सदरातील अस्वस्थ मनाची गर्दी आणि इतर लेखही चांगले होते.*

**– सुषमा एस. पाटील,** मुंबई

## 'त्या' भाषणाचा अनुवाद प्रा.नागार्जून वाडेकर यांचा

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात विद्यार्थ्यांनी केलेल्या ऐतिहासिक आंदोलनात राष्ट्र, राष्ट्रवाद, सरकार या विषयावर डॉ.गोपाळ गुरू यांनी केलेल्या भाषणाचा अनुवाद १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२० च्या अंकात 'राष्ट्र म्हणजे काय?' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला आहे. हा अनुवाद प्रा.नागार्जून वाडेकर यांनी केलेला आहे. प्रसिद्ध झालेल्या भाषणात प्रा.नागार्जून वाडेकर यांचे नाव छापायचे अनवधानाने राहून गेले आहे, त्याबद्दल क्षमस्व. **– संपादक**

## भाजप समाजाला मागे नेण्याचे काम करतेय

*'अस्वस्थ मनाची गर्दी', 'भूत हटवणार...भूत बघणार' आणि 'पक्ष काढणार नाही तो आळशी' हे १ जानेवारी ते १५ जानेवारीच्या अंकात 'आजकालचे प्रश्न' मध्ये प्रसिद्ध झालेले लेख वाचनीय होते. विशेष म्हणजे, 'भूत हटवणार...भूत बघणार' हे टिपण भाजपची मंडळी अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे काम जोरदारपणे कसे करीत आहेत यावर प्रकाश टाकणारे आहे. उत्तरप्रदेशातल्या बनारस विद्यापीठानं भूतबाधा संपवणारा एक अभ्यासक्रम सुरू करण्याचं ठरवलं आहे. यावर हे टिपण आहे. भूतबाधा ही मुळात अंधश्रद्धा पसरवणारी बाब आहे. त्यामुळे त्याचे समर्थन करणाऱ्यांना आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात वेडात काढले जाते. तरीही बनारस विद्यापीठ भूतबाधा संपवणारा अभ्यासक्रम सुरू करून समाजाला मागे नेण्याचे काम करीत आहे.*

**– किरण बारुळे,** पुणे

## विचार करायला लावणारे लेख

*'द पीपल्स पोस्ट'चा मी नियमित वाचक आहे. यामधील सर्वच लेख वाचनीय आणि म्हणून विचार करायला लावणारे आहेत. अंकाची मांडणी आणि बांधणीही सुबक आहे. द पीपल्स पोस्ट उत्तरोत्तर अशीच प्रगती करीत राहो, ही सदिच्छा.*

**– धनराज भगत,** माजी सैनिक, पालघर

## विद्येच्या प्रांगणात पोलिसांची झुंडशाही निषेधार्हच

*'विद्यापीठात पोलिसांचा धुडगूस : मानवी हक्कांची पायमल्ली' हा १ जानेवारी ते १५ जानेवारीच्या अंकातील लेख वाचून मन सुन्न झाले. अलिगढ मुस्लिम विद्यापीठाला उत्तरप्रदेश पोलिसांनी कसं युद्धभूमी बनवलं यांचा लेखाजोखा मांडणारा कारवा-ए-मोहब्बत आणि इंडियन कल्चरल फोरम यांचा हा तथ्यशोधन अहवाल पोलिसांच्या झुंडशाहीवर प्रकाश टाकणारा होता. विद्यापीठात विद्यार्जनासाठी देशभरातून येणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना पोलिसांच्या दंडेलशाहीचा अनुभव घ्यावा लागणं, हे खूप वाईट आहे. एरवी या विद्यापीठात विद्यार्थ्यांची आंदोलनं झाली तर विद्यापीठातील प्राध्यापक पुढाकार घेऊन ती मिटवीत; परंतु यावेळी सीएए, एनआरसीवरून झालेल्या आंदोलनानंतर कानपूर पोलिसांनी विद्यापीठात घुसखोरी करून विद्यार्थ्यांना मारहाण केली; विद्यार्थ्यांसह विद्यार्थिनींनाही वसतिगृहातून बाहेर काढून टाकून त्यांना टाळे ठोकण्यात आले. अलिगढ मुस्लिम विद्यापीठातील पोलिसांची दंडेली निषेधार्हच आहे.*

**– प्रकाश के. वाघमारे,** औरंगाबाद

**सूचना** अंकाविषयी आपण पाठवलेल्या प्रतिक्रियांचे जरुर स्वागत आहे. संपर्क : 'द पीपल्स पोस्ट' सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१ ई-मेल : thepeoplespost2014@gmail.com

# इतिहास उकरायचा की घडवायचा?

खरं तर मराठी माणसाला महाराष्ट्रात जन्माला आलेल्या आणि महाराष्ट्र घडवणाऱ्या महानायकांविषयी पुन्हा पुन्हा काही सांगावं अशी स्थिती अजून तरी नाहीय. या महानायकांचं स्मरण तो सातत्यानं करत असतो. आपल्या जगण्यामध्ये महानायकांना तो समाविष्ट करत असतो. आम्ही महात्मा फुले, सावित्रीबाई आणि भीमाची लेकरं असं तो आनंदानं सांगत असतो. आम्ही शिवबाचे मावळे असं म्हणत तो पोवाडे लिहितो. सामाजिक जीवनात राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची सावली घेऊन तो जगत असतो. शाहू महाराजांनी घडवलेल्या क्रांतिकारी सामाजिक सुधारणांमुळे तो स्वतःचा विकास घडवत असतो. अशीच गोष्ट अन्य महान माणसांच्या बाबतीतही आहे. मग ते कर्मवीर भाऊराव पाटील असतील, कॉ. अण्णा भाऊ साठे असतील, आगरकर असतील किंवा विठ्ठल रामजी शिंदेही असतील. छत्रपती शिवाजीराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि बाकीच्यांनी ते घडवण्याचे कार्य केले. हा झाला इतिहास. आता वर्तमानामध्ये काही जण त्यावरून वाद निर्माण करत आहेत आणि काही जण हळवे बनून, त्यातही काही राजकारणी हळवे बनून वादावर स्वार होत आहेत. महाराष्ट्राची दैवतं बनलेल्या महापुरुषांविषयी काहीही चुकीचं बोललं, लिहिलं गेलं तर महाराष्ट्र ते स्वीकारत नाही. एकदम भावनाप्रधान होतो. रस्त्यावर उतरतो. ही गोष्ट काही जणांना ठाऊक असल्यानं तो काही तरी निमित्त काढतो आणि समाजाला हळवा, भावनाप्रधान, उद्रेकाला उत्तेजन देणारा असा बनवण्याचा प्रयत्न करतो.

गेल्या काही दिवसांत इतिहासाच्या नावानं बरंच काही तरी घडतंय. खरं तर ते घडवलं जातेय की काय, असं विचारायलाही खूप वाव आहे. तसं नसतं तर 'आज के शिवाजी मोदी' हे पुस्तक आलंच नसतं. दोन-चार दिवस रान उठवून आणि महाराष्ट्रातील जनतेला अस्वस्थ करून ते मागंही घेतलं गेलं नसतं. पण संघपरिवारातील लोकांना आपल्या नेत्यांना दंतकथा, अवतारकथा यातील ---- जोडून घेण्याची सवय आहे. म्हणून त्यांचा गणपती खुलेआम दूधही प्यायला लागला होता. मोदींनी एकहाती सत्ता मिळवून दिली म्हणून की काय त्याचं रूपांतर देवात करण्याची घाई अनेकांनी केली. त्यांच्या नावाचं आणि आडनावाचं संक्षिप्तीकरण करून 'नमो' बनवण्यात आलं. एकीकडे भारताची चंद्रावर जाण्याची वैज्ञानिक तयारी आणि दुसरीकडे सत्ता मिळवली म्हणून मोदींचा



'नमो' करण्याची तयारी. नमो म्हणजे वंदन; पण वंदनापुरतीच ही गोष्ट राहिली नाही. त्यांना कुणी तरी अवतार कल्पनेत जागा दिली. त्यांना विष्णूचा अवतार बनवला. राजकारणात निवडणुका जिंकणे ही अवतार बनण्याची पात्रता कशी होते हे अजून भल्याभल्यांना कळलं नाही. उद्या सत्तेवरून दूर गेल्यावर मग काय अवतारातून बाहेर काढणार? अवताराची खूप चर्चा झाली. अवताराच्या मालिकेत भरपूर जागा शिल्लक आहेत. आरक्षण करावं लागत नाही. कुणाची परवानगी घ्यावी लागत नाही. त्याचा पासवर्ड, कोडवर्ड किंवा एटीएमचं कार्ड असत नाही. कुणीही कोणालाही अवतारात घुसवून नंबर देऊ शकतो. आपल्याला अवतारात ढकललं जातंय हे चांगलं की वाईट यावर मोदींनी कधी भाष्य केलं नाही किंवा माझी जागा सरदार पटेलांना द्या, असंही म्हटलं नाही. अवतारानंतर गाडा एकदम देवाकडं सरकत म्हणजे मंदिराकडं सरकला. म्हणजे मंदिराकडं सरकावला. मंदिराचं उद्घाटन कधीही कोणत्याही क्षणी होणार होते. कुठून काय झालं ठाऊक नाही; पण मोदींनी या मंदिराला म्हणजे आपल्या मंदिराला विरोध केला. पण मंदिराची जागा अजून आहे. मूर्ती आहे. पंचप्राण भरलेली मूर्ती अशी उगीचच बाजूला ठेवता येत नाही. कधी ना कधी ती पूजेला घ्यावीच लागते आणि कुणाला तरी पुजारी बनवून रोजगार द्यावाच लागतो. हे सगळं सुरू असतानाच कुणी तरी संघसेवकांनी मोदींचा इतिहासच लिहून काढला. अर्थात, वास्तववादी नव्हे तर सुखावणारा आणि मते मिळवणारा इतिहास. मोदी म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज 'दोन'. दुसरे शिवाजी म्हणजे मोदी. छत्रपती आणि मोदी यांची तुलना कशी करायची? तुलनेसाठी काय वापरायचं? याचा विवेकही लेखकानं बाळगला नसावा. महाराष्ट्रभर आणि देशभरही वातावरण तापायला लागलं. तेव्हा मात्र पुस्तक मागं घेण्यात आलं. या घटनेनंतरही मोदींनी मौन पाळणंच पसंत केलं. पंतप्रधानांना पत्र लिहिलं की राष्ट्रद्रोहाचा




गुन्हा नोंदवून तो मागं घेतल्याची घटना अगदी अलीकडेच घडलीय. त्यावेळीही मोदी काही बोलले नाहीत. ही मालिका पुढं पुढं गेली. मोदींची वेशभूषा बदलून त्यांचा छत्रपती शिवाजीच करण्यात आला. अमित शाहांचा तानाजी करण्यात आला. याबाबतचे व्हिडिओ व्हायरल करण्यात आले. पुन्हा गोंधळ, पुन्हा लोकांच्या भावना दुखावल्या आणि भडकल्याही. त्यातच पुन्हा कुणी तरी राजवंशाचा विषय काढला. मग पुन्हा भावना भडकल्या. आंब्यापासून पुत्रप्राप्तीचा दावा करणाऱ्या भिडे गुरुजींना बंद पुकारण्याची संधी मिळाली. मध्यंतरी कोणी फडणवीसांनी आम्हीच छत्रपतींचे मावळे आहोत असे रेटून सांगितले होते. आता फडणवीस मावळे कसे होतात हे भल्याभल्या इतिहासकारांनाही कळलं नाही.

भाजपमध्ये मुक्कामास गेलेल्या एका राजाने मग मूळ प्रश्नाला हात न घालता शिवसेनेत शिव शब्द का? एका नेत्याला जाणता राजा ही उपाधी का, असे प्रश्न विचारायला सुरुवात केली. खरं तर या प्रश्नांना फार काही अर्थ नव्हता. शरद पवारांनाही ठाऊक नसेल की त्यांना पहिल्यांदा कोणी, कधी जाणता राजा म्हटलं. एखाद्या समाजाभिमुख नेत्याला समाजच उपाधी देतो तेव्हा असे प्रश्नच निर्माण होत नाही. आपल्या नेत्याच्या कर्तृत्वावर फिदा होऊन यापूर्वीही समाजाने राजवंशाबाहेरच्या लोकांना उपाध्या दिल्या आहेत. मुद्दा नंबर दोन 'जाणता राजा' या शब्दात छत्रपती असा अर्थ निघतो का? कदाचित साताऱ्च्या शब्दकोशात निघतही असावा. एकूण काय तर इतिहासाचं हे प्रकरण असं पसरत राहिलं. ते थांबणार की नाही याबाबत साऱ्यांनाच शंका आहे.

अलीकडे आपण कशाचंही राजकारण करतो. त्याचं कारण जनतेच्या प्रश्नाला भिडण्याची, ते सोडवण्याची क्षमता आज-कालच्या राजकारणाने गमावली आहे. या पार्श्वभूमीवर इतिहासावर चर्चा करणं, वादविवाद रंगवणं सोपं जातं. विशेष म्हणजे, काहींना नायकही बनता येतं. लोकांचं जगणं हैराण करणाऱ्या प्रश्नाचं कोणी नावच काढत नाही. शेतकरी आणि बेरोजगार युवकांची आत्महत्या कशी थांबवायची? बंद पडणारे दवाखाने आणि शाळा कशा वाचवायच्या? पारदर्शी कारभार कसा करायचा? जनतेला जबाबदार कसं रहायचं यावर सत्ताधारी आणि विरोधकही चर्चा करत नाहीत. ती त्यांना परवडत नाही. कशाचंही राजकारण करण्याचं व्यसन यांना जडलंय. राजकारणाचे खरे विषय मागे पडत असल्यानं हे सुरू आहे. तसं घडलं तर मूळ प्रश्नांपासून लोकांचं लक्ष विचलित करता येतं. माणसं फूटपाथवर का झोपेनात, मरेनात का पण धर्मस्थळं उभारली पाहिजेत. स्मारकं उभी राहिली पाहिजेत. स्मारकांमध्ये उंचीची स्पर्धा लागली पाहिजे. स्मारक आवश्यक असतात. ती प्रेरणा देतात. हे मान्य करूनही प्रेरणादायी म्हणून स्मारकं बनवायची की राजकारणाला प्रेरणा मिळावी म्हणून, मतांच्या पेट्या गुंडाळण्यासाठी म्हणून बनवायची याचा विचार नेते करणार नाहीत, तर तो जनतेला करायला हवा. इतिहासाची निर्मीती शेवटी जनताच असते आणि तिनं जन्माला घातलेले महानायक असते. इतिहासाला वादग्रस्त बनवतं आणि मग पुढं वादाचंही राजकारण करतं. नेते कितीही इतिहास उकरोत पण जनतेने मात्र इतिहास घडवण्याचाच संकल्प केला पाहिजे. ●●●

# इराण विरुद्ध अमेरिका





विजय नाईक

**१९७९ मध्ये इराणमध्ये झालेल्या क्रांतीत अमेरिकाधार्जिणे राजे शाह मोहम्मद पेहलवी यांना पदच्युत केल्यामुळे इराण व अमेरिकेचे संबंध बिघडत गेले. अयातुल्ला खोमेनी यांनी फ्रान्समधून परत येऊन सत्तासूत्रे हाती घेतली व इराण अमेरिकेच्या वैमनस्याला धार चढली. त्यात भर पडली ती ४ नोव्हेंबर १९७९ रोजी इमामला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिम विद्यार्थी संघटनेने तेहरानमधील अमेरिकन दूतावासाला घेराव घातला त्यामुळे. इराणमधील कृतीला त्यांचा पाठिंबा होता. तब्बल ४४४ दिवस चाललेल्या या नाकेबंदीत अमेरिकन दूतावासातील ५२ राजदूतीया कर्मचारी अडकले होते. तेव्हापासून इराण व अमेरिकेचे राजदूतीया स्तरावरील संबंध संपुष्टात आले, ते आजतागायत पूर्ववत व सामान्य झालेले नाहीत.**

नव्या वर्षाची सुरुवात झाली तीच मुळी इराण विरूद्ध अमेरिकेच्या युद्धसदृश्य संघर्षाने. त्याची परिणीती काय होणार हे आत्ताच सांगता येणार नाही; परंतु इराणचे मेजर जनरल कासिम सुलेमानी यांच्यावर ड्रोन हल्ला करून त्यांना ठार केल्यावर त्याचा बदला घेण्यासाठी इराकमधील अमेरिकेच्या दोन सैनिक तळावर इराणने क्षेपणास्त्र हल्ला केल्यामुळे अमेरिका-इराणदरम्यान युद्धाचा भडका उडणार असे गंभीर चित्र निर्माण झाले. त्यापाठोपाठ अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील मोक्याच्या ५२ स्थळांवर हल्ला करण्याची धमकी दिली अन् मध्य वा पश्चिम आशियात कमालीचे तणावाचे वातावरण पसरले. राष्ट्राला उद्देशून ट्रम्प काय संदेश देतात याकडे जगाचे लक्ष लागले होते. सुदैवाने ट्रम्प यांना भान आले आणि इराणवर आणखी प्रतिबंध लादण्याची घोषणा करीत 'मी राष्ट्राध्यक्ष असेपर्यंत कुठल्याही परिस्थितीत इराणला अणुबॉम्ब बनवू देणार नाही,' असा इशारा त्यांनी दिला. आपल्या भाषणाच्या शेवटी मात्र त्यांनी सबुरीचा सूर लावला व इराण हा एक महान देश बनू शकतो. इराणने दहशतवाद व हत्याचक्र सोडावे, असा संदेश सुसंस्कृत जग त्यांना देत आहे, असे सांगितले. ते म्हणाले की, अमेरिकेला सैन्य वापरण्याची इच्छा नाही. इसिसचा मॉन्स्टर अबू बकर बगदादी याला आम्ही ठार केले. मेजर जनरल सुलेमानी यांचे 'जगातील सर्वोच्च क्रूर दहशतवादी' असे वर्णन करून, त्याला आधीच ठार करावयास हवे होते, असे ते म्हणाले. 'थश ुरपीं खीरप ीं हर्लींश र सीशरीं र्षीीींश,' अशीही पुष्टी त्यांनी जोडली. इराणच्या हल्ल्यात अमेरिकन व इराकी सैनिक ठार झाले नाहीत, असे त्यांनी जाहीर केले. याचा अर्थ, क्षेपणास्त्रे लादतांना त्याला अमेरिकेवर हल्ला केल्याचे स्वरूप येणार नाही, याची काळजी घेण्यात आल्याने युद्धाचा भडका उडाला नाही.

सुलेमानी यांच्या अंत्ययात्रेला झालेली लाखो लोकांची गर्दी, चेंगराचेंगरीत ५० च्यावर लोकांचे झालेले मृत्यू यावरून इराणमध्ये त्यांची लोकप्रियता व आदर दिसून येतो. तथापि, ट्रम्प यांच्या मते ते शेकडो अमेरिकन नागरिक व सैनिकांच्या मृत्यूला जबाबदार आहेत. सारांश, इसिसचा म्होरक्या बगदादी

याला जसे अमेरिकेने यमसदनी पाठविले, तसे सुलेमानी यांच्याबाबत करणे आवश्यक होते. यापूर्वी बराक ओबामा राष्ट्राध्यक्ष असताना, 'अल-कैद'चा म्होरक्या ओसामा बिन लादेन याला अमेरिकेने ठार केले. अमेरिकेच्या काही राजकीय निरीक्षकांनुसार, आपल्याविरूद्ध दोषारोपाचा महाभियोग चालू असताना, जनतेचे लक्ष त्यांना दुसरीकडे वळवायचे असल्याने त्यांनी सुलेमानी यांना लक्ष्य केले.

इतिहासाकडे पाहता असे दिसून येते, की १९७९ मध्ये इराणमध्ये झालेल्या क्रांतीत अमेरिकाधार्जिणे राजे शाह मोहम्मद पेहलवी यांना पदच्युत केल्यामुळे इराण व अमेरिकेचे संबंध बिघडत गेले. अयातुल्ला खोमेनी यांनी फ्रान्समधून परत येऊन सत्तासूत्रे हाती घेतली व इराण अमेरिकेच्या वैमनस्याला धार चढली. त्यात भर पडली ती ४ नोव्हेंबर १९७९ रोजी इमामला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिम विद्यार्थी संघटनेने तेहरानमधील अमेरिकन दूतावासाला घेराव घातला. इराणमधील कृतीला त्यांचा पाठिंबा होता. तब्बल ४४४ दिवस चाललेल्या या नाकेबंदीत अमेरिकन दूतावासातील ५२ राजदूतीया कर्मचारी अडकले होते. तेव्हापासून इराण व अमेरिकेचे राजदूतीया स्तरावरील संबंध संपुष्टात आले, ते आजतागायत पूर्ववत व सामान्य झालेले नाहीत. इराणतर्फे संयुक्त राष्ट्र संघात पाकिस्तान कामकाज पाहतो, अमेरिकेतर्फे स्वित्झरलॅण्ड कामकाज पाहत आहे. अमेरिकेचे वैमनस्य शियाबहुल इराणशी असले तरी, सुन्नीबहुल सौदी अरेबियाबरोबर मित्रत्वाचे संबंध आहेत. सारांश, अमेरिकेशी मैत्री व वैमनस्य करणाऱ्या अरब व मुस्लिम राष्ट्रांत सरळसरळ फूट आहे. मजेची बाब म्हणजे, अमेरिका इराणला ज्याप्रमाणे राजरोसपणे धमक्या देते, तशा धमक्या उत्तर कोरियाला देण्याची धमक अमेरिकेत नाही. कारण, इराण अद्याप अण्वस्त्रधारी देश नाही, तर उत्तर कोरिया अण्वस्त्रधारी देश असून, अध्यक्ष कीम जोंग उन हे केव्हाही अमेरिकेवर अण्वस्त्र लादू शकतात. याआधी त्यांनी अमेरिकेच्या प्रशांत महासागरातील गुयाम लष्करी तळावर हल्ला करण्याची, तसेच कॅलिफोर्नियावर अण्वस्त्र लादण्याची धमकी दिली होती. शिवाय, उत्तर कोरियाला चीनचा पाठिंबा असल्याने चीनवर कडी करीत खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी कीम जोंग उनबरोबर मैत्रीचा हात पुढे करून दोनवेळा त्यांच्या भेटी घेतल्या. तेव्हा उत्तर कोरियापासून अमेरिका सावध आहे. तसे इराणबाबत असण्याची गरज ट्रम्प यांना वाटत नाही. अण्वस्त्र बनविण्याचा इरादा नाही, असे आश्वासन इराणने अध्यक्ष बराक ओबामा यांच्या काळात झालेल्या पाच राष्ट्रीय समझोत्यात (जेसीपीओ) दिला होता; परंतु सत्तेवर येताच ट्रम्प यांनी समझोता धुडकावून लावला. ट्रम्प हे एक आंतरराष्ट्रीय पातळीवरील गरिबांचा छळवाद करणारा नेता आहेत, यात शंका नाही. म्हणून कॅनडा, मेक्सिको, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, भारत, जर्मनी, ब्रिटन व अनेक यूरोपियन देशांना त्यांनी या न त्या कारणावरून धमकावण्यास, इशारे देण्यास सुरुवात केली. परिणामतः अमेरिकेतील जनतेच्या त्यांच्यावरील विश्वासात कमालीची घट तर झालीच, पण वरील मित्रराष्ट्रांना त्यांनी डिवचले व आजही ते वारंवार इशारे देत असतात.

मेजर जनरल कासिम सुलेमानी यांना ट्रम्प यांनी लक्ष्य का केले? त्यांच्या जाहीर निवेदनानुसार, ते नंबर एकचे क्रूर दहशतवादी होते. सुलेमानी हे इराणच्या कूद सैन्याचे कमांडर. त्यास रिव्होल्यूशनरी गार्ड्स इलाईट एक्सपेडिशनरी कूद फोर्स असे म्हणतात. इराणच्या सेनेतील ते सर्वात महत्त्वाचे नेते होते. या कूद सैन्याने २००६ मध्ये ब्रायन कॅसनर या अमेरिकन सेनाधिकाऱ्याला ठार मारले, तेव्हा दुतर्फा तणावात भर पडली. अमेरिकन संरक्षण मंत्रालयातील सूत्रांतर्फे २०१५ मध्ये देण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, २०११ ते २०१५ दरम्यान इराणमध्ये निर्मित ईएफपी (एुश्रीौर्ळींशश्रू त्रीेशव झशपशींीरीं) या बॉम्बमुळे अमेरिकेचे किमान १९६ सैनिक ठार झाले. सुलेमानी यांनी याच बॉम्बचा वापर अमेरिकन सैन्याविरूद्ध केला आहे. इराणचे ते सर्वाधिक स्फोटक हत्यार आहे. एखाद्या कॉफी कॅनच्या आकाराचा हा बॉम्ब रणगाड्याला भेदून एका क्षणात शेकडो छिद्रे करू शकतो. त्यापुढे सैनिकांचा काय टिकाव लागणार? सुलेमानी यांनी इराणी सैन्याला बॉम्ब वापरण्याचे प्रशिक्षण दिले आहे. २००७ मध्ये ईएफपीचे हल्ले वाढले व ५ अमेरिकन सैनिक ठार झाले. असंख्य सैनिकांना यात पाय गमवावे लागले. इराणमध्ये ईएफपीमुळे ६०३ लोक ठार झाले. सुलेमानी यांना ठार करण्याचे अलीकडे आणखी एक कारण घडले. २७ डिसेंबर २०१९ रोजी अमेरिकेच्या संरक्षण खात्याचा कंत्राटदार नॉरेस हमीद (वय ३३) याला ठार करण्यात आले. २०१७ मध्ये तो अमेरिकेचा नागरिक बनला होता. हमीद मूळचा इराकचा. अमेरिकेत सॅक्रामॅन्टो येथे राहत होता. अमेरिकन सैन्यासाठी अरबी भाषेचा दुभाषी होता. ते वृत्त येताच ट्रम्प भडकले व सुलेमानी यांच्या अनेक हल्ल्याचा शेवट करण्यासाठी त्यांनी त्यांना ठार करण्याचे आदेश दिले. व्हाईट हाऊसमधून देशाला उद्देशून केलेल्या भाषणात त्यांनी, इराणविरूद्ध आणखी निर्बंध लादण्याचा इशारा दिला. तथापि, ती नेमकी काय असतील यांचा तपशील दिला नाही. इराकमधील कुर्कूक येथील अमेरिकन तळावर हल्ले झाल्यानंतर ट्रम्प यांनी मध्य आशियात आणखी साडेतीन हजार सैनिक पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकन सैन्यावर होणारे हल्ले इराणी दहशतवादी गट 'कतैब हजबुल्ला' तर्फे केले जात आहेत.

इराणने अमेरिकन सैन्यावर हल्ला करून सैनिकांना ठार केले असते तर मामला गंभीर झाला असता. त्याबाबत बोलताना इराणच्या वायूदलाचे कमांडर ब्रिगेडियर जनरल अमीर अली हाजीझदेह यांनी सांगितले की, 'थश वळव पीं ळपींशपव ीं ज्ञळश्रश्र, ुश ळपींशपवशव ीं हळीं ींहश शपशाू'ी ाळश्रळींरीू ारलहळपशीू'. ट्रम्प यांनी म्हणूनच 'अश्रश्र ळी ुशश्रश्र' युद्ध तात्पुरते टळले आहे असे सांगितले. तथापि, ते केव्हाही भडकू



**अमेरिकेने ३ जानेवारीच्या भल्या पहाटे बगदाद आंतरराष्ट्रीय विमानतळावर हवाईहल्ला केला. यात अनेक वाहने जळाली. इराकी पंतप्रधानांच्या प्रसार माध्यम कार्यालयाने हे छायाचित्र जारी केले.**

शकते. इराणचे लक्ष्य इस्त्रायल आहे, हे इस्त्रायल जाणून आहे. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंझामिन नेतान्याहू यांनी इराणला, 'कोणत्याही हल्ल्याला चोख उत्तर दिले जाईल', असा इशारा दिला. यापूर्वी अमेरिकेने इराक, अफगाणिस्तान, सीरिया, लेबनॉन, येमेन, लिबीया या मध्य आणि पश्चिम आशियातील परिस्थितीत लष्करी हस्तक्षेप करून तेथील परिस्थिती आणखी गंभीर केली. त्यामुळे तकलादू झालेल्या स्थितीत रशिया, चीन व काही प्रमाणात इराणनेच राजकीय व लष्करी हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली असून ते आपले प्रभावक्षेत्र वाढवीत आहेत. इराकमधून इसिसला पराभूत करण्यासाठी अमेरिकेने इराक व इराणलाही काही प्रमाणात साह्य केले होते. तथापि, अलीकडील संघर्षानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांनी स्पष्ट केले आहे, की पश्चिम आशियातून अमेरिकेला हुसकावून लावणे, हेच आता ध्येय आहे. गेल्या रविवारी इराकच्या संसदेने, 'अमेरिकेच्या सैन्याने देश सोडावा' अशी मागणी केली; परंतु अमेरिका तेथून पाय काढण्याची शक्यता नाही. खुद्द इराकमध्ये राजकीय वातावरण अस्थिर झाले आहे. बगदाद व अन्य शहरांतून विद्यार्थ्यांची प्रक्षोभक निदर्शने होत असून निदर्शकांनी नजाफ येथील इराणी कॉन्सुलेटला आग लावल्याने, परिस्थिती चिघळून पंतप्रधान आदेल अब्दुल माहदी यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला.

अमेरिकेचे पाच हजार सैन्य इराकमध्ये आहे. तसेच बहारिन, कुवैत, तुर्की, संयुक्त अरब अमिरात, दिएगो गार्सिया, सौदी अरेबिया व इजिप्तमध्ये १०,४३६ सैन्य तैनात आहे. जगातील १९४ देशांपैकी तब्बल दीडशे देशात १ लाख ७० हजार अमेरिकन सैन्य व अधिकारी आजमितीस तैनात आहेत. या उपस्थितीकडे पाहता अमेरिकेच्या प्रभावाची कल्पना यावी. लंडनस्थित तज्ज्ञ पीटर न्यूमन यांच्या मते, २००३ मध्ये अमेरिकेने इराकवर आक्रमण केल्यानंतर दहशतवादाविरूद्ध लढण्यासाठी तेथील सैन्याला काऊंटर टेररिझमचे प्रशिक्षण दिले. अमेरिकेने इराकमधून सैन्य मागे घेण्याचा निर्णय केल्यास हे सारे सैन्य इराणच्या पाठिंब्यावर अवलंबून असलेल्या दहशतवादी संघटनांना जाऊन मिळण्याची शक्यता संभवते. दुसरे तज्ज्ञ आयन गोल्डनबर्ग म्हणतात, की अमेरिकेने सैन्य माघारी घेतल्यास जवळजवळ नेस्तनाबूत झालेली इसिस पुनरूज्जीवित होईल. त्यामुळे इराकमध्ये एक नवे मानवीय संकट निर्माण होईल. लोक पुन्हा इसिसच्या नियंत्रणाखाली येतील. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार, इराकमध्ये आजमितीस १८ लाख विस्थापित असून मानवी साह्याच्या प्रतीक्षेत सुमारे ६० लाख लोक आहेत. या स्थितीत रशिया मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप करण्याची शक्यता नाही; परंतु अमेरिकेचा प्रभाव कमी होत असल्याचे दिसताच रशिया हळूहळू हातपाय पसरावयास सुरुवात करील, हे निश्चित. इराकमध्ये रशियन शस्त्रास्त्रांची विक्री व्हावी यासाठी ते प्रयत्न करतील. वॉशिंग्टनचे पाय कुठे चुकीच्या दिशेने पडत आहेत याकडे पुतिन यांची बारीक नजर आहे. दरम्यान, इराणने घोडचूक केली आणि युक्रेन एअरच्या नागरी विमानावर तोफा डागून त्याला जमिनदोस्त

केले. त्याबाबत अली खोमेनीपासून तो पंतप्रधान, परराष्ट्र मंत्र्यांनी दिलगिरी व्यक्त करून त्यात ठार झालेल्या १७६ प्रवाशांचे जीव परत येणार नाहीत. पहिल्यांदा इराणने विमान पाडल्याचा इन्कार केला होता. त्यात कुणीही अमेरिकन प्रवासी नव्हता. तर जर्मन, कॅनडियन, युक्रेनियन, ब्रिटन व अफगाणिस्तानचे प्रवासी होते. हे पाहता इराणला आंतरराष्ट्रीय न्यायालयात खेचून संबंधित देशांनी कारवाई करावी असा दबाव वाढत आहे. इराणला या चुकीबाबत क्षमा करता येणार नाही. ट्रम्प यांनी आपल्या भाषणात ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, रशिया व चीन या देशांना इराणशी २०१५ मध्ये झालेल्या अण्वस्त्र निर्मितीला रोखणाऱ्या समझोत्यातून (जेसीपीओ) बाहेर पडण्याचे आवाहन केले. अमेरिका त्यातून २०१८ मध्ये बाहेर पडली. दुसरीकडे, इराणने आता जाहीर केले आहे, की अण्वस्त्र निर्मितीसाठी आम्हाला कोणी रोखू शकणार नाही. त्यामुळे अमेरिका वगळता समझोत्यातील अन्य पाच राष्ट्रांपुढे नवा पेच निर्माण झाला आहे. तरीही समझोत्यातून ती राष्ट्रे तडकाफडकी बाहेर पडण्याची शक्यता दिसत नाही. ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी इराणचे अध्यक्ष हसन रौहानी यांच्याबरोबर बोलताना इराणशी झालेल्या समझोत्याबरोबर ब्रिटन कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले.

अमेरिकेने इराणवर लादलेल्या निर्बंधांचे विपरित परिणाम भारतावर होत आहेत. वस्तूतः दोन्ही देशांबरोबर आपले चांगले संबंध आहेत. इराणमधील चाबहार बंदराच्या उभारणीत भारताचा मोठा वाटा आहे. तरीही भारत प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत कुचराई करतो, अशी इराणची गेली दोन वर्षे तक्रार आहे. या बंदराचे काम चालू राहील असे आश्वासन इराणचे भारतातील राजदूत डॉ. अली चेगेनी यांनी हल्ल्यानंतर भारताला दिले. २५ व २६ जून, २०१९ रोजी अमेरिकेने परराष्ट्रमंत्री माईक पॉम्पिओ यांनी भारताला भेट दिली तेव्हा झालेल्या पत्रकार परिषदेत, 'इराण हा दहशतवाद निर्यात करणारा जगातील सर्वात मोठा देश आहे,' असे विधान केले होते. त्याबाबत डॉ. चेगेनी यांना विचारता ते म्हणाले, ''इस्त्रायल हा जगातील सर्वाधिक दहशतवादी देश आहे व त्याला पाठिंबा व संरक्षण देणारी अमेरिका ही दहशतवादाला पोसते आहे,'' असे प्रत्युत्तर दिले. ज्या हिजबुल्लाला अमेरिका व इस्त्रायल दहशतवादी मानतात ते पॅलेस्टाइनच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. इसिस, तालिबान, अल-कैदा यांना कुणी निर्माण केले, अशी पृच्छा ते करतात. ते म्हणाले की, अमेरिकेच्या बंधनाचा परिणाम सामान्य जनतेवर सर्वाधिक होत आहे. त्यांना परदेशातून जीवनोपयोगी औषधी मागविता येत नाहीत. क्युबामध्ये राजदूत असताना मी ते अनुभवले आहे. कारण क्युबावरही अमेरिकेने निर्बंध लादले होते.

याच संदर्भातील आणखी एक घटना. ८ जुलै २०१९ रोजी ब्रिटनच्या नौदलाने जिब्राल्टरनजीक इराणचा एक टँकर ताब्यात घेतला. त्यातून सीरियाला खनिज तेल वाहून नेण्यात येत होते,

अमेरिकेने इराणवर लादलेल्या निर्बंधांचे विपरित परिणाम भारतावर होत आहेत. वस्तूतः दोन्ही देशांबरोबर आपले चांगले संबंध आहेत. इराणमधील चाबहार बंदराच्या उभारणीत भारताचा मोठा वाटा आहे. तरीही भारत प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत कुचराई करतो, अशी इराणची गेली दोन वर्षे तक्रार आहे. या बंदराचे काम चालू राहील असे आश्वासन इराणचे भारतातील राजदूत डॉ. अली चेगेनी यांनी हल्ल्यानंतर भारताला दिले. २५ व २६ जून, २०१९ रोजी अमेरिकेने परराष्ट्रमंत्री माईक पॉम्पिओ यांनी भारताला भेट दिली तेव्हा झालेल्या पत्रकार परिषदेत, 'इराण हा दहशतवाद निर्यात करणारा जगातील सर्वात मोठा देश आहे,' असे विधान केले होते. त्याबाबत डॉ. चेगेनी यांना विचारता ते म्हणाले, ''इस्त्रायल हा जगातील सर्वाधिक दहशतवादी देश आहे व त्याला पाठिंबा व संरक्षण देणारी अमेरिका ही दहशतवादाला पोसते आहे,'' असे प्रत्युत्तर दिले. ज्या हिजबुल्लाला अमेरिका व इस्त्रायल दहशतवादी मानतात ते पॅलेस्टाइनच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. इसिस, तालिबान, अल-कैदा यांना कुणी निर्माण केले, अशी पृच्छा ते करतात. ते म्हणाले की, अमेरिकेच्या बंधनाचा परिणाम सामान्य जनतेवर सर्वाधिक होत आहे. त्यांना परदेशातून जीवनोपयोगी औषधी मागविता येत नाहीत. क्युबामध्ये राजदूत असताना मी ते अनुभवले आहे. कारण क्युबावरही अमेरिकेने निर्बंध लादले होते.

असा आरोप होता. त्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने ब्रिटनचा 'डींशपर खाशिी' टँकर ताब्यात घेतल्याने तणाव निर्माण झाला होता. तसेच अलीकडे इराणच्या हद्दीत शिरलेले ड्रोन इराणने नष्ट केल्यावर पुन्हा तणाव वाढला. ट्रम्प यांनी इराणविरूद्ध युद्ध करण्याचा इशारा दिला. पण तो प्रत्यक्षात आणला नाही. कारण इराणविरूद्ध अमेरिकेने खरेच युद्ध केल्यास त्याचे मध्य व पश्चिम आशियासह जगात सर्वत्र परिणाम होतील. शिवाय त्याचा शेवट काय होईल ते अमेरिकेच्या हाताबाहेर जाणार नाही याची खात्री कोण देणार? अशा कारवाईबाबत रशिया, चीन, यूरोपातील देश यांच्या काय प्रतिक्रिया असतील, हेही सांगणे कठीण. अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीत पुन्हा निवडून यावे यासाठी ट्रम्प ते साहस करतील काय, हे पाहावे लागेल.

चाबहार बंदराची बांधणी भारताने केल्यामुळे मध्य व पश्चिम आशियामध्ये मोठ्या प्रमाणावर पदार्पण करण्याची संधी इराणने भारताला दिली. दुसरीकडे, अमेरिकेच्या निर्बंधाने भारताला इराणहून होणाऱ्या खनिज तेलाच्या आयातीचे प्रमाण कमी करावे लागेल. इराण भारताची ११ टक्के ऊर्जेची गरज



**ओमानच्या आखातावर आग्नेय इराणमध्ये भारत, इराण आणि अफगाणिस्तान यांच्या संयुक्त भागीदारीने उभारण्यात येत असलेल्या चाबहार बंदराच्या पहिल्या टप्प्याचे उद्‌घाटन डिसेंबर २०१७ मध्ये इराणी अध्यक्ष हसन रोबानी यांच्या हस्ते झाले. या बंदरामुळे इराण, भारत आणि अफगाणिस्तानला जोडणारा नवीन सामरिक मार्ग खुला होणार आहे.**

भागवतो. पण भारताने इराणहून आयात केल्या जाणाऱ्या २.५ दशलक्ष टन (महिन्याकाठी) खनिज तेलाचे प्रमाण केवळ १ दशलक्ष टनावर आणले. इराणप्रमाणे अमेरिकेने दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएलावरही जानेवारी २०१९ मध्ये निर्बंध लादल्याने भारताला तेथून खनिज तेल आयात करण्याचे बंद करावे लागले. खनिज तेल आयातीसाठी भारत इराकवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. इराकचा पहिला क्रमांक आहे. प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, २०१८-१९ मध्ये भारताने इराकहून ४६.६ दशलक्ष टन, सौदी अरेबियाकडून ४०.३ दशलक्ष टन, संयुक्त अरब अमिरातीकडून १७.५ दशलक्ष टन व कुवैतकडून १०.८ दशलक्ष टन खनिज तेले आयात केले. पेट्रोलियम नियोजन व विश्लेषण विभागाच्या आकडेवारीनुसार, वरील देशांनी भारताची खनिज तेलाची ५१ टक्के गरज भागविली. भारताने २०१८-१९ मध्ये आयात केलेल्या २२६.५ दशलक्ष टन खनिज तेलापैकी १११.९ अब्ज डॉलर्सचे (७.८३ लाख कोटी रुपये) खनिज तेल वरील देशांकडून आयात केले. यावरून मध्य व पश्चिम आशियावर भारत किती मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे, हे स्पष्ट होते. शिवाय संयुक्त अरब अमिरातील ७ देशांसह पश्चिम आशियात सुमारे ८० लाख भारतीय लोक नोकऱ्या, व्यवसाय करीत आहेत. ते प्रतिवर्ष ५० अब्ज डॉलर्स मायदेशी पाठवितात. त्यामुळे तेथे अस्थिरता पसरल्यास भारताला फार मोठा आर्थिक फटका बसेल. किंबहुना, याची जाणीव ठेऊन परस्परविरोधी अमेरिका व इराण यांच्याबरोबर संबंधांचे संतुलन साधण्याची तारेवरची कसरत येती अनेक वर्षे भारताला करावी लागणार आहे.

अमेरिकेकडून भारताने २०१८ मध्ये ६ दशलक्ष टन खनिज तेल आयात केले होते; परंतु इराण व व्हेनेझुएलावरील निर्बंधांकडे पाहता येत्या वर्षी आपल्याला किमान १२ दशलक्ष टन खनिज तेल अमेरिकेकडून आयात करावे लागेल. तसेच सौदी अरेबिया व रशियाकडून आयात करावे लागेल.

अमेरिकेचे मित्रराष्ट्र असूनही भारत निर्बंधातून सुटलेला नाही. उलट, ट्रम्प यांनी भारतावरही चीनबरोबर व्यापारी निर्बंध लादले. भारत व अमेरिकादरम्यान संबंध वृद्धीसाठी परराष्ट्र पातळीवर ४० प्रकारच्या समित्या असूनही संबंधांतील तणावात नित्याने चढउतार होत आहेत.

इराणचे परराष्ट्र मंत्री जवाद जरीफ यांना अमेरिकेने व्हिसा नाकारल्याचे वृत्त आले. तथापि, दिल्लीतील ऑब्झर्वर रिसर्च फाऊंडेशनच्या निमंत्रणावरून ते भारताला भेट देणार आहेत. त्यातून अमेरिका-इराण संघर्षाची पुढील दिशा आणखी स्पष्ट व्हावी, ही अपेक्षा. इराणचे राजदूत डॉ. चेगेनी यांनी अमेरिका-इराणदरम्यान भारताच्या मध्यस्थीची पुसटशी सूचना केली होती; परंतु अमेरिका व इराण यांचे हाडवैर पाहता भारताला फारसे करण्यासारखे काही नाही. दोन शत्रू राष्ट्रांत भारताचे हितसंबंध कसे सुरक्षित राखायचे, ही भारताच्या परराष्ट्र शिष्टाईची कसोटी ठरणार आहे. ●●●

# अमेरिका-इराण संघर्षाचे सामरिक परिणाम




✍ डॉ. विजय खरे

इराणच्या नेत्यांना त्यांच्या मर्यादा व क्षमता यांची पूर्णपणे जाणीव आहे. त्यामुळे इराण प्रत्यक्ष युद्ध अमेरिकेसोबत करणार नाही; परंतु अणुशक्तीद्वारे अमेरिकेला वेगवेगळ्या पातळ्यांवर नामोहरम करण्याचा प्रयत्न करणार आहे. **त्यात रशिया, चीन व फ्रान्स यांच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त होणार आहे. त्याचबरोबर भारतालाही महत्त्वाची भूमिका बजावावी लागणार आहे. युद्धापूर्वीच तेलाचे भाव वाढलेले आहेत. प्रत्यक्ष लष्करी संघर्ष झाला तर त्याबाबत विचार करणेही कठीण आहे.**

प्रखर राष्ट्रवादाच्या इच्छा आणि आकांक्षांतून आपली सत्ता निरंतर काळासाठी अबाधित ठेवता येते किंवा ती सत्ता लष्कराच्या सहाय्याने आपल्या हितासाठी वापरण्याचे नवीन उदाहरण म्हणजे अमेरिका-इराण संघर्ष हा होय. अमेरिकेने नुकतेच इराणचे सर्वोच्च लष्करी कमांडर जनरल कासीम सुलेमानी व त्यांच्या सहकाऱ्यांना ठार केले. त्यात 'पॉप्युलर मोबलायझेशन फोर्स' चे उपप्रमुख अबू महरी अल मुहंदिस यांच्यासह आठ जण ठार झाले आहेत. त्यामुळे जागतिक पटलावर युद्धाचे ढग घोंगावत आहेत. अमेरिकेत सध्या निवडणुका जरी नसल्या तरी अमेरिकेचे राष्ट्रपती ट्रम्प यांच्याविरोधात महाभियोग सुरू आहे. त्या महाभियोगाची फलनिष्पती सर्वांना माहीत असूनही ट्रम्प यांनी निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवाद जागा व्हावा यासाठी लष्करी मार्ग वापरलेला आहे. त्यामुळे सत्ता टिकविण्यासाठी प्रखर राष्ट्रवादासोबत लष्कराचा वापर आता जागतिक पातळीवर पाहावयास मिळत आहे. पुढील महिन्यात इराणमध्येही संसदीय निवडणुका आहेत. तेथेही इराणचे सर्वोच्च नेते खोमेनी व राजकीय पक्ष अमेरिकेला उत्तर देऊन राजकीय फायदा उचलताना आपणास येणाऱ्या कालखंडात दिसणार आहे. २०११ मध्ये ओसामा बिन लादेन याच्याविरोधात जी कारवाई तत्कालीन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी केलेली होती, त्याची तुलना राष्ट्रपती ट्रम्प हे सुलेमानी व त्यांच्या सहकाऱ्यांना ठार केल्यानंतर करीत आहेत; परंतु या ठिकाणी एक महत्त्वाचा फरक आपणास पाहावयास मिळतो. अमेरिकेने आत्तापर्यंत दहशतवादी गटांचे म्होरके त्यात अबू मुसाब अल-झरकावी (अल कायदाचा नेता), ओसामा बिन लादेन (अल कायदाचा संस्थापक), अबू बकर अल-बगदादी (इस्लामिक स्टेटचा संस्थापक) यांना विविध लष्करी कारवायांद्वारे ठार करण्यात आले होते. त्यावेळेस सामान्य जनतेने स्वागत केलेले होते; परंतु जनरल कासीम सुलेमानी यांच्याबाबत सांगायचे तर ते राष्ट्रराज्याचे अधिकृत घटक होते (State Actor). त्यामुळे त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी झालेली गर्दी व चेंगराचेंगरीत जवळपास ५० निष्पाप लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत. अमेरिकेला उत्तर म्हणून इराणने अमेरिकेच्या लष्करी हवाई तळावर मोठा हल्ला चढविला आहे. किमान १२ क्षेपणास्त्रांद्वारे तो हल्ला केला आहे व येणाऱ्या कालखंडात हे हल्ले अधिक तीव्र होऊन जागतिक पातळीवर मोठा संघर्ष पाहावयास मिळणार आहे. त्याचे परिणाम भारतासह सर्व जगाला भोगावे लागणार आहेत. इराणने त्याच्या शेजारील राष्ट्रांना एकप्रकारे धमकीच दिलेली आहे. जो कोणता देश अमेरिकी फौजांना भूमी उपलब्ध करून देईल, त्या देशालाही लक्ष्य करण्यात येईल, असा इशाराही इराणने दिल्यामुळे येणाऱ्या कालखंडात अमेरिका-इराण संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे जागतिक पटलावर दिसत आहेत. गेल्या दशकभरापासून पश्चिम आशियामध्ये इराणचा प्रभाव वेगाने वाढत आहे. त्यामागे त्यांच्या कुद्स फौजांची कामगिरी सर्वात महत्त्वाची असल्याचे मानले जाते. त्या फौजांचे नेतृत्व १९९८ पासून कासीम सुलेमानी करीत होते व दहशतवादी संघटनांशी संपर्क वाढवून अमेरिकेच्या धोरणांना अप्रत्यक्षरित्या विरोध करीत होते. त्यामुळे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनीही सुलेमानी सर्वात धोकादायक व्यक्ती असल्याचे जाहीर केले होते. इराकमध्ये इराणचा प्रभाव गेल्या दशकात वाढला असून त्यामध्ये कुद्स फौजांची कामगिरी महत्त्वाची आहे. इराणबाहेरील विशेष मोहिमांसाठी या दलाची स्थापना करण्यात आली होती. पश्चिम आशियातील त्यांच्या कारवायांमुळे अमेरिकेने त्यांना दहशतवादी संघटनांच्या यादीमध्ये टाकले आहे. इराकमध्ये अनेक संघटनांना एकत्र आणण्यात इराणला यश आलेले आहे. त्याआधी लेबनॉनमधील 'हिजबुल्ला'शी संपर्क वाढवत त्याचा उपयोग इराणचे सामाजिक प्रभुत्व वाढविण्यासाठी इराणने केलेला आहे.

कासीम सुलेमानी यांचे महत्त्व इराणचे सर्वोच्च नेते खोमेनी यांच्यानंतर येते. ते खोमेनी यांचे अगदी विश्वासू आणि जवळचे



इराणसोबत २०१५ मध्ये झालेल्या अणूकरारातून बाहेर पडण्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ९ मे २०१८ रोजी केली. त्यामुळे आज पश्चिम आशियाची स्थिती अधिक चिंताजनक झालेली आहे.

नेते होते. त्यांनी सीरिया व इराकमधील इस्लामिक स्टेटच्या दहशतवादी संघटनांच्या विरोधात अतिशय महत्त्वाची भूमिका बजावलेली होती. शिवाय अमेरिकेसोबत त्यांनी काम केलेले होते. अशा व्यक्तीला ट्रम्प यांच्या आदेशाने ठार करण्यात आलेले आहे. पश्चिम आशियात अगोदरच अस्थिरता आहे. गेल्या १६ वर्षांपासून अफगाणिस्तान, १७ वर्षांपासून इराक व सध्या सीरियातील प्रश्न तीव्र झालेले आहेत. एकीकडे दहशतवादामुळे होरपळून निघणारी राष्ट्रे व दुसरीकडे अमेरिकेचा हस्तक्षेप यामुळे शांतता प्रस्थापित करणे जिकिरीचे काम होऊन बसले आहे. बराक ओबामा यांनी मोठ्या प्रयत्नाने २०१५ मध्ये इराणसोबत आण्विक करार केला होता. तो करार २०१८ मध्ये ट्रम्प प्रशासनाने मागे घेतला आहे. त्यामुळे पश्चिम आशियाची स्थिती अधिक चिंताजनक झालेली आहे. अमेरिका आणि इराणमध्ये युद्ध झाल्यास फक्त ऊर्जा पुरवठ्यावरच परिणाम होणार नाही तर आखातामध्ये राहणाऱ्या भारतीयांवरही होणार आहे. आज जवळपास ८० लाख भारतीयांच्या भवितव्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर पश्चिम अशियात जे भारतीय राहत आहेत, ते मोठ्या प्रमाणात पैसा भारतात पाठवतात. त्यावरही परिणाम होऊ शकतो. सामाजिकदृष्ट्या चाबहार बंदरास धोका निर्माण होऊ शकतो. सामाजिक आणि सुरक्षेच्या ध्येयधोरणासाठी चाबहार बंदर भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत-इराण याचे सामाजिक संबंध जरी वरवर चांगले दिसत असले तरी भारताची अमेरिकेसोबत वाढलेली मैत्री, ट्रम्प प्रशासनाने घातलेले निर्बंध, यामुळे भारताची राजनैतिक मुत्सद्दीपणाची आता कस लागणार आहे. इराणनंतर भारतात सर्वात जास्त शिया मुस्लिमधर्मियांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे त्यांच्याही भावनांचा विचार करावा लागणार आहे. अमेरिका-इराण यांच्यातील वाढत्या संघर्षाची कारणे वेगवेगळी असतील, तरी आज इराणला अमेरिकेसोबत युद्ध परवडणारे नाही. अमेरिका आपल्या प्रोधन (ऊशींर्शीशपलश) धोरणाद्वारे इराणवर अधिक निर्बंध लादण्याची शक्यता आहे. इराणची आर्थिक स्थिती आताच ढासळलेली आहे. त्यामुळे ट्रम्प प्रशासन जास्तीत जास्त दबावाद्वारे इराणला नामोहरम करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यात ट्रम्प प्रशासनाने इराणमध्ये सत्ताबदल 'ठशसळाश उहरपसश' साठी इच्छुक नाही; परंतु दबावाद्वारे बरेच काही हित साध्य करू शकते. इराणचे प्रमुख यांनाही याबाबत पूर्ण खात्री आहे व तसा इराणचा इतिहासही आहे. १९८८ मध्ये इराण-इराक संघर्षात इराणने युद्धबंदी स्वीकारली होती त्याचवेळेस खोमेनींची सत्ता अमेरिका बदलणार होती; परंतु सत्तेसाठी त्यांनी 'शांततेसाठी विष प्राशन' ''ऊीळपज्ञळपस ींहश ळिीेप षिरिलश'' हे धोरणही राबविले आहे.

अमेरिकेला उत्तर म्हणून इराणने प्रथम युरेनियम निर्मितीला चालना दिली, जी २०१५ कराराद्वारे इराणने थांबविली होती. इराणची दुसरी महत्त्वाची कृती म्हणजे, अमेरिकेच्या विरोधातील पश्चिम आशियामधील राष्ट्रांची आघाडी तयार करणे, त्यात इराणला यशही मिळालेले आहे. ते म्हणजे, इराकच्या संसदेने अमेरिकन फौजा परत जाव्यात असा ठराव केलेला आहे. अमेरिकन फौजा पश्चिम आशियात राहाव्यात अशी इच्छा ट्रम्प प्रशासनाचीही नाही. कारण अमेरिकेची ऊर्जासुरक्षा आता इराक किंवा इतर राष्ट्रांवर अवलंबून नाही; परंतु दहशतवादाची पाळेमुळे नष्ट करण्यासाठी अमेरिकेला आपले सैन्य पश्चिम आशियात ठेवावेसे वाटत आहे व त्यावर ट्रम्पही ठाम आहेत. येणाऱ्या कालखंडात अमेरिकेत निवडणुका आहेत व लष्करी कारवाईद्वारे निवडणुका जिंकता येतात हा अमेरिकेचा इतिहास आहे. तंत्रज्ञानाच्या व लष्कराच्या ताकदीवर युद्ध जिंकणे सोपे आहे; परंतु त्याचे परिणाम काय होणार याबाबत ट्रम्प प्रशासन कोणताही विचार करीत नाही. इराणच्या नेत्यांना त्यांच्या मर्यादा व क्षमता यांची पूर्णपणे जाणीव आहे. त्यामुळे इराण प्रत्यक्ष युद्ध अमेरिकेसोबत करणार नाही; परंतु अणुशक्तीद्वारे अमेरिकेला वेगवेगळ्या पातळ्यांवर नामोहरम करण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यात रशिया, चीन व फ्रान्स यांच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त होणार आहे. त्याचबरोबर भारतालाही महत्त्वाची भूमिका बजावावी लागणार आहे. युद्धापूर्वीच तेलाचे भाव वाढलेले आहेत. प्रत्यक्ष लष्करी संघर्ष झाला तर त्याबाबत विचार करणेही कठीण आहे. ●●●



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शंभर वर्षांपूर्वीचे मूकनायक

✍डॉ. हरिश्चंद्र निर्मळे

१९१९ साली कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज मुंबईत आले असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांसह त्यांची भेट घेऊन, केवळ दलितांच्या उद्धारासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी स्वतंत्र नियतकालिकाची आवश्यकता बोलून दाखविली. छत्रपती शाहू महाराजांना ही कल्पना खूपच आवडली आणि तत्काळ त्यांनी २५०० रुपयांचा चेक बाबासाहेबांच्या स्वाधीन केला. **एवढे घसघशीत आर्थिक पाठबळ मिळताच, आपल्या मूक बांधवांच्या व्यथा–वेदनांना वाचा फोडण्यासाठी, त्यांचे नायकत्व स्वत: स्वीकारले आणि शनिवार दि. ३१ जानेवारी, १९२० रोजी 'मूकनायक' या केवळ दलितांच्या उद्धारासाठी वाहिलेल्या पाक्षिकाचा पहिला अंक प्रसिद्ध करून, मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकले.**

कोणतीही समस्या विश्लेषणात्मक स्वरूपात समाजमनापर्यंत पोहोचविण्यासाठी नियतकालिकासारखे समर्थ माध्यम नाही. कारण एकच विचार, एकाचवेळी असंख्य वाचकांच्या मनात नियतकालिकेच रूजवू शकतात. पाश्चात्यांनी वर्तमानपत्रांचे 'Fourth Easte of the Kingdom' असे मार्मिक पण समर्पक वर्णन केले आहे. नियतकालिकांच्या बाबतीतही तेच म्हणता येईल. वास्तविक, एखादा नवा विचार, नवे तत्त्व किंवा नवीन कायदा समाजमनात एकाएकी रूजविणे कधीही शक्य नसते. त्यासाठी अगोदर समाजमनाची तयारी करावी लागते. विचारजागृतीची बीजे प्रथम त्याच्या मनात पेरावी लागतात. हे अत्यंत अवघड कार्य समर्थपणे पार पाडण्यासाठी नियतकालिकेच अधिक उपयुक्त असतात. महाराष्ट्रातील समाजजीवनात नियतकालिकांनी उच्च स्थान पटकाविण्याचे कारणही हेच आहे. लष्करापेक्षाही नियतकालिकांची शक्ती प्रभावी होती, कारण जनतेच्या हक्कांची ती राखणदार झाली. लोकमतांना वाचा फोडणे, त्यांना वळण लावणे आणि लोकमताची जडणघडण करणे या त्यांच्या कर्तव्यामुळे समाजात त्यांना अग्रस्थान मिळाले.

नियतकालिकांची ही सामर्थ्यशाली शक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात येताच, असे समर्थ आणि प्रभावी माध्यम हाती असल्याशिवाय दलितांची दु:खे जगाच्या वेशीवर टांगताच येणार नाहीत आणि अस्मितेची ज्योत त्यांच्या अंत:करणात तेवती ठेवता येणार नाही याची जाणीव

बाबासाहेबांना १९१८ पासूनच होऊ लागली होती. कारण मांटेग्यू सुधारणा अंमलात आणण्यासाठी साऊथबरो कमिटी हिंदी लोकांच्या साक्षी घेत होती. याशिवाय या सुधारणांचा उपयोग करून घेऊन दलितांनाही राजकीय क्षेत्रात वेगळे हक्क प्राप्त करून देणे बाबासाहेबांच्या मते अत्यावश्यक होते. या सर्व बाबींचा विचार करून त्यांनी आपल्या सर्व निकटवर्ती सहकाऱ्यांजवळ बोलून दाखवला. दरम्यान, १९१९ साली कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज मुंबईत आले असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांसह त्यांची भेट घेऊन, केवळ दलितांच्या उद्धारासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी स्वतंत्र नियतकालिकाची आवश्यकता बोलून दाखविली. छत्रपती शाहू महाराजांना ही कल्पना खूपच आवडली आणि तत्काळ त्यांनी २५०० रुपयांचा चेक बाबासाहेबांच्या स्वाधीन केला. एवढे घसघशीत आर्थिक पाठबळ मिळताच, आपल्या मूक बांधवांच्या व्यथा-वेदनांना वाचा फोडण्यासाठी, त्यांचे नायकत्व स्वत: स्वीकारले आणि शनिवार दि. ३१ जानेवारी, १९२० रोजी 'मूकनायक' या केवळ दलितांच्या उद्धारासाठी वाहिलेल्या पाक्षिकाचा पहिला अंक प्रसिद्ध करून, मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात पहिले पाऊल टाकले.

**'मूकनायक': स्वरूप** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या या 'मूकनायक' पाक्षिकाचे ३१ जानेवारी,१९२० ते २३ ऑक्टोबर १९२० या दरम्यान एकूण १९ अंक प्रकाशित झाले. त्यापैकी आज अंक क्र. १ ते ३, ५, ६ व १० आणि १३ ते १९ एवढे अंक उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे, योगायोगाने हे सर्व अंक प्रत्येक शनिवारीच प्रसिद्ध झाले आहेत. यापैकी कोणत्याही अंकावर संपादक या नात्याने कोणाचेही नाव सुस्पष्टपणे छापलेले दिसून येत नाही; परंतु ३१ जुलै, १९२० च्या अंक क्र. १३ च्या मुखपृष्ठावर, 'या अंकापासून 'मूकनायक' पत्राची अंतरव्यवस्था बदललेली असून, संपादकीय लेख व इतर सर्व पत्रव्यवहार रा. रा. ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांचे नावे करावा' अशी सूचना करण्यात आली आहे. 'मूकनायक' हे पाक्षिक आठ पानांचे होते. यापैकी दहावा अंक हा दि. ३०, ३१ मे व १ जून, १९२० रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली, नागपूर येथे संपन्न झालेल्या 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदे'चा संपूर्ण अहवाल प्रसिद्ध करणारा दहा पानांचा विशेषांक होता. या सर्व अंकांचा कालावधी ३१ जानेवारी, १९२० ते २३ ऑक्टोबर, १९२० असा केवळ १० च महिन्यांचा असला, तरी दलितांचे एक स्वतंत्र, स्वायत्त आणि 'केसरी' चा बाणा असलेले परखड विचारांचे, 'मूकनायक' हे पहिलेवहिले नियतकालिक होते. त्याचे सर्व उपलब्ध अंक महाराष्ट्र शासनाच्या, शिक्षण विभागाने, वसंत मून यांच्या संपादकत्वाखाली नोव्हेंबर, १९९० साली पुनर्मुद्रित केले आहेत.

'मूकनायक' पाक्षिकाचे सर्व अंक के. आर. मित्र यांनी आपल्या मनोरंजन प्रेस, ३ संडहस्ट्र रोड, गिरगाव, मुंबई येथे छापले आणि ते १४, हरारवाला बिल्डिंग, पोयबावडी, परेल, मुंबई येथील 'मूकनायक' च्या कार्यालयातून प्रकाशित झाले; परंतु या उपलब्ध अंकांपैकी क्र. २, ३ व ६ हे श्री. पां. न. भटकर यांनी प्रकाशित केले असून, क्र. ५ व १३ ते १९ हे सर्व अंक ज्ञा. ध्रु.घोलप यांनी प्रकाशित केल्याची नोंद दिसून येते.

'मूकनायक' चे पहिले संपादक पांडुरंग नंदराम भटकर या वऱ्हाड प्रांतातील गृहस्थाचे शिक्षण पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात इंटरपर्यंत झाले होते. ५ जुलै, १९२० रोजी डॉ आंबेडकर शिक्षणासाठी लंडनला गेले तेव्हा त्यांनी भटकरांना व्यवस्थापकांच्या सल्ल्याने 'मूकनायक' व्यवस्थित चालविण्यास सांगितले; परंतु भटकर मनस्वी आळशी, तशात वृत्तपत्र चालविण्याइतपत त्यांना मनस्वास्थ्यही नव्हते आणि त्यांच्या आळसामुळे कामही वेळेवर होत नसे. यासाठी व्यवस्थापक मंडळाने त्यांच्याकडून संपादकीय सूत्रे काढून घेतली आणि डॉ. बाबासाहेबांच्या सल्ल्यानुसार व्यवस्थापक म्हणून काम पाहणारे ज्ञा. ध्रु. घोलप यांच्याकडे 'मूकनायक' च्या संपादकत्वाची जबाबदारी सोपवली. घोलपांचे मूळगाव सातारा जिल्ह्यातील सरूड सांगाव. इंग्रजी सहाव्या इयत्तेनंतर ते पोर्टट्रस्टमध्ये नोकरी करीत होते. त्यांना लेखन-वाचनाचे आणि समाजकार्याचे विलक्षण वेड होते. त्यामुळेच वृत्तपत्र चालविण्यासंबंधी बाबासाहेबांच्या घोलपांकडून काही रास्त अपेक्षाही होत्या. पण दुर्दैव असे, की संपादकत्वाची ही धुरा बाबासाहेब विलायतेहून परत येईपर्यंत घोलपांनाही सांभाळता आली नाही आणि 'मूकनायक' योग्य व्यवस्थापनाअभावी बंद पडले. यासंदर्भात खेद व्यक्त करताना डॉ. आंबेडकर लिहितात, राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मला विलायतेस जाणे भाग पडले. जाताना 'मूकनायक' ची सूत्रे एका तरूणाच्या हाती दिली. मला आशा होती, की परत आल्यावर सदरील वृत्तपत्र भरभराटीस आलेले आपल्या दृष्टीस पडेल. पण, माझ्या कमनशीबाने ती आशा व्यर्थ ठरली. कारण परत येणारा अंक निघण्यापूर्वीच 'मूकनायक' ला मूठमाती मिळाल्याची बातमी त्यास कळाली. (बहिष्कृत भारत, ३/४/१९२७)

**'मूकनायक': अंतरंग** : केवळ वैचारिक लेखनालाच प्राधान्य देण्यात आलेल्या, पण दुर्दैवाने अल्पजीवी ठरलेल्या आणि आज उपलब्ध असलेल्या 'मूकनायक' मधून मात्र सुमारे बारा अग्रलेख, सात वैचारिक लेख, विविध विचार आणि क्षेमसमाचार या सदरात येणारे चोवीस स्फुटलेख, याशिवाय आमची हालचाल, कळावे की, कुशल प्रश्न, शेला पागोटे अशा सदरातून अठरा प्रासंगिक विचार, असे विपुल लेखन प्रसिद्ध झाले. कथा, कवितेसारख्या ललित लेखनाला मात्र केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येय धोरणानुसार 'मूकनायक' मधून प्रसिध्दी मिळू शकली नाही. असे असले, तरी त्यामधून एकूण बत्तीस जाहिराती मात्र प्रसिद्ध झाल्या. 'श्री भक्त चोखामेळा चरित्र' आणि 'मेस्मेरिझम इंस्ट्रक्टर' या

दोन पुस्तकांची जाहिरात वगळता, बाकीच्या सर्व शिवतरकर विमा पॉलिसी, माधवराव ब्रदर्स फर्निचर, गोदरेज मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लोकमान्य जोडे-पैजारा, रॉयल बूट आणि शूज, फेआनिक्स बायंडिंग वर्क्स अशा त्या व्यावसायिक स्वरूपाच्या होत्या.

'मूकनायक' सुरू झाल्यापासून डॉ. आंबेडकर ४ जुलै, १९२० पर्यंत भारतात होते, तोपर्यंतचे म्हणजे नंतर ते लंडनला जाईपर्यंतचे 'मूकनायक' मधील सर्व लेखन ते स्वत:च करीत होते. यादरम्यान दहा अंक प्रसिद्ध झाले. यामधील मनोगत, स्वराज्याची सर सुराज्याला नाही! हे स्वराज्य नव्हे, आमच्यावर राज्य, स्वराज्यातील आमचे आरोहण, राष्ट्रातील पक्ष हे पाच अग्रलेख आणि स्वराज्याचे माता पिता, बुजतील म्हणून, मुसलमान ब्राह्मण झाले, टोणगे पान्हवतील काय?, यांचा ब्राह्मण वर्ण असावा खास, वैऱ्यांनी की हो नेला कैवारी, अपराध कोणता? द्वेष्ट्यांशी सहकार्य, मूळ शोधा मग वाद मिटेल हे 'विविध विचार' मधील आठ स्फुटलेख डॉ. आंबेडकरांनीच लिहिले आहेत, हे त्यांच्या खास भाषा आणि लेखन शैलीवरून आणि त्यांच्या अभ्यास, विद्याव्यासंग, बहुश्रुतता, प्रकाड पांडित्य, संत आणि पौराणिक संदर्भ देण्याच्या पध्दतीवरून सुस्पष्टपणे जाणवते. आज 'मूकनायक' चे ४, ७, ८ व ९ हे अंक उपलब्ध असते, तर त्यांचे आणखी चार अग्रलेख आणि किमान बारा स्फुटलेख अभ्यासावयास मिळाले असते.

**डॉ. बाबासाहेबांचे अग्रलेख** : 'मूकनायक' चा पहिलाच अंक प्रसिद्ध करताना, या पाक्षिकाचे ब्रीद म्हणून डॉ. आंबेडकरांनी संत तुकारामांचा,

*काय करू आता धरुनिया भीड! निशं:क हे तोंड वाजविले!!*
*नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण! सार्थक लाजून नव्हे हित!!*

हा परखड अभंग हेतूत: स्वीकारला. आपल्या पहिल्याच अग्रलेखात, हिंदू समाजाचे वर्णन ते विषमतेचे माहेरघर असे करून पुढे लिहितात, हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे, की या मनोऱ्यास शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे, त्याच मजल्यावर त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला इसम, मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस, मग तो कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्राज्ञा नाही. हा मनोरा सर्वांसाठी खुला करण्याचा प्रयत्न तत्कालीन विविध वृत्तपत्रांनी केला असला तरी, त्यामधून 'बहिष्कृतांच्या प्रश्नांचा सांगोपांग ऊहापोह होण्यास पुरेशी जागा मिळत नसल्याने, त्यांना एक स्वतंत्र पत्र पाहिजे, हे कोणीही मान्य करील. ही उणीव भरून काढण्यासाठी 'मूकनायक' या पत्राचा जन्म असल्याचे आंबेडकर सांगतात.

भारताला मिळावयाच्या स्वातंत्र्याविषयी १९२० साली देशभरात जोरदार चर्चा सुरू होती. याविषयीची आपली भूमिका 'मूकनायक' मधील अग्रलेखांतून डॉ. आंबेडकरांनी हिरीरिने मांडली. आधी सुराज्य की आधी स्वराज्य या वादावर जेव्हा राष्ट्रातील विविध पक्षांत चर्चा सुरू झाली, तेव्हा प्रजा पक्षात फूट पडू लागली. यामध्ये निर्भेळ स्वराज्य मागणाऱ्यांचा कंपू जहाल बनला. 'प्रजा हीच राजा म्हणून तिच्या चैतन्याच्या दोरी तिच्याच हातात असाव्या असे ठोकून सांगणारा बलवत्तर प्रजा पक्ष इंग्रजी परिचयाशिवाय उभा राहिला, असे म्हणण्यास काही आधार दिसत नाही'. या पार्श्वभूमीवर स्वराज्याची संकल्पना मांडताना डॉ. आंबेडकर म्हणतात, व्यक्तीच्या उन्नतावस्थेस अनुरूप अशी सामाजिक स्थिती घडवून आणण्यास दिलेले स्वातंत्र्य हीच खरी स्वराज्याची व्याख्या आहे. 'राष्ट्रीय सभेच्या आद्य हेतूत आता बदल झालेला असून, तिला आता सुराज्य नको, कारण स्वराज्याची सर सुराज्य याला नाही या नवीन तत्त्वाने तिच्यावर पगडा बसविला आहे. निव्वळ तत्त्वाला हरकत नाही पण व्यावहारिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे'. भारताला जर स्वराज्य मिळणार असेल, तर 'ते सुराज्य असावे, ते स्वराज्य कोणाचे व ते कशासाठी हे कळल्याखेरीज या तत्त्वाची री आम्ही तरी ओढू शकत नाही', असेही ते ठणकावून सांगतात.

हिंदुस्थानचे भावी स्वातंत्र्य हे आमच्यासाठी स्वराज्य नव्हेच, कारण 'ज्या बहिष्कृत लोकांना समान नागरिकत्वाचे किमान हक्क नाकारले जाणार असतील आणि शिकल्यासवरल्यावरही जात लपविल्याखेरीज किंवा धर्मांतर केल्याखेरीज नोकरीचा सर्वसाधारण हक्क त्यांना मिळणार नसेल तर, हे तर आमच्यावर राज्य' असा ऊहापोह करून डॉ. आंबेडकर म्हणतात, 'इंग्रजी राज्यात ज्यांची बात सहन होत नव्हती त्यांची लाथ सोसावी लागणार! स्वकियांच्या सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक जुलूमाच्या आड घातलेले इंग्रजी सत्तेचे सुदर्शन लोपून स्वराज्याच्या वज्राचा आमच्यावर प्रत्यक्ष आघात होण्याची वेळ येणार! म्हणूनच आम्ही म्हणतो, की द्याल तर असे स्वराज्य द्या की त्यात थोडेबहुत आमचेही राज्य आहे'. स्वराज्यातील आमचे आरोहण काय? याची मांडणी करताना ते म्हणतात, ''हिंदुस्थानातील भावी स्वराज्य एकसत्तात्मक किंवा प्रजासत्तात्मक राज्य नसून प्रजा प्रतिनिधिसत्तात्मक राज्य होणार आहे; परंतु आमच्या वाट्यास येणारे प्रतिनिधी किती आहेत व ते कोणत्या पध्दतीने मिळणार हे निश्चित झाल्याखेरीज जातवार प्रतिनिधीनुरूप होणाऱ्या आरोहणापासून आमचे कल्याण होईल असे मानून घेण्यास आम्ही केव्हाही तयार होणार नाही''. तसेच 'स्वराज्यातील प्रतिनिधींच्या संख्येच्या प्रमाणाचा पाया जातींच्या परस्पर संख्येवरच उभारला पाहिजे. संख्येने जात मोठी असली, पण तिच्या गरजा जर फार नसतील, तर त्या जातीला संख्येच्या मानाने स्वतंत्र प्रतिनिधी देणे आमच्या मते जरूर नाही'. दलितांच्या न्याय्य हक्कापोटी मांडलेल्या डॉ. आंबेडकरांच्या या परखड विचारांचा अन्वयार्थ


Reg. No. B. 1430

# मूकनायक

वर्गणीचा दर
वार्षिक ट. ख. सह
२॥ रुपये.

काय करूं आतां धरूनियां भीड । निःशंक हें तोंड वाजविलें ।।
नव्हे जगीं कोणी मुकीयांचा जाण । सार्थक लाजून नव्हे हित ।।

वर्ष १ लें.] मुंबई, शनिवार ता. ३१ जानेवारी १९२० [अंक १ ला

**वंचितांचा आवाज बुलंद करणाऱ्या मूकनायक वृत्तपत्राच्या पहिल्याच अंकाचे हे मास्टहेड.**

दुर्दैवाने तत्कालीन राजकारण्यांनी बाबासाहेब स्वातंत्र्याच्या विरोधात आहेत, असा लावला.

**डॉ. बाबासाहेबांचे स्फुटलेख** : दीनमित्र, जागरूक, डेक्कन रयत, विजयी मराठा, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका अशा काही तत्कालीन वृत्तपत्रांमधून अस्पृश्य समाजाच्या प्रश्नांची चर्चा होत असे. 'केसरी' मध्ये मात्र फारशी होत नसे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या 'मूकनायक' ची जाहिरात मोफत करण्याची केसरीकारांना विनंती केली होती; परंतु ती त्यांनी धुडकावून लावली. त्यावर 'तुमचा आकार देतो, छापा' असे कळविल्यावर त्यांनी 'जागा नाही,' असे कळविले होते. तेव्हापासून केसरी आणि लोकमान्य टिळक यांच्याविषयी बाबासाहेबांच्या मनात अढी निर्माण झाली. ती त्यांच्या अनेक स्फुटलेखांमधून व्यक्त होताना दिसते. 'लो. टिळक हे स्वत:ला स्वराज्याचे मायबाप समजतात', स्वराज्य हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क असला, तरी ब्रिटिशांच्या हातून ते हिसकावून घेणार का? 'डेमोक्राट' या पत्राचा उद्देश सांगताना जो केसरीकारानी लपंडाव केला आहे, तो चव्हाट्यावर आणण्यासारखा आहे, 'सक्तीचे शिक्षण करून मागासलेल्या व बहिष्कृत वर्गातील मुलांना साक्षर करण्यास आणि उत्पन्नाचा अपव्यय करण्यात काय हशील, असे केसरीकारांना वाटल्यास नवल नाही' चांभाराचा गणपती आपण गाडीत घेतला, असे भर सभेत सांगून, लो. टिळकांनी सर्वांस चपापून टाकले. लो. टिळकांनी पुण्यातील एका व्याख्यानात, 'ब्राह्मणेतरांत ऐक्याची भावना नाही असा अज्ञानपणाचा वाद लढविला आहे', अशी बाबासाहेबांची अनेक विधाने ही मूळाबरहुकूम तपासून पाहण्यासारखी आहेत. अस्पृश्यता निवारणासंबंधी जेव्हा ढोंगी कल्पना आणि विचार विविध पत्रांमधून छापून येत असत, तेव्हा बाबासाहेब त्यांचा 'मूकनायक' मधून खरपूस समाचार घेत असत.

**पां. न. भटकर आणि ज्ञा. ध्रु. घोलप या संपादकद्वयांच्या कारकीर्दीतील 'मूकनायक'मधील लेखन** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनला गेले आणि 'मूकनायक' च्या संपादकत्वाची जबाबदारी भटकरांवर आली. यादरम्यान नागपूरची अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद संपन्न झाली होती. तिचा सविस्तर विशेषांक निघाल्याने त्यामध्ये अग्रलेख लिहिण्याचा प्रश्नच नव्हता. पण पुढील दोन अंकातही ते लिहिले गेले नसावेत. त्यानंतर मात्र घोलप संपादक झाले आणि तेराव्या अंकापासून शेवटच्या एकोणिसाव्या अंकांपर्यंत सलग काकगर्जना, सिंहप्रतिबिंब, दास्यावलोकन, मागून आलेले लोण पुढे पोचविणे, आमचा संदेश, उन्नतीचे साधन आणि हिंदी राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा असे सात अग्रलेख प्रसिद्ध झाले. तसेच क्षेमसमाचार या सदराखाली शंकराचार्य की शर्कराचार्य, केसरीचा हुंदका, पण हे केंव्हा?, छत्रपती आणि सामाजिक सुधारणा, हृदयस्फोट, पेशवाई पाताळीयंत्र, द्वेषाचा पारा, हेच ते गूढ, जाती वर्चस्वाचे डोहाळे, लोकमान्य ह्यैस झाले, स्त्री शिक्षणासंबंधी मननीय उदगार, आमची चळवळ, हे नाते कोणते?, बहिष्कृत मतदारांस इशारा, पिशाच्च भक्त, पेशवाईची पुनरावृत्ती आणि प्रेम की सूड असे एकूण सतरा स्फुटलेख प्रसिद्ध झाले.

**अग्रलेख** : ३१ जुलै, १९२० च्या तेराव्या अंकात, सुरुवातीलाच, या अंकापासून 'मूकनायक' पत्राची अंतरव्यवस्था बदललेली आहे. तरी संपादकीय लेख व इतर सर्व पत्रव्यवहार या. रा. ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्या नावे करावा, अशी सूचना करण्यात आली आहे. त्यामुळे उपरनिर्दिष्ट सर्व लेखन नामनिर्देश नसलेल्या विविध लेखकांनी केलेले दिसते. 'काकगर्जना' या पहिल्याच अग्रलेखात, 'बहिष्कृतांच्या उन्नतीस विरोध करणाऱ्या मूठभर ब्रह्मवृंदाच्या निरर्थक काकगर्जनेस न जुमानता

छत्रपतींनी आपल्या सत्य आणि न्यायी चळवळीपासून रतीभरही ढळू नये', अशी छ. शाहू महाराजांना विनंती करण्यात आली आहे. 'सिंहप्रतिबिंब' लेखात, संपादकांनी 'आपण धनगरांच्या मेंढ्यांच्या कळपातील सिंहाप्रमाणे प्रत्यक्ष सिंह असून स्वत:ला मेंढरेच म्हणवून घेणार का? 'असा बहिष्कृत लोकांना आव्हानात्मक प्रश्न विचारला आहे. तर 'दास्यावलोकन' या लेखात, दलितांच्या पूर्वापार शोषणाचा आढावा घेऊन, 'बहिष्कृतांच्या घरी तापलेल्या दुधावरील मलई तुपाच्या रूपाने मुसलमान व्यापाराच्या मार्गाने गेली तरी पवित्र देवास स्नान घालून यांच्या (पुढारलेल्या बंधूंच्या) कोपर ओगळाने उदरभरात गेली तरी चालते. पण, बहिष्कृतपणाची कीड काढण्याचे यांना धैर्य काही होत नाही', अशी मल्लीनाथी करण्यात आली आहे. ही कीड काढण्यासाठी आपणच आता सज्ज झाले पाहिजे हे सांगताना, 'आमचा संदेश 'या लेखात, हे बहिष्कृत तरुणा, अज्ञानरूपी निद्रेला सोडून, मी कोण?, माझे खरे स्वरूप काय?, माझा निसर्गदत्त परिस्थितीशी संबंध काय?, सृष्टीने मला का उत्पन्न केले आहे?, हल्ली माझी काय स्थिती आहे आणि पुढे काय होणार आहे? यांचा विलंब न करता आताच विचार करून आपल्यावरचा अन्याय दूर करण्यासाठी, नित्यश: होत असलेला अपमान त्यजण्यासाठी तयार हो!' असा आव्हानात्मक संदेश दिला आहे. तर 'उन्नतीचे साधन' या लेखात, 'ते साधन म्हणजे शिक्षण असून ते आधाशीपणे प्राशन करून, सुधारणेच्या चढाईत आपलाही नंबर वरतीच पटकावण्याची संधी व्यर्थ दवडू नये' असा सल्ला देण्यात आला आहे. शिक्षणासोबतच, 'नर करणी करेगा तो नारायण बन जायेगा, ही म्हण सतत मनात ठेऊन, सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील त्याचे, या समर्थांच्या उपदेशाप्रमाणे वागण्याचा संदेश, 'हिंदी राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा' या लेखात दिला आहे. या सर्व अग्रलेखांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा संदेश सर्वदूर पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**स्फुटलेख आणि अन्य लेख** : तत्कालीन महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारणासाठी चाललेल्या चळवळी, आधी सामाजिक की आधी राजकीय सुधारणा, डिप्रेस्ड क्लास मिशनअंतर्गत सुरू असलेला दलितोध्दार, सार्वजनिक पाणवठे, शाळा, मंदिरे येथे बहिष्कृत लोकांवर होणारे अत्याचार यासंबंधीच्या घडामोडी आणि वृत्तपत्रांमधून येणाऱ्या बातम्या यांवर आधारित अनेक स्फुटलेख 'मूकनायक' मधून प्रसिद्ध होत असत. शंकराचार्य की शर्कराचार्य, जातिवर्चस्वाचे डोहाळे, पेशवाई पाताळीयंत्र, पेशवाईची पुनरावृत्ती, प्रेम की सूड?, केसरीचा हुंदका असे काही स्फुटलेख तपासून पाहण्यासारखे आहेत. परदेशात हिंदी बांधवांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी येथे सामाजसुधारक सभा घेऊन, तेथे पायबंद घालू पाहतात. पण येथल्या बहिष्कृत लोकांचे काय?, दस्तुरखुद्द छ. शाहू महाराज बहिष्कृत लोकांना उन्नतीचे मार्ग उपलब्ध करून देत असताना, बृह्मवृंदांच्या पोटात का दुखते? असे प्रासंगिक विचार सदर स्फुटलेखांमधून मांडून, समाजधुरिणांना जाब विचारून, बहिष्कृत लोकांना जागृत करण्याचे काम 'मूकनायक' च्या संपादकांनी पार पाडले.

'मूकनायक' मधून अन्य लेखकांनी लिहिलेले लेख हे पाक्षिकाच्या ध्येयधोरणांनुसारच होते. आधुनिक काळात हिंदुस्थानचा सामाजिक दर्जा (मु. ना. खंडकर), रिकामा न्हावी कुडाळला तुंबड्या लावी (बा. ग. भातनकर), अस्पृश्य बंधू आपल्या पायावर उभे राहतील काय? (कों. शि. सकट), ब्राह्मणांचा विचित्र सोवळेपणा (टोळके), असहकारिता आणि बहिष्कृत समाज (पोळके) असे मोजकेच पण ते नेमके होते. हिंदुस्थानातील जाती, धर्म, पंथ आणि येथल्या रुढीपरंपरांचा आढावा घेऊन खंडकर म्हणतात, 'जगातील इतर राष्ट्रांमध्ये प्रगती फार झपाट्याने चालली आहे. ती दूर गेल्यावर हा देश अतिशय मागे राहील आणि हिंदुस्थानची स्थिती जगापुढे अगदी हीन-दीन पशुवत अशी दिसेल... याचा, ज्याला आपल्या मातृभूमीची उन्नती व्हावी असे वाटत असेल त्याने विचार करणे बरे'. तर कोंडिराम सकट आपल्या बांधवांना सांगतात, 'आमच्या दीनबंधुंनी डॉ. बुकर वॉशिंग्टन सारख्या थोर पुरुषांचे चरित्र मनन करून आपल्या ज्ञातीची ब्राह्मणशाहीपासून मुक्तता केली पाहिजे'. आगगाडी, स्टेशन, हॉटेल आदी सार्वजनिक ठिकाणी ब्राह्मणांचा सोवळेपणा कुठे जातो? असे विचारून पोळके त्यांना आवाहन करतात, की 'जर तुम्हाला राष्ट्रीय ऐक्याची जरुरी वाटत असेल तर विलंब न लावता सहा कोटी प्रजेवरील अनिष्ट धार्मिक व सामाजिक बंधन नाहीसे करून, त्यांचेशी सहकारित्वाने राष्ट्र कार्य साधण्यातच खरा धर्माभिमान व राष्ट्राभिमान आहे'. पण त्यांचा अहंभाव आडवा येतो. त्यामुळे पोळके यांना अशा अहंभावी याऐवजी ब्रिटिशच बरे, असे उद्वेगातून सांगताना लिहितात, 'बहिष्कृतांनी आपल्या मायबाप सरकाराशी विरोध करणे म्हणजे अतिनीच कृत्य आहे, असे समजून पुढे सरकारला ज्या ज्या अडचणी येतील, त्या त्या वेळी आपले क्षात्रतेज दाखवून ब्राह्मण, बनियांना पळता भुई थोडी करून टाकली पाहिजे'. 'मूकनायक' मधील हे सर्व अग्रलेख, स्फुटलेख आणि अन्य लेखकांनी लिहिलेले लेख म्हणजे तत्कालीन समाजातील अस्पृश्योध्दार चळवळीचे आणि त्यानिमित्तच्या घडामोडींचे स्वच्छ प्रतिबिंब आहेत.

**'मूकनायक' मधील अन्य सदरे** : दलितांच्या व्यथा, वेदना आणि समस्यांचे चित्रण करणारी इतरही अनेक सदरे 'मूकनायक' ची वैशिष्ट्ये होती. आमची हालचाल, आमची जखम, कुशल प्रश्न, काठीचे सपाटे (वेसकर), कळावे की, शेला पागोटे (जावई), पत्रव्यवहार, वर्तमानसार, मननीय उद्‌गार, निवडक पत्रातील उतारे अशी त्यांची नावे होती. महाराष्ट्रातील बहिष्कृत समाजातील घडामोडी, अन्यायकारक घटना, चळवळीविषयक सभा, परिषदा, यासंबंधीचे लेखन सदर सदरातून प्रसिद्ध होत असे. शिवाय अस्पृश्येतर समाजसुधारक आणि त्यांच्या दलितांच्या उद्धारासाठी केलेल्या प्रयत्नांची, त्यातील ढोंगी




**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना 'मूकनायक' सुरू करण्यासाठी आर्थिक मदतीचा हात पुढे करणारे आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांच्या उपस्थितीत माणगाव येथे २१ आणि २२ मार्च १९२० रोजी दक्षिण महाराष्ट्र वर्ग परिषद पार पडली. ही परिषद म्हणजे बाबासाहेबांचा पहिला सार्वजनिक कार्यक्रम होय.**

आणि फोलपणा यांचीही दखल या सदरातून घेतली जात असे. विविध वृत्तपत्रांनी दलितविषयक दिलेल्या बातम्या, लेख, टिपणे, सभा, परिषदा यांचा गोषवारा याविषयीची खुलेआम चर्चा, खरपूस समाचार असेही त्यांचे स्वरूप होते. यापैकी पाठीचे सपाटे आणि शेला पागोटे ही दोन सदरे परखडता आणि विडंबनात्मकता यासाठी संस्मरणीय होती.

**समारोप** : अस्पृश्योध्दार चळवळीतील 'मूकनायक' चे योगदान, फलश्रुती आणि यशस्वीता आज ३१ जानेवारी, २०२० रोजी शंभर वर्षांनंतर तपासून पाहायची असेल, तर या पाक्षिकाचे फक्त सहावा आणि दहावा हे दोन अंक प्रत्यक्षच अभ्यासावयास हवेत. २१ व २२ मार्च, १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मु. माणगाव, कागल संस्थान येथे 'दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची पहिली परिषद' संपन्न झाली. या परिषदेस स्वत: छत्रपती शाहू महाराज उपस्थित होते. ते म्हणाले, 'मी डॉक्टर आंबेडकरांचे भाषण ऐकण्यासाठी आलो आहे'. यावेळी त्यांनी केलेल्या उत्स्फूर्त भाषणातून दलितांविषयीची कणव आणि त्यांच्या उन्नतीसाठी केलेले संकल्प महनीय होते. तर बाबासाहेबांचे पहिल्या दिवशीचे भाषण बहिष्कृत लोकांना दिग्दर्शन करणारे होते. दि. ३०, ३१ मे आणि १ जून, १९२० या तीन दिवशी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे पहिली 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद' संपन्न झाली. या परिषदेत छत्रपतींचे जे प्रदीर्घ, मुद्देसूद, बहिष्कृत लोकांचे मन हेलावून टाकणारे आणि त्यांच्या आशा पल्लवीत करणारे भाषण वाचण्यात आले, ते जसेच्या तसे दहाव्या अंकात प्रकाशित करण्यात आले आहे. या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी केलेले मार्गदर्शन, परिषदेची भूमिका आणि कर्तव्य यांविषयी केलेले मुक्तचिंतन तसेच या परिषदेत पारित करण्यात आलेले ठराव मूळाबरहुकूम 'मूकनायक' मध्ये पहावयास मिळते. हे दोन्ही अंक आज मौलिकच आहेत.

राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वातंत्र्य या दृष्टिकोनातून विचार करणाऱ्या 'मूकनायक' मधील लेखनाने टिळकांचा 'केसरी' आणि आगरकरांचा 'सुधारक' यांमधील लेखनाच्या बरोबरीची झेप घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. विचारजागृतीची बीजे तत्कालीन दलितांच्या मनात रूजवून त्यांना अन्याय-अत्याचाराविरूध्द बंड पुकारण्यास 'मूकनायक' ने शिकवले.

●●●

**संदर्भ:** १. मून वसंत (संपादन), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, नोव्हेंबर, १९९०.

२. निर्मळे हरिश्चंद्र, दलितांची नियतकालिके, सुगावा प्रकाशन, पुणे, जानेवारी, १९८७.

डॉ. हरिश्चंद्र निर्मळे, पुणे.
मोबा. ७७०९८१७७१०

# ‘मूकनायक’ विरूद्ध मौनव्रत



जयदेव डोळे

**मराठी पत्रकारितेत ब्राह्मण जातीचे वर्चस्व त्यांच्या ताब्यात असलेले लेखन, वाचन, ज्ञान यांचे अधिकार यामुळे होते. आजही असंख्य संपादक व पत्रकार ब्राह्मण आहेत. मात्र गेल्या २५ वर्षांत बहुजन समाजातील अथवा ब्राह्मणेतर पत्रकारांची संख्या भरपूर झाली आहे. संपादक आणि अन्य महत्त्वाची पदे ब्राह्मणेतरांकडे येत आहेत. ते ती समर्थपणे भूषवत आहेत. तरीही जात या अत्यंत उपद्रवी व विनाशकारी विषयाचा धाडसाने ऊहापोह केला जात नाही. अग्रलेखांमधून जातीय विषमता व जातींमुळे होणारे अत्याचार यांचा धिक्कार केलेला असतो. मात्र तरीही वृत्तपत्रांनी जातीची घाण मराठी समाजातून जावी यासाठी अन्य काही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. यामागे काय कारणे असतील? एक पत्रकार व त्याची जात यात काय नाते असावे?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा पाया जात आहे. ‘मूकनायक’ पाक्षिकाचा आरंभ ३१ जानेवारी १९२० रोजी करून त्यांनी हिंदू धर्माच्या या सर्वात घाणेरड्या विषयाला हात घातला. जातिव्यवस्था, अस्पृश्यता, विषमता आणि या सर्वांनी भारताची केलेली दुर्बलावस्था हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा मूलाधार! म्हणून डॉ. आंबेडकरांनी जातीय अथवा जातियवादी पत्रकारिता जन्माला घातली असे म्हणायचे का? मुळीच नाही. त्यांनी मूकनायकाच्या पहिल्याच अग्रलेखात मराठीतील पत्रे कशी जातीय हितसंबंध राखणारी आहेत ते नावे घेऊन जाहीर केले होते. अस्पृश्यांचा कैवारी कोणीच नाही यासाठी मूकनायक (आणि त्यानंतर बहिष्कृत भारत, जनता, समता, प्रबुद्ध भारत) सुरू केले. डॉ. आंबेडकर यांची पत्रकारिता तटस्थ, नि:पक्ष अथवा समतोल अजिबात नव्हती. जात या विषयाविरूद्ध लिहिणाऱ्याला तटस्थपणा काय कामाचा? ठायीठायी विषमता व अन्याय उभे करणाऱ्या जातींविषयी कोण बरे नि:पक्ष राहू शकेल?

त्यामुळे ‘मूकनायक’ पत्र रोखठोक आणि सुस्पष्ट विचारांचा अभ्यासू व तर्कनिष्ठ प्रचारक होते. ते मित्र फार थोड्यांचे होते. शत्रू अनेकांचे ठरले! ज्यांना जात प्रिय असते, ज्यांचे जातिप्रथेत खूप भले होत असते, ते अवघे मूकनायकाच्या लेखी शत्रूच. या लेखात मूकनायकाच्या शतकानिमित्त त्यातील आशयाची चर्चा करायची नाही. आशय सर्वज्ञात आहेच. प्रश्न मूकनायकाचा वसा व वारसा पुढे मराठीत किती जणांनी चालवला याचा धांडोळा घेण्याचाही नाही. जात आणि पत्रकार-वाचक यांचे नाते इ.स. २०२० पर्यंत कसे आहे? त्याचा कोणी ऊहापोह केलेला आहे काय? आजचे पत्रकार जातमुक्त झाले आहेत काय? आजची पत्रे मूकनायकावेळच्याच परिस्थितीत जगतात काय? असे प्रश्न आपण उकरले व उकलले पाहिजेत.

सुरुवात आद्य पत्रकारापासून करू. बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी ‘दर्पण’ साप्ताहिक जन्माला तर घातलेच पण मार्च महिन्यापासून त्यांनी जात या विषयावर एक चर्चाही सुरू केली, जातिप्रथा वाईट आहे हे त्यांचे मत जाहीर करून! त्यामुळे जर मराठी पत्राचा जनकच ‘जात’ या विषयाची उघड चर्चा करून ती निंदनीय व विषमताउत्पादक ठरवतो, तर पुढे प्रत्येक पत्रकाराला ती करण्यात लाज वाटायचे काही कारणच नाही. पण तसे क्वचितच घडले. लोकहितवादी (गोपाळ हरी देशमुख), जोतिराव फुले आणि त्यांचे सत्यशोधक साथीदार, गोपाळ गणेश आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराजांच्या प्रभावाखालील पत्रकार साने गुरूजी आणि ब्राह्मणेतर चळवळीमधील विविध पत्रे वगळता जात या विषयाची वेळोवेळी उलाढाल कोणीही केली नाही. ज्यांनी जातीची चर्चा करून ती घालवली पाहिजे असे म्हटले त्याचाही येथे उल्लेख नको. कारण त्याची उजळणी होईल. त्याऐवजी दुसरी काही अज्ञात व अप्रसिद्ध उदाहरणे घेऊ.

मराठी पत्रकारितेत ब्राह्मण जातीचे वर्चस्व त्यांच्या ताब्यात असलेले लेखन, वाचन, ज्ञान यांचे अधिकार यामुळे होते. आजही असंख्य संपादक व पत्रकार ब्राह्मण आहेत. मात्र गेल्या २५ वर्षांत बहुजन समाजातील अथवा ब्राह्मणेतर पत्रकारांची संख्या भरपूर झाली आहे. संपादक आणि अन्य महत्त्वाची पदे ब्राह्मणेतरांकडे येत आहेत. ते ती समर्थपणे भूषवत आहेत. तरीही जात या अत्यंत उपद्रवी व विनाशकारी विषयाचा धाडसाने ऊहापोह केला जात नाही. अग्रलेखांमधून जातीय विषमता व जातींमुळे होणारे अत्याचार यांचा धिक्कार केलेला असतो. मात्र तरीही वृत्तपत्रांनी जातीची घाण मराठी समाजातून जावी यासाठी अन्य काही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. यामागे काय कारणे असतील? एक पत्रकार व त्याची जात यात काय नाते असावे?

९ जानेवारीस औरंगाबादेत विवेकानंद महाविद्यालयात

एका व्याख्यानमालेत 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांचे माध्यमांवर व्याख्यान झाले. वक्त्यांचा परिचय देणाऱ्यांनी कुबेर यांच्यावर एक स्लाईड शो तयार केला होता. एका ठिकाणी कुबेर यांची सुधीर गाडगीळ मुलाखत घेतानाची स्लाईड आली. मुलाखतीचे ठिकाण कऱ्हाडे ब्राह्मण संघ, डोंबिवली असे सांगणाऱ्या व्यासपीठाचे होते. आश्चर्य वाटले, जातीच्या व्यासपीठावर एक विचारी संपादक का जातो याचे. कुबेर याच जातीचे आहेत. शास्त्रज्ञ, क्रीडापटू, कलावंत आपापल्या जातींच्या व्यासपीठावर जाणे मला अनुचित वाटते. तसे संपादकानेही गेले नाही पाहिजे हे माझे मत. बाकीच्यांचे जाणे एकवेळ क्षम्य होईल. पण संपादक कसा काय जाऊ शकतो? तो तिथे काय बोलला, व्यक्तिगत जीवनात तो कितपत जातिमुक्त आहे, हे विषय उपस्थित होत नाहीत.

आणखी एक अनुभव. शहरातीलच एक ज्येष्ठ पत्रकार (पन्नाशीच्या आसपासचा) माझ्या घरी आला असता त्याच्या वृत्तपत्रात जातीपातीचा कसा बुजबुजाट झालाय त्याची तक्रार करीत होता. ओबीसी व दलित पत्रकार सहकाऱ्यांची कशी युती होतेय अशी त्याची चिंता होती. आपण ब्राह्मण असलो तरी आपल्या मनात जातपात कशी नाही हेही तो ठसवू पाहात होता. मी त्याला समजावले, की मनात काय नाही आणि डोक्यात काही नाही हे ब्राह्मण पदाधिकाऱ्याने ठरवायचे नसते. तू परिवर्तनवादी, जातिमुक्त आहेस असे अनुभव ब्राह्मणेतरांना आल्याखेरीज तुझे ब्राह्मण्य दूर होणार नाही. तू दलित समस्या, जातिप्रथा, विषमता, आरक्षण, अत्याचार आदी विषयांवर तुझी ठाम व प्रामाणिक भूमिका वारंवार जाहीर करणार नाहीस तोवर तू 'जातीयवादी' मानला जाणार. तू जोवर तुझी जात दोषी आणि गुन्हेगार आहे हे मानणार नाहीस तोवर तूही इतरांसारखा सवर्ण मनाचा म्हणून ओळखला जाणार. जात जशी एकत्र आणते, तसे समान हितसंबंध आणि समान शत्रू असणारे लोक एकत्रच येणार. त्यांच्या लेखी परंपरेचे पालन करणारे सारे दुष्टच. त्यांचे काही चूक नाही. वाचक बहुजन अधिक आहे, पत्रकारितेत बहुजन प्राधान्याने येत आहे, राजकीय सत्तेत तर जवळपास सारे बहुजन आहेत. मग पत्रकारितेत ब्राह्मणी मक्तेदारी व हितसंबंध कशासाठी सांभाळायची असा विचार या तरूण पिढीचा आहे. आपण काही करायचे नाही, कशाला जोडून घ्यायचे नाही, शोषितांचे व उपेक्षितांचे पक्ष घ्यायचे नाहीत; मग कोण कोणाला मान देईल अन् का म्हणून?

फुले, आंबेडकर, शिंदे, साने गुरूजी, जवळकर, अत्रे, बाबा दळवी असे असंख्य संपादक आधी कार्यकर्ते होते, नंतर ते संपादक म्हणून नावाजले. संपादकाने नुसता विचार मांडून अथवा तत्त्वविस्तार करून थांबायचे नसते. तत्त्वाचा कार्यक्रमही त्याने द्यायचा असतो व त्यात सामीलही व्हायचे असते. मराठी संपादक व पत्रकार यांची परंपरा विद्वानांची नाही. ती कार्यकर्त्यांची आहे. संपादक आज नोकर-कर्मचारी असतो. म्हणून तो कोठे सहभागी होऊ शकत नाही, हे कारण लटके आहे. एरवी सर्व तऱ्हेच्या 'इव्हेण्टस्'मध्ये ते असतात. मग एखाददोन घटना जातपात तोडक किंवा आंबेडकर-फुले-लोहिया-आगरकर यांच्या विचारांचा गजर करणाऱ्या आयोजिल्या तर काय बिघडले? केवळ कोरडे शब्द सजावटीने सादर करणारे संपादक मराठीने खूप बघितले. त्या शब्दांची कृतीशी जोड देणारे संपादक श्रेष्ठ असतात.

अग्रलेखांना इंग्रजीत 'लीडर' म्हणतात. म्हणजे जी भूमिका घेऊन वृत्तपत्र चालते ते स्थान. संपादक असा शाब्दिक नेता होऊन कसे चालेल? जातीचा काच हिंदूराष्ट्रवाद्यांच्या सत्ताकाळात बेसुमार वाढला असताना काही कृती करायला हवीच. संपादक सर्वांचा असला तरी तो दुर्बलांचा अधिक असतो.

संपादकाची जडणघडण कशी असावी यावर 'संपादकाचे जीवनस्वप्न' असे पुस्तक १९५२ साली लिहिणारे द्वा.भ. कर्णिक यांनी पत्रकारिता व जात हा प्रश्न किती छान हाताळला याचा हा मासला पाहा. ''आपल्या वर्तमानपत्रात दररोज छापून येणारी नावे तुम्ही सहज चाळून पाहा, नव्वद टक्के ही नावे तुम्हाला ब्राह्मण, प्रभु व सारस्वत किंवा अशाच पांढरपेशा वर्गातील आढळतील. बातमीपत्रांतही त्याच नावांची गर्दी असते... खरे पाहिले तर आपला बहुसंख्य वाचकवर्ग हा बहुजन समाजातीलच असतो. लब्धप्रतिष्ठित पांढरपेशा वर्ग मराठी वर्तमानपत्रांची बहुशः उपेक्षाच करीत असतो... पण आमचा हा आधारस्तंभ असलेल्या बहुजन समाजाचे सामाजिक जीवन आमच्या वर्तमानपत्रांतून कितीसे प्रकट होत असते?... आमचा दृष्टिकोन अद्यापही पांढरपेशा राहिलेला आहे आणि तो बदलणे आवश्यक आहे.'' (किर्लोस्कर प्रेस प्रकाशन, पृष्ठे २८,२९,३०)

कदाचित याच वाचकसंख्येकडे पाहून नारायण भिकाजी परुळेकर यांनी १९३२ साली 'सकाळ'ची स्थापना करताना संपादक म्हणून बाबासाहेब घोरपडे या मराठा जातीच्या पत्रकाराची नेमणूक केली. पुढे बाबासाहेबांचे चिरंजीव चंद्रकांत 'केसरी' दैनिकाचे अनेक वर्षे संपादक झाले. माझ्या पत्रकारितेचा आरंभ कॉ. अप्पासाहेब भोसले व कॉ. भास्करराव जाधव या मराठा-दलित, कम्युनिष्ट जोडगोळीच्या संपादकत्वाखाली झाला आहे. यानंतर मराठी पत्रकारितेत उत्तम कांबळे, भारतकुमार राऊत, यमाजी मालकर, प्रकाश पोहरे, महावीर जोंधळे, संजय राऊत, संजय आवटे, ज्ञानेश महाराव, विनोद शिरसाठ, श्रीराम पवार, वसंत भोसले आदी बहुजनांचा क्रम लागतो. हे सर्व (भारतकुमारांचा अपवाद) कार्यकर्ते म्हणूनही परिचित आहेत वा होते, हे विशेष! त्यांनी जातपात, विषमता, जातिविनाश याकडे कधीही पाठ फिरवली नाही. उलट त्याबद्दल कठोर भूमिका सातत्याने मांडल्या. व्यक्तिगत जीवनातही ते जातिप्रभावापासून दूर राहिले आहेत.

आज जिथून या विषयाला हात घातलाय तिथे जाऊ. म्हणजे जातीबद्दलची संपादकाची भूमिका खरोखर काय असते

तिकडे. अरूण साधू माझे एक वर्गशिक्षक होते आणि चार वर्षे मी एक शिक्षक म्हणून असताना माझे विभागप्रमुखही होते. पुणे विद्यापीठात (नामांतरापूर्वीच्या) वृत्तपत्र विद्या विभागात तेव्हाचे दोन नामवंत संपादक अरूण टिकेकर व कुमार केतकर साधूसरांचे मित्र असल्याने नेहमी येत असत. तिघांची फार जुनी मैत्री होती. त्या दोघांवर साधूसरांनी काय लिहिलेय ते या विषयासाठी महत्त्वाचे आहे : ''सुप्रसिद्ध कथालेखक आणि टिकेकरांच्या 'संडे क्लब'चे मेंबर शांताराम तथा के.ज. पुरोहित यांनी एका लेखात टिकेकरांना आपल्या कऱ्हाडे ब्राह्मण या उपजातीचा कसा अभिमान वाटतो व त्याबद्दल ते कसे बोलून दाखवितात हे लिहिले आहे. जांभेकर व पराडकर हे अनुक्रमे मराठी व हिंदीमधील आद्य पत्रकार कऱ्हाडे ब्राह्मणच असल्याचे अमूल्य समाजशास्त्रीय ज्ञान त्यामुळेच महाराष्ट्राला प्राप्त झाले यात संशय नाही. खरे म्हणजे ब्राह्मण जातीतील चित्पावनांना वेगळा अभिमान मिरविण्याची गरज नसते. कारण महाराष्ट्रातील यत्र-तत्र-सर्वत्र बहुतेक क्षेत्रातील शिखरस्थाने चित्पावनांनी काबीज केली आहेत... केतकर तो मिरवित नसले तरीही चित्पावन उपजातीचा त्यांचा छुपा जाज्वल्य अभिमान सर्वज्ञात असणार. आपल्याच उपजातीची चित्पावनांची-गंमतीने टवाळी करण्याच्या निमित्ताने त्यांचा हा अभिमान नसानसातून वाहताना दिसतो. दोघेही हास्यस्फोटक किस्से सांगत परस्परांच्या उपजातींची टिंगल करीत असतात. इतर उपजाती व ब्राह्मणेतर जातींबाबतही त्यांचे हे असे स्टिरियोटाईप पूर्वग्रह असणारच. हे सारे गंमतीने घ्यायचे असते हे ते दोघेही आवर्जून सांगत असतात. मात्र एखाद्या व्यक्तीचे मूल्यमापन करताना, समाजात वावरताना, सहकारी म्हणून नेमताना, सामाजिक व राजकीय विश्लेषण करताना त्यांचे हे पूर्वग्रह किंचितही आड येत नाहीत. हे अगदी ठळकपणे येथे अधोरेखित केले पाहिजे... केतकर स्वतः समाजशास्त्राचे अभ्यासक आणि टिकेकर निरीक्षक. त्यामुळे महाराष्ट्रातील कोणत्याही सामाजिक व राजकीय चर्चेत जातीच्या मुद्यावर एकदा तरी ठेचकाळल्याशिवाय पुढे जाता येत नाही हे त्यांना निश्चितच ज्ञात आहे.'' (विसरलेल्या आठवणींची कथा, ग्रंथाली, २०१९, पृष्ठ १२४-२५)

साधूंनी पत्रकारितेचा अत्यंत महत्त्वाचा विषय त्यांच्या दोन मित्रांच्या माध्यमातून आपल्यासमोर मांडला. तो म्हणजे जातीची चर्चा, विचार, मांडणी करायची असते. त्यावाचून महाराष्ट्राचे राजकारण-समाजकारण उलगडले जाणारच नाही, हा! तिन्ही मोठ्या लोकांनी ती केलेली आहे.

पत्रकारितेत आलेल्या प्रत्येकाला आपले पूर्वग्रह व संस्कार यापासून मुक्त होण्याची खूप मोठी संधी मिळत असते. एक तर पत्रकारिता एक सांघिक उत्पादन असते आणि दुसरे, ती पूर्णपणे समाजाधिष्ठित असते. ईश्वर, नशीब, पूर्वजन्म, श्रद्धा आदींनी ती नियंत्रित नसते. विविध तऱ्हांचे लोक पाहता पाहता मनातील अनेक कंगोरे व टोके झिजून जात एक छान सम्यक, संयमी व प्रागतिक दृष्टी प्रत्येक पत्रकार प्राप्त करू शकतो. ती अर्थातच तुम्ही किती निरहंकारी, निर्वैर आणि निश्चित असता यावर अवलंबून. पत्रकार जर जातपालन करणारा राहिला तर त्याला 'मूकनायक' जातीय वाटेल. दैनिक सम्राट, पाक्षिक प्रबुद्ध भारत आणि कदाचित 'द पीपल्स पोस्ट' देखील जातीय वाटेल. 'समता' आणि 'तरूण भारत' वाचणाऱ्याला मग काय म्हणावे? त्यांच्या संपादकांना व त्या पत्रकारितेला जातीय म्हणू शकू काय? 'टाइम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्र समूह जैन आडनावाच्या मालकांच्या हातात आहे. त्यांनी जैन धर्मातील बरीच तत्त्वे आपल्या वृत्तपत्रात रुजवली आहेत. मांसाहार, मद्यपान यांच्या जाहिरातींवर त्या वृत्तपत्रांत बदी आहे. हिंसक छायाचित्रे त्यांत छापली जात नाहीत. धर्म व अध्यापन यांवर त्यांत नियमित लिखाण येते.

जातींच्या संघटना उभ्या राहू लागताच आणि त्या स्वजातीविषयी आत्यंतिक हळव्या होताच महाराष्ट्रातील पत्रसृष्टीत जात या विषयावरची चर्चा थांबली. प्रत्येकाने स्वप्रेम आणि निर्दोषत्व इतके प्रखर, की कशाही मुद्यावर बोट ठेवताच ते बोट छाटून टाकण्याची धमकी पत्रकाराला मिळालीच म्हणून समजा. केतकर व टिकेकर खूप काळ पोलिस संरक्षणात वावरले ते यांमुळे. जात व असहिष्णुता आज राज्यात हातात हात घालून सारे व्यवहार करतात. त्यावर कोणी आक्षेप घ्यायचा नाही असा त्यांचा धाक आहे. म्हणून 'मूकनायक'चे शतक साजरे करताना डॉ. आंबेडकरांनी केवळ अफाट धाडस केले याचे अपरंपार कौतुक वाटते. आज डॉ. बाबासाहेबांची जातिव्यवस्थेविषयीची उद्धरणेही कोणती वृत्तपत्रे छापत नाहीत इतकी ती भित्री झालेली आहेत! म्हणूनच ती जात या विषयापुरती मौनात गेली आहेत. एखादेही वाक्य टीकेचे आढळले, की संबंधित जात त्या वृत्तपत्रावर बहिष्कार, मोर्चा, माफी येथपर्यंत जाते.

जात आजचा सर्वाधिक लाभदायक स्वपरिचय झाला असून कोणीही व्यक्ती तो टाकून द्यायला तयार नाही. खरे तर प्रत्येक जातच आत्मचिंतन, आत्मटीका, आत्मपरीक्षण करणे थांबवू लागल्याने तीच एक मौनव्रत घेऊन बसली आहे. पत्रकारिता बिचारी एकटी काय पुढाकार घेणार? पत्रकारितेत येणारी तरूण पिढी आपल्यावरील जातीचे, धर्माचे संस्कार पुसून टाकायला म्हणूनच तयार नाही. अमूक एका जातीचा सदस्य म्हणून पत्रकार सार्वजनिक जीवनात जर लाभ घेत असेल तर तो वृत्तपत्राच्या कार्यालयात जातमुक्त कसा राहू शकेल? अशी मानसिक विभागणी त्याला/तिला कशी करता येईल? ती करता आली पाहिजे. पूर्वी ब्राह्मण बहुसंख्येने पत्रकारितेत होते. त्यांना बहुसंख्याकांच्या लोकशाही राज्यव्यवस्थेने राजकारणातून बाहेर टाकले. म्हणून ते स्वतःला जातमुक्त, तटस्थ मानू लागले. 'ॲण्टी एस्टॅब्लिशमेण्ट' असे वर्णन स्वतःच्या पत्रकारितेचे करू लागले. आज प्रत्येक जात एस्टॅब्लिशमेण्टमध्ये सामील होताच स्वतःवर टीका करीनाशी झाली आहे. म्हणूनच मौनव्रत जिकडे-तिकडे दिसते आहे. ●●●

# कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे?



देविदास तुळजापूरकर

**भारतीय रिझर्व बँकेने १ जानेवारी २०१९ रोजी एका परिपत्रकाद्वारे छोट्या आणि मध्यम आकारातील उद्योगांना वाटलेली कर्जे पुनर्रचित करण्याची मुभा दिली आहे, ज्यात मुद्रा योजनेसाठी वापरण्यात आलेल्या सहा लाख कोटी रुपयांच्या कर्जाचादेखील समावेश आहे. ज्या कर्जाकडे तर बँकर्सपासून सगळेच संभाव्य थकित म्हणून पाहतात, ज्यातील बव्हंश थकीत कर्जे १ जानेवारी २०१९ च्या परिपत्रकान्वये पुनर्रचित केली जात आहेत. यापलीकडे जाऊन अर्थव्यवस्थेची कठीण परिस्थिती पाहता बँका स्वत: पुढाकार घेऊन छोट्या आणि मध्यम आकाराच्या उद्योगांना अल्प मुदतीचे कर्ज मंजूर करून त्यातून थकित कर्ज वसुल करून घेऊन संभाव्य थकित कर्ज पुढे ढकलत आहेत. याचाच अर्थ, २००८ ते २०१२ या यूपीएच्या राजवटीत मोठाली कर्जे देऊन थकित दडपण्यासाठी ज्या पुनर्रचना योजनांचा फायदा घेतला गेला त्याचीच आज पुनरावृत्ती होत आहे.**

रिझर्व बँकेने नुकतेच नियमित दोन अहवाल प्रसिद्ध केले आहेत. यातील एक अहवाल आहे, 'बँकिंगची प्रगती आणि दृष्टिकोन' (Trend & Progress in Banking), जो २५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला, तर वित्तीय स्थिरता (Financial Stability) हा दुसरा अहवाल त्यानंतर अवघ्या दोन दिवसांनी म्हणजे २७ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला. पहिला अहवाल वार्षिक असतो तर दुसरा अर्धवार्षिक.

यातील पहिल्या अहवालात रिझर्व बँकेने थकीत कर्जाच्या आघाडीवरील प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले आहे, तर दुसऱ्या अहवालात मार्चअखेर थकीत कर्जाचे प्रमाण वाढेल अशी शक्यता आणि चिंता व्यक्त करण्यात आली आहे. पण या दोन्ही अहवालात दिवाळखोरी कायद्यांतर्गत करण्यात आलेल्या कारवाईचे आणि त्या मार्गाने करण्यात आलेल्या वसुलीबाबत नुसतेच समाधान नव्हे तर कौतुकाचे उद्‌गार काढले आहेत. हे करत असताना या कायद्याच्या अनुपस्थितीत होणाऱ्या कुर्मगती वसुलीशी त्याची तुलना करत दिवाळखोरी कायद्यांतर्गत केलेल्या कारवाईचे कौतुक केले आहे.

१९९१ साली भारत सरकारने वैश्विक व्यवस्थेशी भारतीय बँकिंगला जोडण्याच्या प्रयत्नांना सुरुवात केली, तेव्हापासून आज २८ वर्षांनंतरदेखील बँकिंगच्या भवितव्याची चर्चा सतत एकाच प्रश्नाभोवती फिरत आहे. तो प्रश्न आहे थकित कर्जाचा. १९९१ पासून आजपावतो वसुली प्राधिकरणे सरफेसी (SARFESI) कायद्यांतर्गत प्रक्रिया आणि आता दिवाळखोरी कायद्यांतर्गत करण्यात येणारी प्रक्रिया या कायदेविषयक प्रक्रियांचा अवलंब करत थकीत कर्जाच्या वसुलीचे प्रयत्न केले गेले. १९९४-९५ मध्ये जेव्हा वसुली प्राधिकरणाअंतर्गत प्रक्रियेला सुरुवात केली गेली, तेव्हा 'आता पहा कशी पटापट वसुली होईल' असे बोलले गेले होते. पण या प्रक्रियेचा फायदा बँकांना जेवढा झाला त्यापेक्षा वकील मंडळीनाच जास्त झाला. कारण बड्या थकबाकीदारांनी महागडे-निष्णात वकील लावून वसुली प्राधिकरण-हायकोर्ट- सुप्रीम कोर्ट करत बँकांना वर्षोगणती झुलवले. सरकारचा उत्साहदेखील नव्या-नवलाईचा होता. नंतर कुठे प्रिसायडिंग ऑफिसर्स तर कुठे वसुली अधिकारी वर्षोगणती नेमले नाहीत. याच्या परिणामस्वरूप आज या वसुली प्राधिकरणात किमान लाखभर तरी दावे पडून आहेत, ज्यात सहा लाख कोटींपेक्षा जास्त रक्कम अडकून पडली आहे. या व्यवस्थेच्या यशापयशाचा ताळेबंद सरकारने कधीच मांडला नाही. या व्यवस्थेच्या अपयशाला जबाबदार कोण, याची कधी चर्चा झाली नाही. यातूनच सरकारच्या बड्या उद्योगांकडील थकीत कर्जाच्या वसुलीबाबतच्या हेतूबद्दल शंका निर्माण होते.

यानंतर कोर्ट-कचेऱ्या टाळाव्यात म्हणून कायदेशीर प्रक्रियापण कोर्टाबाहेर म्हणून सरफेसी (SARFESI) कायदा आला, ज्यात कर्ज थकित झाले, की कर्जदाराला नोटीस द्यायची आणि मग मालमत्तेचा सांकेतिक ताबा (SYMBOLIC POSSESSION) घ्यायचा आणि ती विक्रीला काढावयाची. या प्रक्रियेत एका टप्प्यावर महसूल खात्यातील प्राधिकृत अधिकारी (AUTHORISED OFFICIAL) मार्फत थकीत कर्जदाराला आवश्यक पूर्वअट

म्हणून नोटीस द्यावी लागते. पण हा टप्पा पूर्ण करणे खूपच अवघड जाते. कारण महसूल अधिकाऱ्याची ही सगळ्यात शेवटची प्राथमिकता असते आणि यात हितसंबंधियांनी कायदेशीर किंवा इतर दडपण किंवा प्रलोभन आणले तर मग विचारायलाच नको. यातूनही जर अडथळ्यांची शर्यत पार करत मालमत्ता विक्रीला काढली तर त्यासाठी खरेदीदार पुढे आले पाहिजेत किंवा त्यांनी स्पर्धायोग्य खरेदीचा देकार दिला पाहिजे. ज्या आघाडीवर बँकर्सकडे कुशल मनुष्यबळ नसल्यामुळे या प्रक्रियेत एक तर बँका अयशस्वी होतात किंवा गंडवल्या जातात, ज्यामुळे सरफेसी कायद्यांतर्गत वसुलीचा मार्गदेखील कुचकामी ठरला आहे.

यानंतर सरकारने २०१६ मध्ये दिवाळखोरी कायदा मंजूर करून नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनलमार्फत त्या प्रक्रियेला सुरुवात केली. या प्रक्रियेकडे पाहण्याचा मार्ग 'हुकमी एक्का' किंवा 'रामबाण उपाय' असा आहे आणि त्यातूनच या मार्गाच्या यशाची भलावण केली जात आहे. यासाठी या कायद्याच्या अनुपस्थितीत कूर्मगतीने होणाऱ्या वसुलीशी त्याची तुलना करत या प्रक्रियेचे कौतुक केले जात आहे. यासंदर्भात दिल्ली येथील सेंटर फॉर फायनान्शिअल अकाउंटॅबिलिटी (CENTRE FOR FINANCIAL ACCOUNTABILITY) या संस्थेने मे २०१९ मध्ये प्रसिद्ध केलेला अहवाल डोळे उघडायला लावणारा आहे.

दिवाळखोरी कायद्यांतर्गत नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनलसंदर्भित २३ खात्यांत ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या २३ उद्योगांकडून बँकांना येणे आहेत १.३२ लाख कोटी रुपये तर इतर देणेकरी मिळून ती रक्कम होते १.३७ लाख कोटी रुपये. पण सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर या उद्योगांकडून वसुली झाली आहे ६३,९८२ कोटी रुपये म्हणजे ही रक्कम वसूल करण्यासाठी ७३,७६३ कोटी रुपयांवर बँकांना पाणी सोडावे लागले आहे, ज्याला या कायद्याच्या परिभाषेत हेअर कट (HAIRCUT) असे संबोधले जाते. टक्केवारीच्या भाषेत ही रक्कम होते ५१.६३ टक्के एवढी. यात एकच खाते असे आहे ज्यात बँका पूर्ण रक्कम वसूल करू शकल्या आहेत तर चार खाती अशी आहेत ज्यात बँकांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक रकमेवर पाणी सोडावे लागले आहे. यात एक खाते असे आहे ज्यात बँकांनी ९९.७२ टक्के रकमेवर पाणी सोडले आहे म्हणजे ५,३६७ कोटी रुपयांपैकी बँका वसूली करू शकल्या आहेत अवघे १५ कोटी रुपये. त्यातही या प्रक्रियेवर झालेला खर्च यातून वजा केला तर बँकांना काही मिळाले असेल अशी शक्यताच नाही!

याशिवाय या प्राधिकरणाने १६ खात्यांत दिवाळखोरी जाहीर केली आहे. या उद्योगांकडून येणे रक्कम होती ४७,३३० कोटी रुपये, ज्यात त्या उद्योगांना दिवाळखोर जाहीर केल्यानंतर वसूल झालेली रक्कम आहे २,६६४ कोटी रुपये म्हणजे अवघी ५.६२ % एवढी.




**सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी गेल्या पाच वर्षात कर्जातील ४,९४,४५८ आहेत ४३,०५९ कोटी रुपये, तर छोट्या आणि मध्यम आकाराच्या उद्यो २.८५ लाख कोटी रुपये बड्या उद्योगांकडे थकीत आहे.**

या दिवाळखोरी कायद्याची भलावण करताना तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांनी असे विधान केले होते, की भारतीय समाजात दिवाळखोरी शब्द दूषण देणारा आहे, ज्यामुळे पहा जादूच्या छडीसारखा या प्रक्रियेचा परिणाम दिसेल आणि उद्योग हे दूषण टाळण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेऊन थकीत कर्जाची परतफेड करतील. पण मजेची गोष्ट म्हणजे, या प्राधिकरणाकडे दाखल झालेल्या पहिल्या ८२ अर्जांमध्ये १८ देणेकरी उद्योगांनी स्वतःहून या प्राधिकरणाकडे अर्ज केला आहे, की त्यांना दिवाळखोर जाहीर करावे. याला काय म्हणावे?

या पार्श्वभूमीवर बँकांनी थकित कर्जाची रक्कम कमी करण्यासाठी एक साधा, सोपा आणि सरळ मार्ग निवडला तो म्हणजे राईट ऑफ. एवीतेवी रिझर्व बँकेच्या सूचनेनुसार बँकांना थकित कर्ज प्रकरणात घोटाळा असेल तर, गहाण मालमत्तेचे मूल्यांकन अपुरे असेल किंवा ते थकित दोन वर्षांपेक्षा जुने असेल तर १०० टक्के रक्कम उत्पन्नातून वजा करून त्यापोटी तरतूद करावी लागते. मग राईट ऑफच का नको? म्हणजे तेवढ्या रकमेने थकित कर्ज कमी होतात. तांत्रिकदृष्ट्या बँका या राईट ऑफ खात्यात वसुलीची प्रक्रिया पुढे नेऊ शकतात. पण वसुली होत नाही म्हणून ती राईट ऑफ केली जातात. हे कारण लक्षात घेतले तर अपवादानेच या खात्यांत काही




**कोटी रुपये राईट ऑफ केली आहेत, ज्यात शेतीला दिलेली कर्जे**
**ोगाला दिलेली कर्जे आहेत १.६६ लाख कोटी रुपये. उर्वरित रक्कम**

वसुली होऊ शकते. म्हणजे एका अर्थाने राईट ऑफ म्हणजे कर्जमाफीच होय.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी गेल्या पाच वर्षात कर्जातील ४,९४,४५८ कोटी रुपये राईट ऑफ केली आहेत, ज्यात शेतीला दिलेली कर्जे आहेत ४३,०५९ कोटी रुपये, तर छोट्या आणि मध्यम आकाराच्या उद्योगाला दिलेली कर्जे आहेत १.६६ लाख कोटी रुपये. उर्वरित रक्कम २.८५ लाख कोटी रुपये बड्या उद्योगांकडे थकीत आहे. बड्या उद्योगांकडे थकीत कर्जाची ही आकडेवारी खुद्द वित्त राज्यमंत्र्यांनी लोकसभेतील एका प्रश्नाला उत्तर देताना लोकसभेच्या पटलावर मांडली आहे, तर माहितीच्या अधिकारात सीएनएन न्यूज १८ च्या पत्रकाराला उत्तर देताना रिझर्व बँकेने असे सूचित केले आहे, की या राईट ऑफ खात्यात ५०० कोटी रुपयांवरील ७१ थकीत कर्जदार आहेत, ज्यांच्याकडून येणे रक्कम होती १.०७ लाख कोटी रुपये. १०० कोटी रुपयांवरील थकीत कर्जदार आहेत ९८०, ज्यांच्याकडून बँकांना येणे रक्कम होती २.७५ कोटी रुपये. एकट्या स्टेट बँकेने गेल्या पाच वर्षात १.६५ लाख कोटी रुपयांची थकीत कर्जे राईट ऑफ केली आहेत. एकदा एखादे कर्ज राईट ऑफ केले, की ते ताळेबंदाबाहेर जाते म्हणजे त्याच्याबद्दल मग काही बोलायलाच नको! हा आहे बँकांचा थकित कर्ज कमी करण्याचा साधा सोपा मार्ग? यावर संतुष्टता व्यक्त करून रिझर्व बँक भारत सरकारची भलावण जरूर करू शकते. आम जनतेजवळ एक भ्रम जरूर निर्माण करू शकते. पण ही काय थकित कर्जावरील उपाययोजना होऊ शकते?

रिझर्व बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, भारतीय बँकांतून २०१८-१९ अखेर ४८ कर्जखाती अशी आहेत, जी प्रत्येकी दहा हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक देणे लागतात, तर ७३९ अशी खाती आहेत ज्यांचे थकीत १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे, तर ६,६९९ खाती अशी आहेत ज्यातील थकित प्रत्येकी पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. याचाच अर्थ भारतीय बँकिंग व्यवसायात मोठा वाटा आहे बड्या उद्योगांचा, जे सामान्य माणसाची बचत वापरतात.

वित्तीय स्थिरता अहवाल अवघ्या दोन दिवसानंतर म्हणजे २७ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यात नमूद केल्याप्रमाणे एकूण कर्जरकमेत मोठ्या कर्जदारांकडून बँकांना देणे आहे ५१.८ टक्के, तर थकित कर्ज रकमेत मोठ्या कर्जदारांचा वाटा आहे ७९.३% एवढा. १०० मोठे कर्जदार बँकांना देणे लागतात एकूण कर्ज रकमेच्या १६.४ टक्के, तर थकित कर्जात यांचा वाटा आहे १६.३ टक्के एवढा. याच अहवालात असे नमूद केले आहे, की पुढील एक वर्षात थकित कर्ज १२.७% वरून १३.२% पर्यंत पोहोचतील आणि हीच आहे रिझर्व बँकेच्या या अहवालात व्यक्त केलेली चिंता. याचाच अर्थ बड्या उद्योगांनीच प्रामुख्याने बँकिंगला अडचणीत आणले आहे.

याशिवाय भारतीय रिझर्व बँकेने १ जानेवारी २०१९ रोजी एका परिपत्रकाद्वारे छोट्या आणि मध्यम आकारातील उद्योगांना वाटलेली कर्जे पुनर्रचित करण्याची मुभा दिली आहे, ज्यात मुद्रा योजनेसाठी वापरण्यात आलेल्या सहा लाख कोटी रुपयांच्या कर्जाचादेखील समावेश आहे. ज्या कर्जाकडे तर बँकर्सपासून सगळेच संभाव्य थकित म्हणून पाहतात, ज्यातील बव्हंश थकीत कर्जे १ जानेवारी २०१९ च्या परिपत्रकान्वये पुनर्रचित केली जात आहेत. यापलीकडे जाऊन अर्थव्यवस्थेची कठीण परिस्थिती पाहता बँका स्वतः पुढाकार घेऊन छोट्या आणि मध्यम आकाराच्या उद्योगांना अल्प मुदतीचे कर्ज मंजूर करून त्यातून थकित कर्ज वसुल करून घेऊन संभाव्य थकित कर्ज पुढे ढकलत आहेत. याचाच अर्थ, २००८ ते २०१२ या यूपीएच्या राजवटीत मोठाली कर्जे देऊन थकित दडपण्यासाठी ज्या पुनर्रचना योजनांचा फायदा घेतला गेला त्याचीच आज पुनरावृत्ती होत आहे. २०१५-१६ मध्ये रिझर्व बँकेचे तत्कालीन गव्हर्नर रघुराम राजन यांनी मोठ्या कर्जखात्याच्या गुणवत्तेचे निरीक्षण केले आणि दडवून ठेवलेली ही सगळी थकित कर्जे बाहेर पडली, ज्यामुळे जी थकित कर्जे मार्च २०१५ मध्ये २.७८ लाख कोटी होती ती मार्च २०१६ मध्ये ५.३९ लाख कोटी तर मार्च २०१७ मध्ये ६.८८ लाख कोटी, मार्च २०१८ मध्ये ४.१३ लाख कोटी तर २०१९ मध्ये ७.६७ लाख कोटी रु. एवढी झाली आहेत. ज्या पाच वर्षात बँकांनी ४.९४ लाख

कोटी रुपये एवढी राइट ऑफ केलेली कर्जे वजा जाता ही आकडेवारी आलेली आहे. त्यातील २०१७-१८ या वर्षात १.२४ लाख कोटी रुपये तर २०१८-१९ मध्ये १.८६ लाख कोटी रुपयांचा समावेश आहे.

एकदा एखादे कर्ज थकित झाले, की बँकांना त्या कर्जावरील व्याज आकारणी थांबवावी लागते. तसे उत्पन्नातून वजावट करून टप्प्या-टप्प्यात दोन ते तीन वर्षांत किंवा वसुलीची शक्यताच नसेल तर एका टप्प्यात १००% तरतूद करावी लागते. या निकषानुसार मार्च २०१७ पासून जसजशी ही थकित कर्जे वाढत गेली तसतसे तोट्यातील बँकांची संख्या वाढत गेली. मार्च २०१७ ला २१ पैकी १०, मार्च २०१८ मध्ये २१ पैकी १९ तर मार्च २०१९ मध्ये २१ पैकी ११ बँका तोट्यात गेल्या. ज्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील २१ बँकांना शेवटी एकत्रित तोटा मार्च २०१६ ला १७,९९३ कोटी, मार्च २०१७ ला १०,०६२ कोटी, मार्च २०१८ ला ८०,२८२ कोटी तर मार्च २०१९ ला ५३, १३७ कोटी रु. एवढा झाला होता, ज्यामुळे या बँकांचे भांडवल वाहून गेले आणि मग यातून भांडवल पर्याप्ततेचा निकष पूर्ण करता यावा म्हणून भारत सरकारला अर्थसंकल्पात तरतूद करून या बँकांना भांडवल पुरवावे लागले. गेल्या सात वर्षांत भारत सरकारने या बँकांना ३,२८,३०१ कोटी रुपयांचे भांडवल पुरवले आहे. म्हणून या बँका वाढती थकित कर्जे आणि त्यामुळे होणाऱ्या तोट्याच्या काळातदेखील तग धरू शकल्या आहेत. अर्थसंकल्पात तरतूद करून म्हणजे करदात्यांच्या पैशातून या बँका वाचवल्या आहेत, जो पैसा एरवी सरकारने लोककल्याणासाठी वापरला असता. याचाच अर्थ, ज्या मोठ्या उद्योगांनी बँकांची कर्जे थकवली आहेत, त्यांचं ओझं शेवटी सामान्य माणसाच्या खांद्यावर आले आहे.

याशिवाय बँका तोट्यात गेल्यानंतर भारत सरकारने भांडवल पुरवताना त्यांनी लवकरात लवकर योजनाबद्ध पद्धतीने काम करत तोट्यातील बँक नफ्यात आणावी असे सूचित केले. यासाठी पहिला मार्ग असू शकतो तो थकित कर्जाच्या वसुलीचा. पण या आघाडीवर अपेक्षित यश येत नाही हे लक्षात घेता, बँकांनी साधा-सोपा-सरळ मार्ग म्हणून बचत खात्यावरील व्याजदराबाबत २०११ मध्ये त्यांना मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग करत मार्च २०१७ मध्ये कपात केली. रिझर्व्ह बँकेने सर्व व्यापारी बँकांना २०११ मध्ये हे स्वातंत्र्य दिले होते ते या अपेक्षेने, की बँका आपल्याजवळील ठेवींचा कार्यक्षम पद्धतीने वापर करत एकमेकांशी स्पर्धा करत बचत खात्यावरील व्याजदर वाढवावेत व त्याचा फायदा आपल्या ग्राहकांपर्यंत पोहोचवावा. पण दोन ते तीन खाजगी-सहकारी बँका ज्यांचा बचत ठेवींतील वाटा अल्प होता. इतर सर्व बँकांनी एकजूट करत बचत खात्यावरील व्याजदर कायम म्हणजे ४% ठेवले. पण २०१७ मध्ये मात्र त्यांना असलेल्या स्वातंत्र्याचा वापर करत बँकांमधील मोठा भाऊ स्टेट बँकेने सर्वप्रथम बचत खात्याचा व्याजदर ४% वरून ३.५ % वर आणला आणि मग इतर सर्व बँकांनी त्याचं अनुकरण करत आपल्याकडील बचत ठेवींवरील व्याजदरदेखील ३.५% वर आणून ठेवला. या बँकांकडे एकत्रित बचत ठेवी आहेत अंदाजे ३५ लाख कोटी रुपये.

म्हणजे या एका अंमलबजावणीतून बँकांनी सामान्य माणसाच्या खिशातून अंदाजे १७,५०० कोटी रुपये काढून घेतले. या बँकांनी त्यांना होत असलेला सततचा तोटा लक्षात घेता आता आणखी पावटक्का कपात करत हा व्याजदर आता ३.२५ % पर्यंत आणून पोहोचवला आहे. बचत ठेवीत सामान्य माणसाची बचत आहे ८०%. याचाच अर्थ, मोठ्या उद्योगांमुळे या बँकांना झालेल्या तोट्याचं ओझं या मार्गानेदेखील पुन्हा पेलावे लागत आहे ते सामान्य माणसांनाच.

याशिवाय बँकांनी आपले उत्पन्न वाढवण्याचा आणखी एक मार्ग अवलंबला आहे तो त्यांच्यातर्फे ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवा शुल्कात वाढ करण्याचा. खात्यात किमान शिल्लक ठेवली नाही तर, एटीएम कार्डासाठी वार्षिक शुल्क ज्या बँकेत खाते आहे त्याशिवाय इतर बँकांच्या एटीएममधून तीन पेक्षा जास्त वेळा पैसे काढले तर, एसएमएस सेवेसाठी, पैसे भरताना कमी किमतीच्या अधिक नोटा भरल्या तर, चेक कुठल्याही कारणासाठी परत गेला तर, पासवर्ड बदलायचा झाला तर …….. म्हणजे प्रत्येक ग्राहकाकडून कुठल्या न कुठल्या सदराखाली हे पैसे आकारले जाणार. गेल्या तीन वर्षांत बँकांनी यांच्यातर्फे देण्यात येणाऱ्या विविध सेवांसाठी शुल्क आकारले आहे ६,१५५.१० कोटी रुपये एवढे. वस्तूतः बँक ग्राहक ब्रँचमध्ये न येता आपले व्यवहार पर्यायी यंत्रणेद्वारा करतो. यातून बँकेची बचत होते, पण एक साधा-सोपा-सरळ मार्ग म्हणून बँकांनी आपल्या सेवा शुल्कात जबर वाढ करत थकित कर्जामुळे होणाऱ्या तोट्याचं ओझं सामान्य माणसावर लादले आहे. २०१७-१८ या एका वर्षात बँकांनी या मार्गाने ३,३६८.४२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे.

याशिवाय बँकांनी तोट्यातील शाखा बंद करणे, प्रशासकीय खर्चात कपात म्हणून नोकरभरतीवर बंदी, आऊटसोर्सिंग, कंत्राटी पद्धती, प्रशासकीय कार्यालय बंद करणे इत्यादी मार्गाचा अवलंब केला आहे. या प्रक्रियेत बँकांनी खेडे विभागातल्या अनेक शाखा बंद केल्या आहेत. तसेच अप्रगत भागातील प्रशासकीय कार्यालये बंद केली आहेत व पुरेशा कर्मचारी संख्येअभावी अनेक शाखांतून बँका आवश्यक सेवादेखील देऊ शकत नाहीत. या सर्व प्रक्रियेत शेवटी गैरसोय होत आहे ती सामान्य माणसाची. म्हणजे या अर्थानेदेखील थकित कर्जामुळे बँकांना झालेल्या तोट्याची किंमत अखेर सामान्य माणसालाच मोजावी लागत आहे.

रिझर्व बँकेने वित्तीय स्थिरता अहवालात थकित कर्जाबरोबरच बँकांतील घोटाळ्यांची तपशीलवार आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. यानुसार २०१८-१९ आणि १९-२०

च्या पहिल्या सहा महिन्यांत ६,०४४ कर्जखात्यांशी संबंधित घोटाळे उघडकीस आले आहेत, ज्यात १.७४ लाख कोटी रुपये अंतर्भूत आहेत. या कर्ज खात्यांत ४ खाती अशी आहेत, ज्यातील प्रत्येक घोटाळ्यात १,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम अंतर्भूत आहे. एकूण रक्कम आहे ४४,०५१ कोटी रुपये. बँक घोटाळ्यातदेखील पुन्हा मोठा वाटा आहे तो बड्या उद्योगांचाच.

बँकिंग उद्योगातील वाढती थकित कर्जे, मोठाले घोटाळे आणि सरकारला भांडवल पुनर्भरणासाठी वारंवार करावी लागणारी लाखो कोटी रुपयांची तरतूद लक्षात घेता, आता यावर उपाय म्हणून भलावण केली जात आहे ती बँक खाजगीकरणाची. सुरुवातीला पंतप्रधानांचे माजी आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी ही मागणी केली. नंतर मुंबई येथून बड्या उद्योगांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फिकी या संघटनेने व नंतर ॲसोकेमच्या वतीने करण्यात आली. वस्तूतः आज बँकिंग अडचणीत आले आहे ते या दोन बड्या उद्योगांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटनांच्या सभासदांमुळेच. ही मागणी करत असताना हा बडा उद्योग विसरतोय, की २००८ साली सुरुवातीला अमेरिका आणि नंतर पूर्ण जगातले बँकिंग या खाजगी बँकांमुळेच अडचणीत आले होते. एवढेच कशाला, भारतात नवीन बँकिंगविषयक धोरण अमलात आणल्यानंतर १९९४ साली स्थापन झालेल्या ग्लोबल ट्रस्ट बँकेला अवघ्या १० वर्षात गाशा गुंडाळावा लागला होता. एवढेच काय या बँकेचे संस्थापक रमेश गेली यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते. केतन पारेख स्टॉक मार्केट घोटाळ्यात ही बँक सहभागी होती. याशिवाय कराड बँक दिवाळखोरीत निघाली होती हर्षद मेहता स्कॅममधील सहभागामुळे. या दोन्ही बँका सार्वजनिक क्षेत्रातील ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि बँक ऑफ इंडियात विलीन करण्यात आल्या होत्या. आज आयसीआयसीआय आणि तिच्या माजी प्रमुख चंदा कोचर वाईट अर्थाने प्रकाशझोतात आल्या आहेत. या त्या चंदा कोचर आहेत ज्यांना बँकिंग क्षेत्रातील सर्व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले गेले होते. आज इतर खासगी बँकांदेखील एकेक करत वाईट गोष्टीसाठी प्रसिद्धीस येत आहेत, हे लक्षात घेता सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खाजगीकरण हा का त्यांच्या दुरवस्थेवरील उपाय होऊ शकतो?

सरकार खाजगीकरण करण्यापूर्वीची एक पायरी म्हणून आज सार्वजनिक क्षेत्रातील बँकांतून मेगा-मर्जर धोरण अवलंबत आहे, ज्या प्रक्रियेत दहा बँकांचे एकत्रीकरण करून चार बँका कायम ठेवल्या जात आहेत. याचे उद्दिष्ट आहे तीन ट्रिलियन डॉलरच्या स्वप्नपूर्तीसाठी महाकाय बँकां ज्या बड्या उद्योगांसाठी बडी कर्जे मंजूर करतील ज्यांनी बँकांना लाखो कोटी रुपयांना गंडवले आहे. गेल्या तीन वर्षात सरकारच्या या विलिनीकरण धोरणाचा परिणाम म्हणून १३ सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा आणि त्यांच्या अंदाजे पाच हजारांवर शाखा बंद करण्यात येत आहेत, जी जागा खाजगी क्षेत्रातील पेमेंट बँका, स्मॉल फायनान्स बँका तसेच युनिव्हर्सल बँका हस्तगत करत आहेत. एरव्ही गेल्या २८ वर्षांत खाजगी बँकांनी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा २० टक्के व्यवसाय म्हणजे जवळ-जवळ ६० ते ७० लाख कोटींचा व्यवसाय हिसकावून घेतला आहे आणि येणाऱ्या दशकात तो किमान १०% हिसकावून घेतला जाण्याची शक्यता आहे. म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे भलेही खाजगीकरण केले गेले नाही तरी व्यवसायाचे खाजगीकरण मात्र जरूर होत आहे.

बँका सामान्य माणसाची बचत हाताळतात. यातूनच बँकांची कर्जे वाटली जातात; पण हा सामान्य माणूस कर्ज मागू लागला तर त्याला धोरणाकडे बोट दाखवत किमान अधिक दोन ते तीन टक्के व्याजदराने कर्ज दिले जाते. मात्र बड्या उद्योगाला कर्ज हवे असेल तर तो उद्योग टेंडर काढतो आणि बँकांशी वाटाघाटी करून किमान व्याजदराने कर्ज मिळवतो आणि हाच तो उद्योग आहे जो बँकांना लुटतो.

आजची बँकिंगविषयक धोरणे अशीच पुढे चालू राहिली तर एकीकडे सामान्य माणसाची बचत धोक्यात येईल आणि दुसरीकडे, या सामान्य माणसाला बँकिंगच्या वर्तुळाबाहेर फेकले जाईल. बँकिंग अडचणीत आले तर अर्थव्यवस्थादेखील अडचणीत येईल. नव्हे, आज भारतीय अर्थव्यवस्था अडचणीत आली आहे. त्याला प्रमुख कारण भारतीय बँकिंग अडचणीत आले आहे, हेच आहे.

बँकिंग सार्वजनिक क्षेत्रात राहिले पाहिजे. बँकिंगचे लोकशाहीकरण केले गेले पाहिजे. बँकांतील थकित कर्जाच्या वसुलीसाठी कठोर पावले उचलली गेली पाहिजेत. बँका जनतेची बचत हाताळतात. ती जनतेच्या भल्यासाठी वापरली गेली पाहिजेत, कार्पोरेटच्या लुटीसाठी नाही. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा जनमताचा रेटा निर्माण होईल.

याचाच अर्थ, १९९१ साली थकित कर्जाचे निकष लागू केल्यानंतर ही परिस्थिती होती. त्यापेक्षा आज तथाकथित सुधारणा कार्यक्रम लागू केल्यानंतर निर्माण झालेली परिस्थिती अधिक भयावह आहे. पण किमान आज तरी ही वस्तुस्थिती मान्य करून निर्धाराने त्यावर उपाययोजना करण्याची इच्छाशक्ती सरकार दाखवणार का, की यूपीए आणि एनडीए आघाड्या एकमेकांना दूषणे देऊन तू-तू-मै-मै चा खेळ खेळणार आहेत? २००८ मधील वैश्विक वित्तीय पेचप्रसंगाची सुरुवात अमेरिकेपासून झाली होती. त्याच्या पुनरावृत्तीची संभाव्यता आज बोलली जात आहे, ज्याची सुरुवात भारतीय वित्तीय पेचप्रसंगातून होऊ पाहत आहे का? आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे मूळ वित्तीय संकटात आहे, हे मान्य केले तर ताबडतोबीची उपाययोजना अपरिहार्य बनते. ●●●

(वरील लेखातील आकडेवारी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या वेबसाईटवरून तसेच लोकसभेतील प्रश्नांना उत्तर देताना वित्त राज्यमंत्री यांनी मांडलेल्या दस्तऐवजावरून घेतलेली आहे.)



# फक्त वाढ नको, तर गरिबाभिमुख वाढ आणि प्रशासन हवे

**सरकारच्या फक्त उत्पन्नात उच्च वाढ करण्याचे नियोजन करूनच चालणार नाही, तर गरिबांच्या उत्पन्नात वाढ करण्याचे आणि गरिबी कमी करण्याचे नियोजन करावे लागेल. मालाच्या आणि सेवांच्या मागणीत घट झाल्यामुळे किंवा ती स्थिर राहिल्यामुळेही उत्पन्नाच्या वाढीत घट झाल्याचे दिसून आले आहे. उत्पन्न वाढवायचे असेल तर मागणीतही वाढ झाली पाहिजे. यासाठी रोजगारात वाढ करणाऱ्या वाढीची किंवा वृद्धीची गरज असेल. सरकारने गरीब लोकांमधील रोजगाराचे प्रमाण वाढवण्यासाठी धोरण आखले पाहिजे. अधिक लोकांना रोजगार मिळावेत यासाठी सरकारने तंत्रज्ञानविषयक धोरणही आखले पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा वापर करून घेण्यासाठी औद्योगिक क्षेत्राला आर्थिक सवलत देणारे धोरण आखणेही गरजेचे आहे. रोजगार वाढीच्या तंत्रांचा स्वीकार करण्यासाठी उद्योगांना कर सवलत देण्याचाही यात समावेश होऊ शकतो.**



प्रो. सुखदेव थोरात

महाराष्ट्रातील राजकीय सत्ताबदल ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. त्यामुळे लोकांचा लोकशाहीवरील विश्वास वृद्धिंगत झाला आहे. आधी लोकांचा राजकीय व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होण्यास सुरुवात होण्याजोगे वातावरण होते. सरकारमध्ये बदल झाल्यामुळे लोकांना लोकशाहीविषयी पुन्हा विश्वास वाटू लागला असून नवीन सरकारवरील लोकांचा विश्वास वाढावा यासाठी आणखी खूप काही करण्याची गरज आहे. गोष्टी रुळावर येण्यासाठी सरकारने तितकेच धाडसी पाऊलही उचलले पाहिजे. या टप्प्यावर सरकारने आपल्या बाजूने दोन प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. पहिली गोष्ट म्हणजे, सरकारने आधीचे काही धोरणात्मक निर्णय बदलले पाहिजेत आणि दुसरी गोष्ट म्हणजे सरकारने नवीन धोरणासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

नवीन सरकारने आधीच्या सरकारची कोणती धोरणे आणि पद्धती बदलल्या पाहिजेत? घटनेच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असा इशारा दिला होता, की राज्यघटना कितीही चांगली असली तरीही सत्तेत असलेल्या लोकांनी जर स्वतःच्या हितासाठी तिची अंमलबजावणी केली तर राज्यघटना अपयशी ठरेल.

## राज्यातील नवीन सरकारने जनतास्नेही धोरणे आखणे गरजेचे

सरकारसमोर काही आव्हाने आहेत आणि सरकारवर लोकांचा विश्वास बसावा, यासाठी लोकांच्या विश्वासाची उभारणी करण्यासाठी सरकारने या आव्हानांवर प्राधान्याने उपाययोजना केल्या पाहिजेत आणि ती दूर केली पाहिजेत. सरकारने गरिबांना योजना उपलब्ध करून देऊन स्वतःला जनतास्नेही बनवलेच पाहिजे. महाराष्ट्राच्या प्रशासनात उच्च प्रमाणात भ्रष्टाचार असल्याचे दिसते, तो कमी करून हे करणे शक्य आहे. सरकारने 'नेहमीप्रमाणे एक पद्धत' म्हणून धोरणे न आखता जनतास्नेही धोरणे आखली पाहिजेत आणि ती सर्वांसाठी उपलब्धही असली पाहिजेत.

गेल्या पाच वर्षांत सत्ताधाऱ्यांचे आणि त्यांच्या पाठीराख्यांचे हित जपण्यासाठी राज्यघटनेतील नियमांना वळवून, वाकवून त्यांची अंमलबजावणी करण्यात आली.

अनेक वर्तुळांमध्ये अर्थाच्या दृष्टीने आणि वापराच्या दृष्टीने राज्यघटनेतील नियमांचा भंग करण्यात आला आहे. सर्वसामान्य नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आणि भाषण स्वातंत्र्याचा मुक्तपणे लाभ घेणे शक्य होऊ नये अशा प्रकारच्या वातावरणाची निर्मिती करण्यात आली होती. उदाहरणार्थ, बुद्धिप्रामाण्यवाद आणि समाजवाद जोपासणाऱ्या चळवळीतील दोन प्रमुख कार्यकर्त्यांना त्यांच्या प्राणांची किंमत चुकती करावी लागली. ज्यांचे दृष्टिकोन सरकारच्या विरोधात असल्याचे मानले गेले, त्यांच्या विरोधात धमक्यांचा आणि इतर आयुधांचा वापर करण्यात आला. प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर बंधन आणण्यासाठीही अशाच पद्धतींचा वापर करण्यात आला. त्यांनी आज्ञापालन करावे यासाठी कायदेशीर कारवाईची आणि राज्याच्या जाहिराती व माध्यमांचे इतर पाठबळ काढून घेण्याची धमकी त्यांना देण्यात आली. त्यामुळे लोकांना दबावाखाली मौन पाळणे भाग पडले. दलितांनी गाण्यांच्या आणि दृक्‌सादरीकरणांच्या माध्यमातून शांततामय मार्गांनी अन्यायाविरुद्ध केलेली आंदोलने बेकायदेशीर ठरवण्यात आली आणि तरुणांच्या विरोधात कायदेशीर कारवाया करण्यात आल्या. या संदर्भात सरकारने लोकांच्या आत्मविश्वासाची उभारणी करण्यासाठी पावले उचलावीत, अशी लोकांची अपेक्षा आहे. त्यामुळे लोकांना सुरक्षितपणा मिळाल्यासारखे वाटेल आणि ते अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा न घाबरता वापर करू शकतील. त्याचबरोबर नियतकालिके आणि टेलीव्हिजन या प्रसारमाध्यमांमध्ये सरकारविषयी पुरेसा विश्वास निर्माण होण्यासाठीही पावले उचलली पाहिजेत. या संदर्भात आधीच्या सरकारने केलेल्या गोष्टींच्या विरुद्ध गोष्टी, त्यांच्या पद्धतींच्या विरुद्ध पद्धती हे सरकार वापरत असल्याचा संदेश लोकांपर्यंत पोहचवण्याच्या पद्धतीही सरकार ठरवू शकेल. या संदर्भात धोरणात्मक निवेदन जाहीर करण्याची किमान गोष्ट सरकार करू शकते. अशाच प्रकारे राज्याच्या प्रशासनातील धर्मनिरपेक्ष व्यवहारांचा, पद्धतींचा आपण आदर करत असल्याच्या बाबतीतील धोरण जाहीर करणेही आवश्यक आहे. राज्यातील आधीच्या सरकारने राज्याच्या धर्मनिरपेक्ष गुणधर्मांची कशा प्रकारे अवहेलना केली होती ते आपल्याला माहिती नाही. मात्र आपल्याला हे माहिती आहे, की हिंदू संतांसाठी मंत्रिपदाचा दर्जा जाहीर करण्यात आला होता. महाविद्यालयांना वाचनालयात ठेवण्यासाठी गीतेची खरेदी करण्यास सांगितले गेले होते. त्यानंतर या दोन्ही गोष्टी जनतेच्या दबावामुळे मागे घेण्यात आल्या. सरकारच्या कामकाजात धर्मनिरपेक्ष व्यवहारांसाठी आवश्यक असलेली मार्गदर्शक तत्त्वे सरकार आखू शकते. खरे तर, सरकार चालवण्यात आणि सार्वजनिक कामकाजाच्या बाबतीत धर्मनिरपेक्ष पद्धतींचा वापर करण्यासंदर्भात धोरणात्मक निवेदन करण्यासाठी सरकारला मिळालेली ही एक संधी आहे. अशाच प्रकारे सार्वजनिक क्षेत्रातील रोजगारात समान संधी दिली जाण्याची हमी देण्याचीही गरज आहे. सार्वजनिक क्षेत्रातील रोजगारात समान संधी नाकारली गेली होती, असे अनेकांना वाटत आहे. सार्वजनिक क्षेत्रामधील नेमणुकांसाठी बुद्धिमत्तेला डावलून तात्त्विक बांधिलकीला प्राधान्य देण्यात आले होते. यामुळे तरुणांचे नैतिक खच्चीकरण झाले होते. सार्वजनिक क्षेत्रातील नेमणुका या लोकांच्या तात्त्विक पायावर नव्हे, तर बुद्धिमत्तेच्या आधारावर केल्या जातील आणि सर्वांना समान संधी दिली जाईल याची तरुणांना हमी देण्यासाठी सरकारने पावले उचलण्याची गरज आहे. थोडक्यात, सरकारवरच्या लोकांच्या विश्वासाची उभारणी करण्यासाठी, व्यक्तींच्या आणि प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याची, सरकारकडून प्रसारमाध्यमांना समान सुविधा दिल्या जाण्याची, राज्याच्या धर्मनिरपेक्ष गुणधर्मांचे जतन केले जाण्याची, सार्वजनिक सेवांमध्ये समान संधी दिली जाण्याची हमी देण्यासाठी सरकारने पावले उचलण्याची गरज आहे. या गोष्टी फक्त गृहीत धरणे पुरेसे नाही. काही सकारात्मक पावले उचलली जाण्याची गरज आहे.

वर उल्लेख केलेल्या वर्तुळांमधील धोरणांत परिवर्तन आणण्याची गरज असली तरीही आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक धोरणांच्या संदर्भातही सकारात्मक बदलांची गरज आहे. आर्थिक धोरणांत सुधारणा करण्याची गरज आहे. किमान समान कार्यक्रमात (सीएमपीमध्ये) आर्थिक समस्यांना प्राधान्य देण्यात आले होते. त्यात शेतकऱ्यांच्या समस्या, गरिबी, आरोग्याची वाईट स्थिती, बेरोजगारी आणि उत्पन्नातील कमी वाढ लक्षात घेण्यात आली होती. अनेक आर्थिक आणि सामाजिक समस्यांपैकी काही समस्यांकडे

तत्काळ लक्ष पुरवले जाण्याची गरज आहे. या समस्यांमध्ये राज्यात असलेला गरिबाभिमुख वाढीचा अभाव, वाढत्या बेरोजगारीची समस्या आणि दर्जेदार शिक्षणाची विषम उपलब्धी यांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील काही गटांमधील म्हणजे अनुसूचित जमातींमधील व नवबौद्धांतील गरिबीचे प्रमाण उच्च आहे. गरिबाभिमुख वाढीचा अभाव ही महाराष्ट्रातील एक समस्या आहे. म्हणून काही सामाजिक गटांमध्ये आणि विशेषतः अनुसूचित जमातींमध्ये व नवबौद्धांमध्ये गरिबी मोठ्या प्रमाणात आहे. प्रतीव्यक्ती म्हणजेच दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्र जवळजवळ पहिल्या क्रमांकावर आहे. दरडोई उत्पन्न उच्च असल्यामुळे गरिबीही कमी असायला हवी होती; परंतु असे दिसत नाही. महाराष्ट्राला दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत उच्च श्रेणी मिळाली असली तरीही २०१२ मध्ये गरिबीच्या संदर्भात महाराष्ट्राला बाराव्या क्रमांकाची श्रेणी मिळाली होती. राज्याचे उत्पन्न उच्च दराने वाढले होते. उदाहरणार्थ, १९९३–२०१०/११ या कालखंडात राज्याचे उत्पन्न वार्षिक ७.१ टक्क्यांनी आणि २००४/५ ते २०११/१२ या कालखंडात ते ९.३ टक्क्यांनी वाढले होते. परंतु गरिबी मात्र कमी गतीने कमी होत चालली आहे. गरिबीचे प्रमाण उच्च आहे. खरे तर, महाराष्ट्रापेक्षा दरडोई उत्पन्न कमी असलेल्या सहा राज्यांना गरिबी कमी करणे अधिक चांगल्या प्रकारे शक्य झाले असून तिथे महाराष्ट्राच्या तुलनेत कमी गरिबी आहे. याचा अर्थ महाराष्ट्रात उच्च दराने उत्पन्न वाढत चालले आहे; परंतु त्याचे गरिबांपर्यंत अभिसरण झालेले नाही. म्हणून आर्थिक वाढ ही गरिबाभिमुख किंवा गरिबी कमी करणारी नाही. म्हणून राज्याने गरिबांचे उत्पन्न वाढेल असे धोरण विकसित करण्याची गरज आहे.

सर्वांसाठी आणि विशेषतः गरिबांसाठी अधिक प्रमाणात रोजगार निर्माण करण्यात आला तर गरिबांचे उत्पन्नही वाढेल. रोजगाराच्या आघाडीवरची परिस्थिती अतिशय वाईट आहे. महाराष्ट्राच्या अर्थकारणाची रोजगारनिर्मितीची क्षमता खरे तर कमी झाली आहे. २०११/१२ मध्ये १.३ टक्के एवढा असलेला बेरोजगारीचा दर २०१७/१८ मध्ये ५ टक्क्यांपर्यंत वाढला होता. यावरून असे दिसते, की महाराष्ट्रात २०११/१२ आणि २०१७/१८ या कालावधीत बेरोजगारांच्या संख्येत वाढ झाली आहे. यामुळेही २०१७/१८ मध्ये गरिबीत वाढ झाली असण्याची शक्यता आहे. म्हणूनच बहुधा सरकारने २०१७/१८ चा गरिबीविषयीचा अहवाल प्रसिद्ध केला नसावा. अशा प्रकारे सध्या सरकारच्या फक्त उत्पन्नात उच्च वाढ करण्याचे नियोजन करूनच चालणार नाही, तर गरिबांच्या उत्पन्नात वाढ करण्याचे आणि गरिबी कमी करण्याचे नियोजन करावे लागेल. मालाच्या आणि सेवांच्या मागणीत घट झाल्यामुळे किंवा ती स्थिर राहिल्यामुळेही उत्पन्नाच्या वाढीत घट झाल्याचे दिसून आले आहे. उत्पन्न वाढवायचे असेल तर मागणीतही वाढ झाली पाहिजे. यासाठी रोजगारात वाढ करणाऱ्या वाढीची किंवा वृद्धीची गरज असेल. सरकारने गरीब लोकांमधील रोजगाराचे प्रमाण वाढवण्यासाठी धोरण आखले पाहिजे. अधिक लोकांना रोजगार मिळावेत यासाठी सरकारने तंत्रज्ञानविषयक धोरणही आखले पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा वापर करून घेण्यासाठी औद्योगिक क्षेत्राला आर्थिक सवलत देणारे धोरण आखणेही गरजेचे आहे. रोजगारवाढीच्या तंत्रांचा स्वीकार करण्यासाठी उद्योगांना कर सवलत देण्याचाही यात समावेश होऊ शकतो. शहरी तरुणांसाठीच्या सार्वजनिक रोजगार कार्यक्रमाचीही याला जोड द्यावीच लागले. तसेच लोकांना रोजगार मिळावेत आणि रोजगारात वाढ व्हावी यासाठी व्यक्तीच्या रोजगारक्षमतेत सुधारणा होण्याची गरज आहे. कौशल्याधारित आणि व्यावसायिक रोजगारविषयक शिक्षणातून व्यक्तीची रोजगार मिळवण्याची क्षमता वाढेल. महागड्या खासगी शिक्षणामुळे आपले शैक्षणिक धोरण गरिबांना शिक्षण उपलब्ध करून देऊ शकलेले नाही. म्हणून सरकारने शालेय आणि उच्च शिक्षण स्तरावर, विशेषतः खासगी शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत गरीब व्यक्तींना खासगी व्यावसायिक आणि कौशल्याधारित शिक्षण उपलब्ध होण्याची हमी देणारे शैक्षणिक धोरण आखण्याची गरज आहे.

सामाजिक गटांचा विचार करता, अनुसूचित जमाती, नवबौद्ध, अनुसूचित जाती, भटक्या जमाती आणि विमुक्त जमाती या अधिक गरीब आहेत. या सामाजिक गटांमधील गरिबी कमी करण्यासाठी सरकारने अधिक प्रभावी धोरण विकसित करण्याची गरज आहे. जमातीविषयक उपआराखडा असला तरीही अनुसूचित जमातींमधील गरिबी उच्च आहे. त्यांच्यावर भरीव खर्च केला जात असूनही अनुसूचित जमातींमधील गरिबीचे प्रमाण अत्युच्च का आहे? हा निधी कुठे जातो, हे एक कोडेच आहे. आदिवासींमधील गरिबी उच्च का आहे याचा अभ्यास करण्यासाठी सरकारने कृती दलाची स्थापना केली पाहिजे आणि नंतर योग्य कृती केली पाहिजे. नवबौद्धांमधील गरिबीही उच्च आहे. केंद्र सरकारी सेवांमधील आरक्षणाचा वापर करण्यास ते समर्थ नाहीत. ही एक दीर्घकालीन प्रलंबित समस्या आहे आणि सध्याच्या सरकारने ती हाती घेतली पाहिजे. योग्य धोरणे आखण्यासाठी नवबौद्धांच्या समस्यांचा अभ्यास करण्याची गरज आहे.

सरकारसमोरची ही काही आव्हाने आहेत आणि सरकारवर लोकांचा विश्वास बसावा, यासाठी लोकांच्या विश्वासाची उभारणी करण्यासाठी सरकारने या आव्हानांवर प्राधान्याने उपाययोजना केल्या पाहिजेत आणि ती दूर केली पाहिजेत. सरकारने गरिबांना योजना उपलब्ध करून देऊन स्वतःला जनतास्नेही बनवलेच पाहिजे. महाराष्ट्राच्या प्रशासनात उच्च प्रमाणात भ्रष्टाचार असल्याचे दिसते, तो कमी करून हे करणे शक्य आहे. सरकारने 'नेहमीप्रमाणे एक पद्धत' म्हणून धोरणे न आखता जनतास्नेही धोरणे आखली पाहिजेत आणि ती सर्वांसाठी उपलब्धही असली पाहिजेत. ●●●



# जेएनयूवरच सतत हल्ला का होतो?

सुरेश गायकवाड

सरकार सर्वच विरोधकांना संपवण्याचा प्रयत्न करत असलं तरी जेएनयूवरच सतत हल्ला का होतो? जेएनयू सातत्याने चर्चेत का? जेएनयूबाबतीत सरकार नेहमीच आक्रमक का असते, या प्रश्नांवर विचार करणे गरजेचे आहे. हैदराबाद विद्यापीठात २०१६ नंतर विद्यार्थी आणि प्रशासन किंवा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी) आणि इतर विद्यार्थी संघटनांमध्ये पुन्हा मोठा संघर्ष झाला नाही. २०१६ लादेखील मोदी सरकारला दोन पावलं मागे घ्यावे लागले. पंतप्रधान नरेंद्र मोदींना बोलावे लागले. स्मृती इराणींची खातेबद्दल करण्यात आली; परंतु जेएनयू प्रकरणात मात्र सरकार आक्रमक झालं. कारण जेएनयूमध्ये सरकारला त्यांचा आवडीचा राष्ट्रवादाचा विषय मिळाला. हिंदू मतांचं ध्रुवीकरण करायला प्रचंड वाव मिळाला. शहरी नक्षलवादी आणि तुकडे-तुकडे गँग सारखे नवीन जुमले राजकीय फायद्यासाठी वापरायला मिळाले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि भारतीय जनता पक्ष (बीजेपी) या दोघांनी नरेंद्र मोदींच्या सहाय्याने देशात राजकीय वर्चस्व स्थापन केले आहे. यांचा प्रमुख उद्देश आता लपून राहिलेला नाही आणि तो म्हणजे या देशात बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानावर आधारित लोकशाही शासन व्यवस्था उलथून टाकून असमानता आणि अन्याय अशा अमानवीय मूल्यावर आधारित अशा जाती व्यवस्थेच्या पायावर हुकूमशाही हिंदू राष्ट्राची निर्मिती करणे हेच होय. हिंदूराष्ट्राच्या निर्मितीचे अनेक वर्षांचे आरएसएसचे स्वप्न अनेकदा डोके वर काढत होते पण २०१४ ला बीजेपी सत्तेत आल्यावर हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक अशा सर्वच स्तरांवर मोठे प्रयत्न करण्यात येत आहेत. गोमांस आणि गाईच्या नावाने समाजात जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरण करणे, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याकांवरील वाढते अत्याचार, आरक्षण आणि एससी/एसटी ॲक्टवरील मोदी सरकारचा नियोजित हल्ला, राजकीय विरोधकांना संपविणे, विचारवंतांवरील हल्ले, गरीब आणि श्रीमंतांमधील दरी वाढवणारे सरकारी निर्णय आणि देशभरात सीएए आणि एनआरसी लागू करण्याचं कारस्थान हे सगळं हिंदूराष्ट्र निर्मितीच्या प्रकल्पाचाच भाग आहे. सरकारी आशीर्वादाने छुप्या पद्धतीने सामाजिक तणाव निर्माण करणारे घटक आधीही या देशात होते; परंतु २०१४ नंतर या असामाजिक तत्त्वांना सत्ताधारी पक्षाचं उघडपणे समर्थन प्राप्त झालं आहे आणि सरकार स्वतः जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरण करणारे निर्णय आक्रमकपणे घेत आहे.

हिंदूराष्ट्राच्या या स्वप्नाला विरोध करणारे प्रामुख्याने दोन मोठे गट या देशात आहेत. एक म्हणजे सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावर विरोध करणारा गट जो या देशातील आंबेडकरी, बहुजन, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाज




**जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने प्रवेशशुल्क आणि वसतिगृह शुल्कात भरमसाठ वाढ केल्याच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. यातूनच विद्यापीठ कॅम्पसवर हल्ला झाल्याचे मानले जाते.**

---

आहे, जे स्वतःचं अस्तित्व जपण्यासाठी संघर्ष करत आहेत. दुसरा म्हणजे राजकीय आणि आर्थिक स्तरावर विरोध करणारा गट, ज्यामध्ये अनेक राजकीय पक्ष आणि पुरोगामी विचाराला मानणाऱ्या काही सरकारी आणि खाजगी संस्था आहेत, विशेष करून कॉलेज आणि विद्यापीठ. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ अर्थात जेएनयू हे एक महत्त्वाचे विद्यापीठ आहे, जो या सरकारचा राजकीय आणि आर्थिक धोरणांचा मोठा विरोधक आहे. म्हणूनच इतर विरोधकांप्रमाणेच जेएनयूलादेखील संपवण्याचे काम हे सरकार वारंवार करत आहे. अनेक वेळा प्रसारमाध्यमांकडून जेएनयूला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. अनेक प्रश्न उपस्थित केले जातात. अनेक आरोप केले जातात. जेएनयू देशविरोधी आहे. इथले विद्यार्थी अभ्यास करत नाहीत तर फक्त राजकारण करतात. पण ते हे विसरतात, की याच आंदोलन करणाऱ्या विध्यार्थ्यांच्या संशोधनामुळे जेएनयूला नॅकने A++ ग्रेड देऊन देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून नावाजले आहे. भाजप सरकारनेदेखील जेएनयू हे देशातील एक सर्वोत्कृष्ट विद्यापीठ आहे, हे मान्य केलं आहे.

जेएनयू हे डाव्यांचं गाडं असल्यामुळे सरकार मुद्दाम टार्गेट करत आहे, असाही आरोप जेएनयूचे विशेष करून डाव्या विचाराला मानणारे विद्यार्थी आणि शिक्षक करत असतात; परंतु हे खरंच सत्य आहे का? सरकार केवळ जेएनयूलाच टार्गेट करत आहे का? तर उत्तर, नाही असेच असणार आहे. हे सरकार सरळ सरळ उच्च शिक्षणावर हल्ला करत आहे. विशेष करून, मानवी विज्ञान आणि सामाजिक विज्ञान अशा शाखांवर हल्ला करत आहे, जेथून प्रामुख्याने हिंदूराष्ट्राच्या विचारला विरोध होत आहे. जेएनयू हे प्रामुख्याने मानवी विज्ञान आणि सामाजिक विज्ञान विषयांवर संशोधन करणारं विद्यापीठ आहे. म्हणूनच खूप मोठ्या प्रमाणात या सरकारच्या धोरणांना इथले विद्यार्थी आणि शिक्षक विरोध करत असतात. शिवाय डाव्या संघटनांचं वर्चस्व असणारी ही संस्था आहे; परंतु जेएनयूच्या खूप आधी मे २०१५ मध्ये या सरकारने भारतीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आयआयटी मद्रासमधील आंबेडकरवादी विद्यार्थी चालवत असलेले सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावर काम करणारं संघटन आंबेडकर पेरियार स्टडी सर्कलवर सर्वप्रथम बंदी आणली होती. देशभर तिला विशेष करून आंबेडकरी आणि पुरोगामी वर्गातून आंदोलने आणि टीका झाल्यावर ती बंदी हटवण्यात आली. त्यानंतर २०१६ मधे हैदराबाद विद्यापीठातील आंबेडकरवादी विद्यार्थी संघटन आंबेडकर स्टुडन्ट्स असोसिएशन (ASA) मधील विद्यार्थी नेत्यांना टार्गेट केले गेले, ज्याचा परिणाम म्हणजे रोहित वेमुलाची संस्थानिक हत्या झाली. विशेष म्हणजे, या सर्व प्रकरणात तत्कालीन केंद्रीय मंत्री बंडारू दत्तात्रय आणि तत्कालीन मानव संसाधन आणि विकास मंत्री स्मृती इराणी यांचा प्रत्यक्ष संबंध होता. हैदराबाद विद्यापीठ आणि आयआयटी मद्रास टार्गेट होण्याचं मुख्य कारण म्हणजे तेथील विद्यार्थ्यांचा ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्धचा सामाजिक आणि सांस्कृतिक संघर्ष. महिषासूर जयंती, बिफ फेस्टिवल, आरक्षण आणि जातीअंताची लढाई हे मुद्दे आरएसएसचा विद्यार्थी गट अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) आणि इतर विद्यार्थी, विशेष करून आंबेडकरवादी विद्यार्थी संघटनेतील संघर्षाचे प्रमुख कारण होते. त्यानंतर Film and Television

Institute of India (FTII) Pune, Banaras Hindu University, Fergusson College Pune, Aligarh Muslim University आणि Jamia Millia Islamia university अशा अनेक कॉलेज आणि विद्यापीठांत सरकार आणि विद्यार्थ्यांमध्ये संघर्ष झाले. अशा प्रकारे सध्याचे सरकार हे सर्वच ठिकाणी विरोधकांना संपविण्याचं काम करत आहे. उच्च शिक्षण संस्था जिथे विचार-विमर्श, तर्क-वितर्क करण्याला भरपूर मुभा मिळते, अशा सर्वच ठिकाणी संघाच्या मर्जीतले लोक बसवून सरकारी हस्तक्षेप वाढत आहे. जेएनयूदेखील त्याला अपवाद नाही. फरक एवढाच आहे, की जेएनयूमधील विरोध हा प्रामुख्याने राजकीय.

जेएनयूमध्ये जरी डाव्या विचारांचे वर्चव असले तरी इतर अनेक छोटे छोटे विद्यार्थी गट आहेत. आंबेडकरवादी संघटन बिरसा आंबेडकर फुले स्टुडंट्स असोसिएशन (BAPSA) आणि युनायटेड दलित स्टुडन्ट्स फोरम (UDSF) आणि काही मुस्लिम संघटन वगळता इतर विद्यार्थी संघटना सांस्कृतिक आणि सामाजिक न्यायाच्या संघर्षापासून दूरच राहतात. विशेष करून डाव्या संघटना या प्रामुख्याने राजकीय आणि आर्थिक प्रश्नांवर जास्त भर देतात. म्हणूनच जेएनयूमध्ये आजदेखील जात आणि धर्मावर आधारित भेदभाव बऱ्याच प्रमाणात कायम आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागातून आलेल्या मुलांना प्रवेश परीक्षेत सवलत मिळते; परंतु दलित, आदिवासी आणि इतर मागासवर्गीय आणि मुस्लिम विद्यार्थ्यांसोबत मात्र मुलाखतीत भेदभाव केला जातो. अब्दुल नफे कमिटी आणि सुखदेव थोरात कमिटीनेदेखील जातिगत भेदभाव जेएनयूचे शिक्षक करतात हे मान्य केले आहे. याव्यतिरिक्त आजही आरक्षित वर्गातील शिक्षकांच्या नेमणुका जेएनयूमध्ये होत नाहीत. योग्य उमेदवारांना अयोग्य ठरवून आरक्षित जागा रिक्तच ठेवल्या जातात. यासाठी डावे, उजवे, काँग्रेसी असे सत्ता उपभोगलेले सगळेच जबाबदार आहेत. म्हणूनच केवळ उच्चभ्रू बौद्धिक वर्गातच जेएनयू बाबतीत सहानुभूती दिसून येते, जो वर्ग संख्येने खूपच कमी प्रमाणात आहे आणि सध्याचे सरकार त्यांना शहरी नक्षलवादी आणि तुकडे-तुकडे गँग सारख्या नावाने संबोधून खलनायकाच्या रूपात लोकांसमोर आणत आहे. त्यामुळे जेएनयूबाबतीत तळागाळातील जनतेत फारसी सहानुभूती मिळणे कठीण आहे. म्हणूनच जेएनयू जरी विरोधक असला तरी सरकारच मोठं संकट ठरत नाही. जेएनयूमुळे भाजपला कुठलेच राजकीय नुकसान होणार नाही. उलट फायदाच होणार आहे.

सरकार सर्वच विरोधकांना संपवण्याचा प्रयत्न करत असलं तरी जेएनयूवरच सतत हल्ला का होतो? जेएनयू सातत्याने चर्चेत का? जेएनयूबाबतीत सरकार नेहमीच आक्रमक का असते, या प्रश्नांवर विचार करणे गरजेचे आहे. हैदराबाद विद्यापीठात २०१६ नंतर विद्यार्थी आणि प्रशासन किंवा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी) आणि इतर विद्यार्थी संघटनांमध्ये पुन्हा मोठा संघर्ष झाला नाही. २०१६ लादेखील मोदी सरकारला दोन पावलं मागे घ्यावे लागले. पंतप्रधान नरेंद्र मोदींना बोलावे लागले. स्मृती इराणींची खातेबद्दल करण्यात आली; परंतु जेएनयू प्रकरणात मात्र सरकार आक्रमक झालं. कारण जेएनयूमध्ये सरकारला त्यांचा आवडीचा राष्ट्रवादाचा विषय मिळाला. हिंदू मतांचं ध्रुवीकरण करायला प्रचंड वाव मिळाला. शहरी नक्षलवादी आणि तुकडे-तुकडे गँग सारखे नवीन जुमले राजकीय फायद्यासाठी वापरायला मिळाले. मोदी-शाह जोडीने काही निवडणूक प्रचार सभांमध्ये जेएनयूला तुकडे-तुकडे गँग म्हणून संबोधले आणि त्याचा राजकीय फायदादेखील मिळाला. फीस वाढीविरुद्धचे आंदोलन दडपण्यासाठी बाहेरून आणलेल्या गुंडांच्या मदतीने हिंसा घडवून आणून पुन्हा एकदा मोदी सरकार २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी आणि काँग्रेस विरुद्ध जेएनयूचा वापर करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे.

जाचक आणि चुकीच्या सरकारी निर्णयाविरुद्ध जेएनयू नेहमी दिल्लीच्या रस्त्यांवर उतरून एका बाजूला सरकारची डोकेदुखी वाढवत असली तरी दुसऱ्या बाजूला मात्र संकटकाळी सरकार जेएनयूचा वापर करून घेत आहे. २०१६ मधील हैदराबाद विद्यापीठातील रोहित वेमुलाच्या संस्थानिक हत्येनंतर संपूर्ण देशात सरकारविरोधात निदर्शने होत असताना जेएनयू प्रकरण घडलं. देशद्रोहाच्या आरोपाखाली विद्यार्थी अटक झाले आणि रोहित वेमुला आंदोलन मागे पडलं. मोदी सरकार संकटातून सुटलं. आता पुन्हा एकदा तसच घडलं. कॅब/सीएए आणि एनआरसीमुळे संपूर्ण देशात आंदोलने चालू होती. दिवसरात्र माध्यमांमध्ये केवळ आंदोलनाच्या बातम्या होत्या. सरकारची सर्वच स्तरातून फजिती होत होती. सीएए आणि एनआरसी बाबतीत संसदेत आणि माध्यमांत आक्रमकपणे बोलणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मवाळ झाले होते. पंतप्रधान मोदींना स्पष्टीकरण द्यावं लागलं, तरीदेखील आंदोलने थांबत नव्हती. अचानक जेएनयूमध्ये हिंसा घडून आली आणि माध्यमांवरील आंदोलनाच्या चर्चांची जागा जेएनयूने घेतली. एक आठवडा माध्यमांमध्ये केवळ जेएनयू चर्चेत राहिला आणि सरकारची पुन्हा एकदा मोठ्या संकटातून सुटका केली.

जेएनयूला खरोखरच टिकून राहून हिंदूराष्ट्राचा रथ रोखायचा असेल आणि समाजात स्वतःभोवती सहानुभूती पण निर्माण करायची असेल तर जेएनयूला आपल्या कक्षा रुंद कराव्या लागतील. सर्व समाजघटकांना सामावून घेऊन सर्वसमावेशक व्हावे लागेल. त्यासाठी विद्रोहाच्या मर्यादा केवळ राजकीय आणि आर्थिक क्षितिजापर्यंत मर्यादित ठेऊन चालणार नाही. त्या वाढवून सामाजिक आणि सांस्कृतिक क्षितिजे ओलांडली गेली पाहिजेत. वर्गवादासोबतच जात, धर्म, वर्ण इ. सर्वच स्तरांवर जाणीवपूर्वक लक्ष देऊन बदल घडवून आणावे लागतील. आंबेडकरी आणि इतर पुरोगामी विचारांशी जाणीवपूर्वक नाते जोडावे लागेल. ●●●

# वैचारिक लढाई कसली, ही तर हिंसाच



✍ प्रा. मिलिंद आवाड

२०१९ च्या नोबेल पुरस्काराचे मानकरी प्रो. अभिजीत बॅनर्जी, लिबियाचे माजी पंतप्रधान अली झेदन, नेपाळचे माजी पंतप्रधान बाबुराम भट्टराय आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पत्रकार पी. साईनाथ यांच्यासारखे विविध क्षेत्रातील मान्यवर दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. या सर्वांनी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कार्य करून प्रतिष्ठा मिळवली आहे. मात्र या प्रतिष्ठेनेही अलीकडेच जवाहरलाल नेहरू विद्यापीठावर झालेला हल्ला रोखू शकलेला नाही. सुट्टीच्या दिवसाचा योग साधून रविवारी संध्याकाळी लाठ्या, दगड, लोखंडी रॉडसह सशस्त्र मुखवठाधारी हल्लेखोर विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये घुसतात काय आणि विद्यार्थी तसेच शिक्षकांवर हल्ला चढवतात काय. हे सगळेच संतापजनक होते. डाव्या आणि उजव्या विचारसरणीच्या विद्यार्थी संघटनांनी या हल्ल्याबद्दल एकमेकांना दोष दिलेला असला तरी विद्यार्थ्यांना वेठीस धरणाऱ्या अशा हिंसक कृत्यांना लोकशाहीव्यवस्थेत थारा मिळू शकत नाही.

केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकार आल्यानंतर देशातील काही विद्यापीठांना लक्ष्य केले जात असल्याचे दिसते. अलीकडेच जमिया मिलिया इस्लामिया तसेच अलिगढ मुस्लिम विद्यापीठात पोलिसांनी विद्यापीठ कॅम्पसमधील विद्यार्थ्यांवर केलेला सशस्त्र हल्ला आणि आता जेएनयूमध्ये झालेला हल्ला ही याची ताजी उदाहरणे म्हणून सांगता येतील. ५० वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने राजकारण, शिक्षण, अर्थकारण अशा विविध क्षेत्रात नावलौकीक मिळवलेले मान्यवर घडवले आहेत. अशा आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त विद्यापीठाचा लौकीक धुळीस मिळवण्याचे प्रयत्न नेहरू विचारधारा नाकारणाऱ्या शक्तींकडून होत आहेत. वैज्ञानिक समाजवादासह नवीन विद्याशाखा तयार केल्या पाहिजेत आणि विद्यापीठाने उदात्त कल्पना मनात ठेऊन समाजातील दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला पाहिजे, या हेतूने संसदीय कायद्याद्वारे पाच दशकांपूर्वी या विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली. आज विद्यापीठाच्या निर्मितीचा मूळ हेतू विसरून राज्यकर्ते मनमानीपणे विद्यापीठाचा कारभार चालवित आहेत, हे गोरगरीब विद्यार्थ्यांना विद्यापीठ शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठी रचल्या जात असलेल्या कुटील डावपेचावरून अधोरेखित होते. मागील नोव्हेंबर महिन्यात जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने वसतिगृह शुल्क ३०० टक्क्यांनी तर प्रवेशशुल्क ८०० टक्क्यांनी वाढवले. विद्यापीठाच्या इतिहासात अशी शुल्कवाढ यापूर्वी कधीही करण्यात आलेली नाही. महागाईच्या नावाखाली ही शुल्कवाढ करण्यात आलेली असली तरी ती सामान्य विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेरची आहे. म्हणून विद्यापीठ स्थापनेच्या मूळ हेतूलाच हरताळ फासत केलेली शुल्कवाढ मागे घेण्याच्या मागणीसाठी संतप्त विद्यार्थ्यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आंदोलन केले होते. या आंदोलनाच्या दोन महिन्यानंतर सशस्त्र हल्लेखोरांनी कॅम्पसमध्ये घुसून विद्यार्थी आणि शिक्षकांना मारहाण केली. वसतिगृह शुल्कवाढीच्या वादातून हा हल्ला झाल्याचे सांगण्यात येते. विद्यापीठ प्राधिकरणाने मात्र प्रवेश प्रक्रियेला विरोध करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या एका गटावर हा हल्ला झाल्याचे म्हटले आहे. तथापि, केंद्र सरकारच्या छुप्या समर्थनाने हा प्रकार घडवून आणला असावा, असा संशय व्यक्त होतो.

मागील चार वर्षांपासून देशातील अनेक विद्यापीठे चर्चेच्या आणि वादाच्या केंद्रस्थानी आहेत. विशेष म्हणजे, ही सर्व विद्यापीठे सार्वजनिक म्हणजेच केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांच्या निधीवर अवलंबून असणारी विद्यापीठे आहेत. ज्ञानाच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारी सार्वजनिक विद्यापीठे देशभरातील सामान्य विद्यार्थ्यांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांनाच शिक्षण देतात. उच्च गुणवत्तेचे, विद्याशाखेतील नामवंत अध्यापक येथे ज्ञानदानाचे कार्य करतात. त्यामुळे या विद्यापीठांमध्ये दिले जाणारे विद्याशाखीय ज्ञान दर्जेदारच असते. त्यामुळे या विद्यापीठांमधून पदवी घेणे प्रतिष्ठेचे मानले जाते. सार्वजनिक विद्यापीठांतून ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया सातत्याने चालू असते. विद्यापीठातील सामाजिक शास्त्रांमार्फत समाजातील बदलांचा चिकित्सक अभ्यास केला जातो. त्यास स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दृष्टीने विद्यार्थी समजून घेत असतात. म्हणूनच अशा विद्यापीठांमध्ये जाणकार नागरिक घडत असतात, जे देश-विदेशातील ज्वलंत प्रश्नांवर आपली भूमिका निश्चित करत असतात. संशोधनासह गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांच्या अग्रस्थानी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ आहे. या विद्यापीठाने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्यातीची मंडळी दिली आहे. विद्यापीठाच्या यशकीर्तीचा लौकीक ऐकूनच विदेशातीलही विद्यार्थी प्रवेश घेण्यासाठी येथे मोठ्या संख्येने येतात. गुणवत्तेत सरस असले तरी हे विद्यापीठ देशाचे पहिले पंतप्रधान आणि काँग्रेस नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नावे असल्यामुळेही सरकार समर्थित उजव्या विचारसरणीच्या अनेकांच्या डोळ्यात विद्यापीठाचा लौकीक खुपतो आहे. त्यामुळेही या विद्यापीठातील ज्ञानदानाच्या कार्यात अडथळा आणून विद्यापीठाची प्रतिष्ठा धुळीस मिळवण्याचा डाव सरकारच्या पाठिंब्याने खेळला जात असल्याचे मानले जाते.

केंद्रस्थानी असलेली सत्ता निरपेक्ष वा तटस्थ राहणे अपेक्षित असते; पण सध्यस्थितीतील ही सत्ता 'प्रचारवादी' आहे. जेव्हा देशात प्रचारवादी सत्ता स्थापन होते, तेव्हा नेहमीच उजवी विचारसरणी अधिक प्रबळ व्हायला लागते. भारतात सध्या हेच चित्र पाहायला मिळत आहे. प्रत्येक संस्थेमध्ये उजव्या विचारांचे लोक असतात; पण गेल्या पाच वर्षांमध्ये अशी मंडळी फाजील आत्मविश्वासाने वावरायला लागलेली दिसतात. असे सांगितले जाते की, जेएनयू कॅम्पसवर हल्ला झाला तेव्हा पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली होती किंवा कुलगुरू यापासून नामानिराळे राहिले. तेव्हा केंद्रीय सत्ता दररोजच्या आयुष्यात हस्तक्षेप करते असा याचा अर्थ होतो. हे केवळ कुप्रशासन नव्हे, तर वैचारिक अधिसत्ताकरण आहे.

देशात लोकशाही मूल्यांच्या आधारावर विद्यापीठे आणि नियोजन आयोगासारख्या अनेक संस्था उभ्या राहिल्या. त्या संस्थांना बौद्धिक अधिष्ठान लाभल्यामुळे त्यांना महत्त्व प्राप्त झाले, याचे कारण लोकशाहीच्या मूलभूत संरचनेचे काम करण्यासाठी त्यांची स्थापना झाली. विशेषत: विद्यापीठीय संस्था निव्वळ पायाभूत सोयीसुविधा मिळाल्या म्हणून उभ्या राहत नाहीत. जेएनयू जवळपास हजार एकर परिसरात पसरलेले आहे म्हणून या विद्यापीठाला प्रतिष्ठा लाभलेली नाही. देशाच्या विविध शैक्षणिक संस्थांकडे शेकडो एकरचे कॅम्पस आहेत. पण हे विद्यापीठांच्या विद्वत्तेचे लक्षण नव्हे. तर, त्या विद्यापीठांचे बौद्धिक संचित हे त्यांच्या यश-अपयशाचे गमक असते.

गेल्या तीस वर्षांतील जेएनयूमधील बौद्धिक संचित देशाची लोकशाही दृढ करणारे ठरते. देशाला सर्वाधिक नोकरशहा जेएनयूनेच दिलेले आहेत. हा उल्लेख एवढ्याचसाठी की, जेएनयू आणि महाराष्ट्रातील कुठल्याही विद्यापीठाची तुलना करा; ही विद्यापीठे निव्वळ परीक्षा केंद्रेच असावीत इतकी त्यांची शैक्षणिक दुरवस्था झालेली पाहायला मिळते. पण म्हणून जेएनयू हे काही स्पर्धा परीक्षांचे केंद्र नाही. तिथे संशोधन होते. प्रमाणशास्त्रांची जोपासना करून बुद्धिविकासाचे काम करताना समाजातील सर्वच गोष्टींवर वैचारिक चर्चा घडवून आणणे हे विद्यापीठाचे काम असते. सामाजिक चळवळ समाजाला विचार करायला भाग पाडते, समाजाला दिशा देते; तसे विद्यापीठ बौद्धिक निकषांवर विचार करायला भाग पाडते. जेएनयू ते सातत्याने करताना दिसते. जेएनयूने नोकरशहा पुरवले असतील, पण ते निव्वळ परीक्षा केंद्र कधीच बनले नाही. जेएनयूमध्ये अनेक वैचारिक अभिजन आहेत आणि ते समाजातील तळागाळात काम करणाऱ्या लोकांशी जोडलेले आहेत. त्यांचे अभिजन असणे बिनबुडाचे वा निव्वळ बौद्धिक चर्चा करण्यापुरते सीमित नाही. त्यामुळे हा अभिजनवर्ग जैविक आहे. खासगी विद्यापीठांमध्येही अभिजन आहेत; पण त्यांची समाजाशी नाळ जोडलेली आहे, असे म्हणता येत नाही. देशाच्या बौद्धिक परिप्रेक्ष्यात जेएनयूला महत्त्व आहे, कारण देशातील जैविक विचारवंतांचे ते संवर्धन करते. समाजातील सर्वच प्रश्नांवर बोलले पाहिजे यासाठी बौद्धिक क्षमता तयार करते. जेएनयू जसे अभिजनांचे केंद्र आहे, तसेच समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक दुर्बल घटकांतून आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी प्राप्त करून देणारी संस्थाही आहे. जेएनयूप्रमाणे आयआयटी, दिल्लीतील सीएसडीएस, टाटा समाजविज्ञान संस्था वा बंगळुरुमधील समाजशास्त्र संस्था अशा देशातील अनेक शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. या साऱ्या संस्था जागतिक दृष्टिकोनातून वैचारिक चिंतनाला प्रोत्साहन देणाऱ्या ठरतात, वैशिष्ट्यातून वैश्विकतेकडे जाणाऱ्या ठरतात. त्यामुळेच जेएनयू तुम्हाला तात्त्विकदृष्ट्या वैश्विक बनवते. म्हणूनच जेएनयूचे संवर्धन देशातील लोकशाही मूल्ये टिकवण्यासाठी गरजेचे आहे.

एखाद्या देशात लोकशाही मूल्ये किती रुजली आहेत, हे तपासायचे असेल तर ते त्या देशातील पोलिसांचे वर्तन बघून कळते, असे म्हटले जाते. अधिक गांभीर्याने विचार केला, तर उदारमतवादी लोकशाही चौकटीत टीका-टिप्पणी वा विरोधी मत मांडण्यासाठी किती अवकाश मिळतो, त्यावर तिथली लोकशाही किती सकस आहे हे ठरते. हा अवकाश विद्यापीठांमध्ये मिळाला नाही तर कुठे मिळणार? जेएनयूमध्ये हा अवकाश अजूनही मिळताना दिसतो. गेल्या आठवड्यातील घटनांमुळे हा अवकाश काढून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला असे म्हणावे लागते. आजघडीला देशात विद्यापीठीय चिंतन काय असावे, हे जेएनयू ठरवते. त्यातील अनेक जण देशाची धोरणे ठरवण्याच्या प्रक्रियेत सहभागी झालेले आहेत, राजकीय चिंतक आहेत आणि तरीही ते शासनाचे अंग बनलेले नाहीत. हे सगळे त्यांची वैचारिक स्वायत्तता टिकवून आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करत आहेत. अशा विचारवंतांना वैचारिक स्वायत्ततेची गरज असते आणि ती जेएनयूने आत्तापर्यंत पुरवलेली आहे. तिच्या या स्वायत्त क्षमतेमुळे जेएनयूला लक्ष्य बनवले जात आहे. गेल्या आठवड्यात झालेला हल्ला हा त्याचाच भाग आहे.

जे शिक्षित आहेत ते बुद्धिजीवी आहेत, असा समज खूप पूर्वीपासून निर्माण झालेला आहे. हा समज जेएनयूने मोडून काढला. सामाजिक उत्तरदायित्व घेऊन, समाजाशी नाळ जोडून सातत्याने विचार करणारी माणसे बुद्धिजीवी असतात. अशी माणसे फक्त एकाच क्षेत्रात असतात, असे नाही. जशी ती शैक्षणिक क्षेत्रात असतात तशी ती पत्रकारितेत किंवा नोकरशाहीतही असतात. ही सगळी माणसे सामाजिक जबाबदारी घेत असतात. हीच जाणीव जेएनयूमधील कोणत्याही घटकामध्ये दिसते. जेएनयूवर हल्ला होतो, कारण विद्यापीठातील सामाजिक उत्तरदायित्व मानणारी माणसे पारंपरिक सारासार विचारांच्या विरोधात उभी राहिली आहेत. महाराष्ट्रात पारंपरिक सारासार विचार मोडून काढण्याची 'परंपरा' मोठी आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्यायमूर्ती रानडे, 'सुधारक'कार आगरकर, महर्षी कर्वे, महर्षी शिंदे या सगळ्यांचा संघर्ष बघा. महात्मा फुलेंनी मुलींसाठी शाळा सुरू केली, अस्पृश्यांसाठी विहीर खुली केली. ही पारंपरिक सारासार विचारांच्या विरोधात केलेली कृती होती. शंभर वर्षांनंतर आता आपल्याला ही कृती म्हणजे सामाजिक **उर्वरित पान ४१ वर**

# टोपियाँ बदल गई, पर कुर्सियाँ वही है



✍ डॉ. सूर्यनारायण रणसुभे

व्यवस्थेत बदल म्हणजे काय? तर व्यवस्थेत ज्या अनिष्ट गोष्टी शिरल्या आहेत, जी चुकीची माणसे जमा झालेली आहेत, त्यांना दूर करणे व विकासाचे फायदे शेवटच्या शिडीवर बसलेल्या माणसापर्यंत नेणे. पण हे त्याकाळी झालेले नव्हते. **५३ वर्षांनंतरदेखील यात काही मूलभूत बदल झालेला आहे काय? तर याचे उत्तर एवढेच आहे, की या देशातील श्रीमंत जास्त श्रीमंत होत आहेत. लक्षाधीश कोट्यधीश झाले व कोट्यधीश अब्जाधिश आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येची संख्या दरवर्षी वाढतच चाललेली आहे.**

१९६० नंतर डॉ. राम मनोहर लोहिया या समाजवादी नेत्याने संपूर्ण हिंदी पट्ट्यात काँग्रेस विरोधात मोठी मोहीम उघडली होती. कोणत्याही परिस्थितीत काँग्रेसला सत्तेवरून खेचायचेच हे त्यांनी ठरवलेले होते. त्याप्रमाणे त्यांनी तुफान असा प्रचार सुरू केला. त्यांना तरूण अनुयायी मोठ्या संख्येने मिळाले आणि अखेर हिंदी पट्ट्यातून त्यांनी काँग्रेसला पराभूत केले. यासाठी त्याकाळी अस्तित्वात असलेले सर्वच पक्ष एकत्र आले होते. काँग्रेसचा पराभव उत्तरप्रदेश व बिहारमध्ये झाला. १९६७ साली संविद (संयुक्त विधायक दल)चं सरकार आलं. या नव्या सरकारचे स्वागत जनतेने अभूतपूर्व पद्धतीने केले. कारण त्यांनी जनतेला भरमसाठ आश्वासने दिलेली होती. दीड-दोन वर्षातच लोकांचा भ्रमनिराश झाला. त्यावेळी बनारसमध्ये एका शासकीय आयटीआयमध्ये सामान्य इन्स्ट्रक्टर असलेला, केवळ मॅट्रिक उत्तीर्ण कवी घूमिलने 'पटकथा' या मथळ्याखाली एक दीर्घ कविता लिहिली. त्या कवितेतील ही उपरोक्त ओळ. या ओळीतील 'कुर्सियाँ' या शब्दाचा अर्थ 'व्यवस्थेशी' संबंधित आहे. या दीर्घ कवितेत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते १९६७ पर्यंतच्या राजकारणाचे, तत्कालीन व्यवस्थेचे, सामान्य लोकांच्या आशा-आकांक्षाचे भेदक असे चित्रण करण्यात आलेले आहे. लोकशाही व्यवस्थेने वीस वर्षांच्या काळात सामान्य माणसाच्या पदरात काय पाडले. व्यवस्थेत काही मूलभूत बदल झाला का? याचा शोध घेण्यात आलेला आहे. ज्यावेळी त्याच्या हाती फारसे काही लागत नाही त्यावेळी तो उद्वेगाने लिहितो. पक्ष बदलला, सत्ताधारी बदलले पण व्यवस्था आहे तशीच आहे. या कवितेला संदर्भ आहे १९६७ च्या भारतीय राजकारणाचा. पण आणीबाणीनंतर जनता सरकार आले, त्यांनी काय दिवे लावले यावर चर्चा करताना पुन्हा ही ओळ जीवंत झाली आणि आज २०१९ मध्ये जवळपास ५२ वर्षांनंतरदेखील ही ओळ प्रासंगिक वाटते. यावरून कवीची दूरदृष्टीच सिद्ध होते.


घूमिल हे फारसे शिकलेले नव्हते. पण प्रतिभासंपन्न व आक्रमक वृत्तीचे होते. घरची गरिबी, बेताचा पगार, संयुक्त कुटुंब गावाकडे. हे बनारसमध्ये एका खोलीत राहायचे. अशा प्रतिकूल अवस्थेत जगताना ते आपल्या अवती-भवतीच्या समाजाकडे डोळस नजरेने पाहत असायचे. त्यांची बांधिलकी ही श्रमिकांशी होती. आपल्या कविता हा अवलिया रात्रीच्या वेळी ज्यावेळी सायकल रिक्षावाले थकून-भागून एके ठिकाणी थांबायचे, त्यावेळी हा त्यांच्यात जाऊन त्यांच्यासमोर आपल्या कविता सादर करायचा. आपल्या पहिल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशनदेखील त्यांनी याच ठिकाणी एका रिक्षावाल्याच्या हातून केले. त्याच्या व सर्वसामान्य माणसाच्या अपेक्षा किमान त्याकाळी तरी सत्तेकडून खूप होत्या. त्या पूर्ण होत नाहीत म्हणून त्याने आपल्या एका कवितेत प्रश्न विचारलेला आहे की, 'यह उत्तरप्रदेश है या नपुंसक प्रदेश' परिणाम या ओळीची चर्चा उत्तरप्रदेश विधानसभेत झाली. ही ओळ लिहिली म्हणून त्याला क्षमा मागण्याचा आदेश सरकारने दिला. पण हा बधला नाही. नियमाप्रमाणे त्याला नोकरीवरून काढणेदेखील अवघड होते. आता सरकारकडे एकच हत्यार होते. एका वर्षात घूमिल यांची बदली १८ ठिकाणी करण्यात आली. तरीही त्यांनी क्षमा मागितली नाही. व्यवस्थेविरूद्ध, सत्ताधाऱ्यांविरोधात ...... होता. ही सत्ता व्यवस्था बदलत नाही हा त्याचा राग. खूप तरूण वयात तो वारला.

व्यवस्थेत बदल म्हणजे काय? तर व्यवस्थेत ज्या अनिष्ट गोष्टी शिरल्या आहेत, जी चुकीची माणसे जमा झालेली आहेत, त्यांना दूर करणे व विकासाचे फायदे शेवटच्या शिडीवर बसलेल्या माणसापर्यंत नेणे. पण हे त्याकाळी झालेले नव्हते. ५३ वर्षांनंतरदेखील यात काही मूलभूत बदल झालेला आहे काय? तर याचे उत्तर एवढेच आहे, की या देशातील श्रीमंत जास्त श्रीमंत होत आहेत. लक्षाधीश कोट्यधीश झाले व कोट्यधीश अब्जाधिश आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येची संख्या दरवर्षी वाढतच चाललेली आहे. गरीब जास्त गरीब होत चाललाय. पाच वर्ष आमदार, खासदार राहिलेल्या

लोकप्रतिनिधीचे उत्पन्न कोटी-कोटीने वाढत आहे. यात अपवाद असतील व आहेतही. पण या अपवादामुळे मूळ सूत्र तर पक्के होते. सत्तेत बसणारी मंडळीदेखील तीच असतात. आपले हितसंबंध सुरक्षित रहावे व नेतृत्त्व टिकून रहावे म्हणून ते या पक्षातून त्या पक्षात जातात. व्यवस्था आहे तशीच टिकून राहते आणि म्हणून घूमिल म्हणतात, 'टोपियाँ बदल गई, पर कुर्सियाँ वही है'.

अलीकडे काही मंडळी लोकांसमोर सतत मांडत आहेत, की मागील ७० वर्षात काहीच झालेले नाही. या काळात जर काही झाले असेल, तर सत्ताधाऱ्यांनी आपल्या तिजोऱ्या भरल्या. भ्रष्टाचार केला वगैरे वगैरे. पण हे अर्धसत्य आहे. १९४७ पूर्वी या देशाची जी आर्थिक, सामाजिक व भौतिक स्थिती होती त्यात फार मोठा बदल करण्यात त्यावेळचे सत्ताधारी व त्यावेळची धोरणे कारणीभूत होती. १९४७ पूर्वी देश अन्नधान्याच्या बाबतीत परावलंबी होता. नंतरच्या काळात तो केवळ स्वावलंबी झाला नाही, तर देशांना अन्नधान्य निर्यात करू लागला. स्वातंत्र्यापूर्वी या देशाचे सरासरी आयुर्मान ३५ ते ४० होते. आता ते ६९ वर्षे झालेले आहे. स्वातंत्र्यापूर्वी संपूर्ण देशात १,००० ते १,५०० फोन होते. आता १०० कोटींच्या हातात फोन आहे. ज्या देशात स्वातंत्र्यापूर्वी सुईदेखील तयार होत नव्हती, तेथे आता विमानाची निर्मिती होते. रेल्वेचे जाळे विस्तारले गेले. जी फळे (सफरचंदासारखी) श्रीमंतांची मिरासदारी होती, आज तीच फळे खेड्यातदेखील मिळू लागलेली आहेत. संरक्षण क्षेत्राचा जर अपवाद केला तर सर्वच क्षेत्रात भारताने मागील ७० वर्षात नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. सर्वात मोठा बदल हा येथील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात झाला. स्वातंत्र्यापूर्वी सर्वच क्षेत्रात एक दोन जातींचेच वर्चस्व होते. डॉ. बाबासाहेबांच्या प्रयत्नांमुळे सर्वच क्षेत्रात दुर्बल घटकांना आपल्या कुवतीनुसार, बुद्धिनुसार काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. वर्ण आणि काही मोजक्या जातीचे जे वर्चस्व व नियंत्रण सर्व समाजावर होते, ते संविधानातील 'सर्वांना समान संधी' या सूत्रामुळे लयास गेले. प्रत्येक क्षेत्रात सर्व जाती-जमाती व धर्मातील स्त्री-पुरूष पूर्ण आत्मविश्वासने वावरू लागले. स्त्री-शिक्षणाचा प्रचार-प्रसार वेगाने झाला. हे सर्व घडले ते संविधानातील सर्वांना समान न्याय व सर्वांना समान संधी या व्यवस्थेमुळे. भ्रष्टाचार होत जरी राहिला तरी या गुणात्मक बदलाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

हे सर्व जरी खरे असले तरी १९९० नंतरची सरकारची आर्थिक धोरणे मात्र सर्वांच्या विकासाच्या दृष्टीने घातक ठरलेली आहेत. १९९० पर्यंत या देशाची अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था होती. या मिश्र अर्थव्यवस्थेमुळे भांडवली व्यवस्थेवर नियंत्रण होते. सार्वजनिक उद्योगांना प्राथमिकता दिली जायची. १९९० नंतर मिश्र अर्थव्यवस्थेचे धोरणच नाकारले गेले व खाजगीकरण, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण यांना



**प्रसिद्ध हिंदी कवी घुमिल यांनी पटकथा या दीर्घ कवितेत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते १९६७ पर्यंतच्या राजकारणाचे, तत्कालीन व्यवस्थेचे, सामान्य लोकांच्या आशा-आकांक्षाचे भेदक असे चित्रण केले आहे.**

प्राथमिकता देण्यात येऊ लागली. मिश्र अर्थव्यवस्थेत सर्वांना समान संधी होत्या. त्या व्यवस्थेत या देशातील सामान्य माणूस हा केंद्रस्थानी होता. आता 'अर्थ' व 'भांडवल' हेच केंद्रस्थानी आले. २०१४ नंतर तर हे धोरण अंधाधुंदपणे राबवण्यात येऊ लागले. सार्वजनिक उद्योगांचे वेगाने खाजगीकरण सुरू झाले. मिश्र अर्थव्यवस्थेतील दोष दूर करण्याऐवजी त्याला पूर्णपणे नाकारण्यात आले. त्यामुळे जीवनाचे सर्व संदर्भच बदलून गेले. आता कोट्यधीश असल्याशिवाय कुणी आमदार-खासदार होऊच शकत नाही. एक-दोन अपवाद असतील. लक्षाधिश असल्याशिवाय कोणताही पालक आपल्या मुला-मुलींना उच्च शिक्षण देऊ शकत नाही. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर केवळ बुद्धिमत्ता किंवा जिद्द असून चालत नाही तर आर्थिक स्थिती बळकट असावी लागते. स्पर्धा परीक्षेतून काही जणांना पैशाशिवाय यश मिळते हे खरे, पण आता स्पर्धा परीक्षेत (लेखी) यश मिळाल्यानंतर मुलाखतीसाठी मात्र जात किंवा पैसा लागतो. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे, तथाकथित शिक्षण महर्षींचे फावले. शिक्षण संस्थांतून प्रवेश किंवा नोकरी मिळवण्यासाठी म्हणून लाखो रुपयांची मागणी सुरू झाली. आज महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी म्हणून पाच लाख, माध्यमिकसाठी दहा लाख, उच्च माध्यमिकसाठी १५ लाख व कॉलेजात प्राध्यापक म्हणून चिटकण्यासाठी ३० ते ३५ लाखांची मागणी केली जाते. काही संस्था अपवाद असतील. या संस्थांचे संस्थाचालकच मग राजकारणात प्रवेश करतात आणि त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करतात. एनकेण सत्तेत जाणे एवढाच त्यांचा उद्देश असतो. त्यामुळे 'टोपियाँ बदल गई पर कुर्सियाँ वही है' ही ओळ पुन्हा प्रासंगिक होऊन जाते.

प्रतिभावंत हा काळाच्या पुढे असतो. किंबहुना तो काळाच्या पुढे असतो म्हणूनच तो प्रतिभावंत असतो, असे जगभराचे साहित्य समीक्षक मान्य करतात. या सूत्रानुसार घूमिल प्रतिभावंत ठरतो. १९६७ मध्ये लिहिलेली त्याची ही ओळ आजही प्रासंगिक वाटते ती त्यामुळेच. ●●●

व्यक्तिविशेष

# डॅशिंग राजकारणी मात्र साधी राहणी : ममता बॅनर्जी



✍ प्रकाश खंडेलोटे



राज्यात ज्या पक्षाचं सरकार आहे, त्याच पक्षाचं सरकार केंद्रात असेल तर त्या राज्याच्या विकासासाठी हवा तसा निधी केंद्राकडून खेचून आणता येतो. राज्यात एक आणि केंद्रात दुसऱ्याच पक्षाचं सरकार असेल तर मात्र राज्य सरकारला अर्थात, संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्याला केंद्राशी जुळवून घ्यावं लागतं; परंतु हे सर्व पारंपारिक संकेत बाजूला सारून पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी मात्र आपल्या पद्धतीने कारभार करीत आहेत. नोटाबंदीचा निर्णय असो, की सीएए कायद्याची अंमलबजावणी करणे असो, या अनुषंगाने त्यांनी थेट केंद्र सरकारविरोधाची भूमिका घेत मोदी सरकारवर टीका केली. विशेष म्हणजे, नोटाबंदीच्या निर्णयावर जाहीरपणे टीका करणाऱ्या त्या पहिल्या राजकारणी होत्या.

दीदी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ममता बॅनर्जी मूळच्या कॉंग्रेसच्या नेत्या. पूर्वीच्या कलकत्ता शहरात एका बंगाली हिंदू कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्या १७ वर्षांच्या असतानाच कॉंग्रेस कार्यकर्ते असलेले त्यांचे पिता वैद्यकीय उपचाराअभावी मरण पावले. त्यामुळे आईनेच त्यांचे पालनपोषण केले. आर्थिक परिस्थितीअभावी ममता यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकता आले नाही; परंतु जिद्दीने त्यांनी उच्च शिक्षण घेतले. जोगमायादेवी महाविद्यालयातून इतिहासातील पदवी, तर कलकत्ता विद्यापीठातून इस्लामचा इतिहास या विषयात पदव्युत्तर पदवी त्यांनी मिळवली. त्यांनी कायद्याची पदवीही प्राप्त केली.

ममता बॅनर्जी केवळ १५ वर्षांच्या असताना राजकारणात आल्या. जोगमायादेवी महाविद्यालयात शिकत असतानाच छात्र परिषद युनियन ही कॉंग्रेसची विद्यार्थी शाखा स्थापन केली. १९७० च्या दशकात त्यांनी कॉंग्रेस पक्षात एक तरूण कार्यकर्ती म्हणून राजकीय कारकीर्द सुरू केली. १९७६ ते ८० या चार वर्षांच्या काळात त्यांनी पश्चिम बंगाल कॉंग्रेस महिला आघाडीच्या सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रथमच संसदीय राजकारणात उतरताना १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत त्या ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते सोमनाथ चॅटर्जी यांचा जादवपूरमधून पराभव करून निवडून आल्या. त्यावेळी त्या निवडून येणाऱ्या देशातल्या सर्वात तरूण खासदार होत्या. कॉंग्रेसविरोधी लाटेत १९८९ च्या मध्यावधी निवडणुकीत त्यांनी आपली ही जागा गमावली. मात्र १९९१ च्या निवडणुकीमध्ये त्या कलकत्ता दक्षिण मतदारसंघातून निवडून आल्या. १९९६, १९९८, १९९९, २००४ आणि २००९ च्या निवडणुकांमध्ये त्यांनी कोलकत्ता दक्षिणची जागा कायम राखली. १९९१ मध्ये पी.व्ही. नरसिंहराव सरकारमध्ये त्या मानव संसाधन विकास, युवक कल्याण आणि क्रीडा आणि महिला व बालविकास मंत्री बनल्या. क्रीडामंत्री या नात्याने त्यांनी देशातील क्रीडा क्षेत्राचा विकास करण्याचा प्रस्ताव सरकारकडे दिला होता. मात्र याबाबत सरकारची भूमिका नकारात्मक असल्यामुळे याविरोधात जाऊन त्यांनी आपण क्रीडा मंत्रीपदाचा राजीनामा देऊन कोलकत्त्यातील ब्रिगेड परेड ग्राऊंडवर आयोजित रॅलीत सहभागी होऊन निदर्शने करणार असल्याची घोषणा केली. त्यावरून त्यांच्याकडील ते खाते १९९३ मध्ये काढून घेण्यात आले. त्यानंतर त्यांनी कॉंग्रेसवर टीका करायला सुरुवात केली. पश्चिम बंगालमध्ये कॉंग्रेस हा भाकपच्या हातातील बाहुले असल्याचा आरोप त्यांनी एप्रिल १९९६ मध्ये केला.

**तृणमूल कॉंग्रेसची स्थापना :** बॅनर्जी यांनी १९९७ मध्ये कॉंग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन मुकूल रॉय यांच्यासमवेत अखिल भारतीय तृणमूल कॉंग्रेसची स्थापना केली आणि हा पक्ष लगेच राज्यात दीर्घ काळापासून सत्तेत असलेल्या कम्युनिस्ट सरकारचा विरोधी पक्ष बनला.

१९९९ मध्ये त्या भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए)च्या अटल बिहारी वाजपेयी सरकारमध्ये सामील झाल्या. त्यावेळी त्यांना रेल्वे मंत्रीपद देण्यात आलं. वाजपेयी सरकारमध्ये १ वर्ष ५ महिने आणि २ दिवस आणि डॉ. मनमोहनसिंग सरकारमध्ये याच पदावर १ वर्ष ११ महिने

आणि २३ दिवस रेल्वेमंत्री म्हणून काम केल्यानंतर पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पदाचा राजीनामा दिला. २०११ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवून त्या या राज्याच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री झाल्या.

**ऐतिहासिक कामगिरी :** ३४ वर्षे सत्तेत ठाण मांडून बसलेल्या कम्युनिस्ट राजवटीचा सफाया करून २०११ मध्ये पश्चिम बंगालच्या त्या मुख्यमंत्री बनल्या. डाव्या आघाडीच्या भूसंपादन मोहिमेविरोधात त्यांनी केलेल्या आंदोलनामुळं जे समर्थन मिळालं, त्या बळावर त्यांनी डाव्यांची तीन दशकांहून अधिक काळाची राजवट संपवून राज्याची सत्ता हाती घेण्याचा इतिहास घडवला. मुख्यमंत्रीपदी येताच त्यांनी पहिला मोठा निर्णय घेतला तो सिंगूरच्या शेतकऱ्यांची ४०० एकर जमीन परत करण्याचा. 'गोरखालँड भूप्रदेश प्रशासना'ची स्थापना करून प्रदीर्घ काळापासूनचा गोरखालँडशी संबंधित हिंसाचार संपुष्टात आणण्याचं श्रेयही त्यांनाच जातं. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात अनेक कार्यक्रम त्यांनी राबवले. शिक्षण क्षेत्रासाठी जे कार्यक्रम राबवण्यात आले, त्यामध्ये शिक्षकांचे वेतन दर महिन्याच्या १ तारखेला करण्याच्या निर्णयाचाही समावेश होता. त्याचबरोबर सेवानिवृत्त शिक्षकांना तत्काळ पेन्शन देण्याचा निर्णयही त्यांनी घेतला. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था स्थिती सुधारण्यासाठी हावड्यासह चार शहरांमध्ये पोलिस आयुक्तालये स्थापन केली. राज्याच्या इतिहास आणि संस्कृतीबद्दल जनजागृती करण्याचा एक भाग म्हणून कोलकत्ता महानगरातील काही रेल्वे स्थानकांना स्वातंत्र्य सैनिकांची नावं दिली. इमामांना मानधन देण्याच्या त्यांच्या निर्णयावर खूप टीका झाली. हा निर्णय घटनाबाह्य असल्याचे कलकत्ता उच्च न्यायालयाने सांगितले. राज्यात वर्षभरात पोलिओचा एकही रुग्ण आढळला नसल्याबद्दल बिल अँड मेलिंडा गेट्स फाऊंडेशनचे बिल गेट्स यांनी पत्र पाठवून बॅनर्जी आणि त्यांच्या प्रशासनाचं कौतुक केलं. ही कामगिरी म्हणजे केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी मैलाचा दगड असल्याचे फाऊंडेशनने पाठवलेल्या पत्रात म्हटले होते. पश्चिम बंगालमधील नाडिया जिल्ह्याला देशातला पहिला हगणदारीमुक्त जिल्हा बनवल्याबद्दल युनिसेफने बॅनर्जी यांचं अभिनंदन केलं होतं.

**वादग्रस्त वक्तव्य :** देशात बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ होण्यास पुरूष आणि स्त्रियांमधील मनमोकळ्या गप्पा कारणीभूत असल्याचं वक्तव्य १७ ऑक्टोबर २०१२ रोजी करून त्यांनी वाद ओढवून घेतला होता. यापूर्वी स्त्री-पुरूष हातात हात घालून चालत, तेव्हा ते पालकांकडून पकडले जात असल्याने फजिती व्हायची. आता सर्व काही खूप खुलं आहे; खुल्या पर्यायांसह खुल्या बाजारपेठेसारखं, असंही विधान त्यांनी केलं होतं. या वक्तव्याबद्दल राष्ट्रीय प्रसारमाध्यमांनी ममता बॅनर्जी यांच्यावर टीकेची झोड उठवली होती.

## लोकसभेत खासदाराची कॉलर पकडली

- **साधी जीवनशैली :** दोन वेळा रेल्वेमंत्री आणि दुसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून काम करत असलेल्या ममता बॅनर्जी यांची जीवनशैली अतिशय साधी आहे. दागिने, महागडे कपडे आणि सौंदर्य प्रसाधनांचा सोस नसलेल्या ममता साधी पारंपारिक बंगाली साडी परिधान करतात.
- **लोकसभेत खासदाराची कॉलर पकडली :** ममता बॅनर्जी यांचे राजकारणातील यश त्यांच्या आक्रमकतेशी जोडले जाते. ११ डिसेंबर १९९८ रोजी लोकसभेचे कामकाज सुरू असताना त्यांनी समाजवादी पक्षाचे खासदार दरोगा प्रसाद सरोज यांना महिला आरक्षणास विरोध करण्यापासून रोखण्यासाठी कॉलर धरून हौद्यातून बाहेर काढले.
- **जयप्रकाशजींचा ताफा अडवला :** १९७७ च्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांच्या विरोधात सर्व विरोधी पक्ष एकवटले होते. इंदिरा गांधी यांना निवडणुकीत पराभूत करण्यासाठी जयप्रकाश नारायण यांच्या मोहिमेदरम्यान, आपल्याकडं लक्ष वेधून घेण्यासाठी ममता बॅनर्जी या जयप्रकाशजींच्या ताफ्यासमोर आडव्या झाल्या आणि त्यांनी स्वतःला जमिनीवर झोकून दिले. ममता यांच्या या धाडसाच्या प्रदर्शनानं ज्येष्ठ काँग्रेस नेत्यांना तालुका पातळीवरील या कार्यकर्तीची दखल घेणे भाग पडले होते.

बॅनर्जी यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कारकीर्दीला शारदा चिटफंड घोटाळ्याने कलंकित केले. आर्थिक अपहाराबद्दल मदन मित्रा या त्यांच्या मंत्रिमंडळातील माजी मंत्र्याला कारावासाची शिक्षा झाली. शिवाय पक्षाचे खासदार कुणाल घोष आणि महत्त्वाची पदे भूषविणाऱ्या इतर पक्ष कार्यकर्त्यांवरही न्यायालयाने कठोर शब्दात ताशेरे ओढले होते.

२०१६ मध्येही दुसऱ्या टर्मसाठी दोन तृतीयांश बहुमत मिळवून सत्तेत आलेल्या ममता बॅनर्जी यांनी मोदी सरकारशी उघडउघड विरोधाची भूमिका घेण्याचे धारेण अवलंबले. मोदींचा नोटाबंदीचा निर्णय असो, की दर महिन्याला प्रसारित होणारा 'मन की बात' कार्यक्रम, त्यांचे टीकास्त्र सुरूच राहिले. 'मन की बात' कार्यक्रमात मोदी मनातील बात नाही तर मोदींची बात सांगत असतात, अशी टीका त्यांनी केली होती. नोटाबंदीवरूनही त्यांनी मोदी सरकारला धारेवर धरले होते. नोटाबंदी म्हणजे एक आर्थिक अराजकता आणि आपत्ती असल्याची टीका त्यांनी केली होती. परदेशातला श्रीमंतांचा पैसा देशात परत आणण्याच्या आश्वासनाची पूर्तता करण्यात आलेल्या अपयशावरून लोकांचे **उर्वरित पान ४४**

# खंडित महाराष्ट्राची व्यथा : माझी मैना गावावर राहिली!

✍ प्रा. डॉ. सोमनाथ कदम

विसाव्या शतकाच्या मध्यावर झालेला अण्णा भाऊ साठे यांचा उदय ही एक ऐतिहासिक घटना मानली पाहिजे. मराठीतील प्रतिभावंत लेखक, सामाजिक जाणिवेचे कार्यकर्ते, वंचित समुदायाच्या वेदनांना आवाज देणारे मूकनायक, सामाजिक, राजकीय भान असलेले वास्तवदर्शी शाहीर आणि बदलत्या राजकारणावर मार्मिक बोट ठेऊन वास्तव सत्याचा उलगडा आपल्या लेखणीच्या माध्यमातून करून देणारे साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांचे लेखन म्हणजे समाजबदलाचे एक हत्यारच ठरले.

अण्णा भाऊ साठे यांचे मराठीसह जगभरातील सत्तावीस भाषांमध्ये विपुल लेखन प्रसिध्द आहेच; परंतु लोकशाहीर ही त्यांची खास ओळख. कारण पोवाडा, लावणी, छक्कड, लोकनाट्य हा अण्णा भाऊंचा आवडता लेखनप्रांत होता. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यानंतर अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेली 'माझी मैना गावावर राहिली' ही छक्कड विशेषत्वाने महत्त्वाची ठरली. यातील शब्दबोध व अर्थबोध पहिल्यांदाच साध्या-सोप्या भाषेत ज्येष्ठ लेखक, विचारवंत व समीक्षक उत्तम कांबळे यांनी 'माझी मैना गावावर राहिली' या पुस्तिकेतून केलेला आहे.




'माझी मैना गावावर राहिली' ही अण्णा भाऊंची छक्कड लोकप्रिय ठरली. राघू-मैना किंवा प्रियकर-प्रेयसी यांच्यातील हा संवाद लोकप्रिय झाला, मात्र त्याच्या खोलात जाऊन चिकित्सक चिंतन फारसे झाले नव्हते, किंबहुना ते होऊ दिले नाही असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. कारण ऐंशीच्या दशकानंतर अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने संभ्रमाची मांडणी करणारे लोक पुढे आले. म्हणूनच कोणत्याही महापुरूषांचा इतिहास जर नीटपणे मांडला नाही तर समाजातील विघातक शक्ती तो आपणास सोयीस्कर अशा रीतीने वळवून दुही-दुफळीच्या प्रयत्नात यशस्वी होऊ शकतात, हा प्रा. डॉ. सदानंद मोरे यांनी दिलेला इशारा या निमित्ताने महत्त्वाचा वाटतो.

अण्णा भाऊ साठे यांचा पिंड लेखकाचा असला तरी त्यांचा वारसा कलेचा होता.

*आमच्या घरात*
*गाण्याची शेती!*
*शेती ती सदा बहराला येती*
*डफ तुणतुण्याचे आम्ही धनी!*
*सदा मैदानी!*

ही अण्णा भाऊंची लेखन प्रयोजनाची व्यापकता होती. म्हणूनच 'माझी मैना गावावर राहिली' या वरकरणी लावण्यांनी नटलेल्या छक्कडीमध्ये अण्णाभाऊ साठे यांनी तत्कालीन संयुक्त महाराष्ट्राच्या संघर्षाचा रोमहर्षक इतिहास कथन केलेला आहे. त्यातील सौंदर्यस्थळांबरोबरच अण्णा भाऊ साठे यांना अभिप्रेत असलेले चिंतन आणि चिंता उत्तम कांबळे यांनी मोठ्या ताकदीने व सूक्ष्म अभ्यासातून या पुस्तिकेत मांडली आहे. 'माझी मैना गावावर राहिली' या रचनेत अण्णाभाऊ साठे यांनी बहुविध अनुभवविश्व रेखाटले आहे. अण्णा भाऊंच्या लेखणीतील निसर्गसौंदर्य, महाराष्ट्र-कर्नाटक परिसरातील स्थानिक कृषी संस्कृती, स्थानिक स्त्रीजीवन व दागदागिने, लोकांची स्थलांतरे व त्यातून मुंबईसारख्या ठिकाणी कामधंद्यासाठी गेल्यावर होणारी जगण्याची दुर्दशा आणि कुटुंबापासून दूर गेल्याने अर्थात, मैनेपासून विरह आल्याने झालेली जीवाची घुसमट या सगळ्या पार्श्वभूमीवर नकळतपणे खंडित महाराष्ट्राची व्यथा अण्णा भाऊ कसे मांडतात, याचे चिकित्सक विश्लेषण उत्तम कांबळे यांनी केलेले आहे.

अण्णा भाऊ साठे हे रंजनवादी लेखक नव्हते तर लोकप्रबोधन हा त्यांच्या लेखणीचा ध्यास होता. २ मार्च १९५८ रोजी भरलेल्या महाराष्ट्र दलित साहित्य संघाच्या पहिल्या साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून अण्णा भाऊंनी आपली भूमिका त्याच शब्दात मांडलेली होती. वाङ्मय हा जगाचा तिसरा डोळा असून तो डोळा सदैव पुढे आणि जनतेबरोबर असणे जरूर आहे, असे ते म्हणतात. म्हणूनच ज्या पध्दतीने अण्णा भाऊंनी पारंपारिक गणात देवदेवतांऐवजी माणूस पुढे आणला, त्याचप्रमाणे 'माझी मैना गावावर राहिली' या रचनेतून न दिसणारे खंडित महाराष्ट्राचे दु:ख समोर आणले.

म्हणूनच अण्णा भाऊंनी त्यांच्या छक्कडमध्ये मांडलेली मैना ही दुसरी तिसरी कुणी नसून बेळगाव आणि त्या परिसरातील जनताच आहे. याचा उलगडा मोठ्या ताकदीने करण्यात 'माझी मैना गावावर राहिली' या पुस्तिकेच्या माध्यमातून समीक्षक उत्तम कांबळे यशस्वी झालेले दिसतात.

'माझी मैना गावावर राहिली' या छक्कडची सुरुवात आणि शेवट विलक्षण आहे. पहिल्या ओळीपासून वाचकांचे मन रिझविणारी ही छक्कड जेव्हा आपण वाचतो किंवा ऐकतो तेव्हा तिचा शेवट वाचताना आपल्याला वास्तव सत्याचे भान तर

येतेच; परंतु आपल्यासुध्दा जीवाची काहिली झाल्याशिवाय राहत नाही.

'माझी मैना गावावर राहिली' समजून घेताना सुरुवातीला मैनेचे रूपवर्णन, मुंबईचं चित्रण, दरम्यान उठलेली संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि संयुक्त महाराष्ट्राची झालेली निर्मिती या सगळ्या घडामोडी आपल्यासमोर तरळतात. पुढे मात्र त्या घडामोडीतून तत्कालीन विस्थापित झालेल्या सीमा भागाची अवस्था अण्णा भाऊ मांडतात.

*त्याच दरम्यान उठली, चळवळ संयुक्त महाराष्ट्राची*
*बेळगाव, कारवार, निपाणी, गोव्यासह एक भाषिक राज्याची!*

इथे आपणास अण्णा भाऊंचा मूळ हेतू लक्षात येतो. हा निर्देश करताना उत्तम कांबळे म्हणतात, अण्णा भाऊंच्या प्रतिभेला इथं दाद द्यावी तेवढी थोडीच. बेळगाव आणि मुंबई या अतूट नात्याची ताटातूट करणाऱ्यांविषयी स्वाभाविकच सामान्य वाचकाच्या मनात राग येतो. तो मूठ आवळून संघर्षाला तयार होतो आणि इथं अण्णा भाऊंचा चळवळीचा हेतूही सफल होतो.

अण्णाभाऊंची ही छक्कड खऱ्या अर्थाने लोकमानस ओळखणारी आहे. महाराष्ट्रापासून तुटलेल्या भागांचा विचार करून अण्णाभाऊंनी जाणीवपूर्वक 'खंडित महाराष्ट्राची' असा शब्दप्रयोग केलेला आहे. हे सामान्य वाचकांना पटवून देताना उत्तम कांबळे यांनी त्या छकडीची बारकाईने समीक्षा केलेली आहे. तसेच ही दुरावलेली मैना महाराष्ट्रात येऊन तिनं विणकाम केल्याशिवाय महाराष्ट्र अखंडित होणार नाही हे उत्तम कांबळे यांनी मांडलेले विधान म्हणजे लोकभावनेचे शब्दबध्द रूपच ठरते. आज संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होऊन सहा दशक झाली तरी बेळगावसह अन्य मराठी भाषिकांचा हा सीमा प्रश्न तसाच राहिला याचे मोठे शल्य अण्णाभाऊंनी मांडले होते. तीच बोचणी घेऊन आजही या भागातील सीमाबांधव जगत आहेत. बेळगावरूपी ही मैना महाराष्ट्रात आल्याशिवाय या लढाईला अंत नाही.

या छक्कडीच्या शेवटच्या चरणात अण्णा भाऊंनी शिवशक्तीला आवाहन केले आहे. ते आवाहन आजही आव्हान बनून आपल्यासमोर उभे आहे. या संदर्भात अण्णा भाऊ साठे म्हणतात,

*आता वळू नका, रणी पळू नका कुणी चळू नका!*
*बिनी माया रायची अजून राहिली!*
*माझ्या जीवाची होतीया काहिली!!*

अर्थात बेळगाव, कारवार, डांग, निपाणीसह अखंडित महाराष्ट्रासाठी संयुक्तपणे कधी बिनी मारणार आणि ही जीवाची काहिली कधी संपणार हा एक मोठा प्रश्न आहे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची 'माझी मैना गावावर राहिली' ही छक्कड आजपर्यंत केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून गायिली, वाचली जात होती. त्या छक्कडीतील ओळी-ओळीतील मतितार्थ वाचकांच्या समोर आणण्याचे व एका अर्थाने थंड पडलेल्या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची धार वाढविण्याचे मोठे कार्य समीक्षक उत्तम कांबळे यांनी केलेले आहे. सुजाण वाचकांनी एका दमात समजून घ्यावे असे हे पुस्तक सीमाबांधवांसाठी ऊर्जा देणारे आहे, हे नक्की. ●●●

**माझी मैना गावावर राहिली !**
**लेखक : उत्तम कांबळे, लोकवाड:मय, मुंबई**
**पृष्ठसंख्या - २५ , किंमत - ३०/-**

पान ३५ वरून

## वैचारिक लढाई कसली, ही तर हिंसाच

विकासाचा मार्ग असल्याचे लक्षात येते. सध्यस्थितीत या देशातील उजवा विचार म्हणजेच हिंदुत्व हे पारंपरिक विचार जोपासून त्याचे अधिसत्ताकरण करणारे आहे. उजव्या विचारांचे स्वरूप बहुसंख्य लोकांच्या सारासार विचारांना अग्रभागी मानणारे आहे. हा सारासार विचार बुद्धिप्रामाण्यवादी असतोच असे नाही. हा लोकशाहीवादी, समतावादी, बंधुत्ववादी आहे असेही म्हणता येत नाही. त्यामुळे जेएनयू वा वैचारिक चिकित्सा घडवणाऱ्या विद्यापीठांना, संस्थांना, चळवळींना पारंपरिक सारासार विचारांनी लक्ष्य बनवलेले आहे.

हे लक्ष्य कसे केले आहे? 'टुकडे टुकडे गँग' असा शब्दप्रयोग अलीकडच्या काळात सातत्याने वापरला गेला आहे, वापरला जात आहे. पण हा शब्द कसा आणि कुठून आला? दलित-आदिवासींना आणि त्यांच्या चळवळींना कायद्याच्या कचाट्यात अडकवले, की चर्चेला वावच राहत नाही. ते सगळे शत्रूच ठरवले जातात. बुद्धिवाद्यांच्या अवकाशक्षेत्रात त्यांच्यावर 'कम्युनिस्ट' असा शिक्का मारला, की 'ते आणि आपण' या विभागणीसाठी बाकी काहीही करावे लागत नाही. राजकीय परिक्षेत्रात हिंदू-मुस्लिम अशी विभागणी केली, की कोण 'आपले' हे ठरून जाते. इथल्या उजव्या विचारांनी सर्वच परिक्षेत्रांत विरोधाचे लक्ष्य ठरवून टाकले आहे. 'टुकडे टुकडे गँग' हे त्याचेच एक उदाहरण ठरते. ही विभागणी इथल्या पारंपरिक विचाराला बौद्धिक आणि शारीरिक हिंसा करण्यासाठी प्रवृत्त करते आणि बळ पुरवते. मग हा मुख्य प्रवाही विचार तुम्हाला वाळीत टाकतो. ते शक्य नसेल तर हिंसेच्या बळावर- त्यात वैचारिक हिंसेचाही समावेश होतो. तुम्हाला नामोहरम करण्याचा प्रयत्न केला जातो. आता होत असलेल्या उजव्या विचारसरणीच्या विरोधातील संघर्ष केवळ कुठल्या एका राजकीय पक्षाच्या विरोधात केला जात आहे असे नव्हे. हा संघर्ष मानवी मूल्यांचा संघर्ष आहे. पुरोगामी विचार नेहमीच नवी मानवी मूल्ये स्वीकारत असतो. पारंपरिक सारासार विचार नेमका त्याविरोधात असतो. हा विचार त्या त्या काळातील सत्तेबरोबर असूही शकतो. आता पारंपरिक विचार हा सत्ताधाऱ्यांचा विचार बनलेला आहे. हे इतिहासातही घडलेले आहे. या विचारांना विरोध करणाऱ्या व्यक्ती, संस्था, समूह यांना हिंसेच्या माध्यमातून लक्ष्य बनवून पराभूतही केलेले आहे. जेएनयूमध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराला 'पेरलेला हिंसाचार' म्हणता येईल. ही पेरलेली हिंसा उजव्या विचारांच्या इतिहासाचे पुनर्चक्र मानता येईल. ●●●

# गर्भाशये जपून ठेवा



भाकरीच्या तुकड्याआड येणारं गर्भाशय काढून टाकण्याची लाट आता काही नवी नाही. पुरोगामी विचारांचा वारसा मिरवणाऱ्या महाराष्ट्रासाठी ही बाब लज्जेनं मान खाली घालावी अशी आहे. पण अजून आपल्या कारभाऱ्यांना या लाजेचं काही वाटत नाही. आपल्याला फुले, शाहू, आंबेडकर आणि सावित्रीबाई यांचं नाव घेण्याचा नैतिक अधिकार उरलेला आहे काय, हेही त्यांना कळत नसावं. ऊसतोडणी करणाऱ्या सुमारे चाळीस ते पन्नास हजार महिलांनी गेल्या पाच-सहा वर्षांत 'कोक' म्हणजे गर्भाशय काढून टाकलं आहे. त्यासाठी काहींनी मोठमोठ्या इस्पितळात जाऊन महागडं ऑपरेशन करून घेतलं आहे. काहींनी बोगस डॉक्टरांचा रस्ता धरला. काहींनी वनस्पतीचे तुकडे देणाऱ्या वैद्यबुवांचा रस्ता धरला होता. काही जणी यात दगावल्याही असतील; पण त्याबाबतची वाच्यता कुठंही होऊ शकली नाही. 'नाही चिरा, नाही पणती' याप्रमाणं त्या संपूनही गेल्या असतील. अखेर काढून टाकलेल्या गर्भाशयांना वाचा फुटली आणि राज्य सरकारनं नेहमीप्रमाणं एक समिती नेमली. समितीनं सांगितलं की, पन्नास-साठ नव्हे तर दहा-बारा हजार महिलांनी 'कोक' काढून टाकलं असावं. आता डॉक्टरांना सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाच्या सूचनांना कोणी हिंग लावून विचारत नाही. कोणी चंगळवाद म्हणून, विकृती म्हणून गर्भाशय काढून टाकत नाही, तर रोजगार बुडू नये आणि ओघानंच चूल बंद पडू नये म्हणून 'कोक' काढून टाकतं. हा मार्ग अनैतिक आहे, अनैसर्गिक आहे, शरीरशास्त्राला धरून नाही तरीही 'कोक' काढून टाकण्यासाठी महिला पुढे येतात. गुपचूपपणे हे काम करतात. झाले एकदाची मोकळी असं स्वतःच स्वतःची समजूत काढून, 'सुटले बाबा' असं म्हणत निःश्वास सोडतात.

ऊसतोडणी कामगार कामाच्या पगारापोटी मुकादमाकडे उचल घेतात. प्रत्येक कुटुंबात एक छोटा कोयता जन्माला येतो. तो सुमारे सहा महिने ऊसतोडणी करतो. या काळात महिलांची अडचण होते. मासिक पाळीच्या काळात चार दिवस त्या अशक्तपणामुळे ऊस तोडू शकत नाहीत. भली मोठी मोळी बैलगाडीत रचू शकत नाहीत. गाडी हाकू शकत नाहीत. चार दिवस त्यांना झोपडीबाहेर बसून रहावं लागतं. रोजगार बुडतो. महिन्यात चार दिवस म्हणजे सुमारे सहा महिन्यांत चोवीस दिवस रोजगार बुडतो. दिवसाला हजारभर रुपये धरले तर या कालावधीत वीस-पंचवीस हजार रुपयांचं तरी नुकसान होतंच. मुकादमाकडून घेतलेली उचल अंगावर पडते. व्याज वाढतं. मुकादम पिळवणूक करायला सुरुवात करतो. घर जप्तीपासून ते मारहाणीपर्यंत काही घडू शकतं. दरवर्षी उचल अंगावर पडायला लागते. कारण दरवर्षी पाळीच्या काळात रोजगार बुडतो. एक चक्र तयार होतं. भाकरीच्या आड गर्भाशय उभं राहतं. त्याला हलवण्याचा एकच मार्ग असतो. खरं तर तो अमानवी, अनैतिक आणि क्रूर असतो. 'कोक' काढून टाकण्याचा मार्ग. या कष्टकरी महिलांना कसली सवलत नसते. काळ पाळीचा असो, काळ गरोदर अवस्थेतला असो किंवा काळ ओली बाळंतीण होण्याचा असो. कष्टकरी महिलांना भाकरी पकडण्यासाठी, चूल पेटती ठेवण्यासाठी काळाच्या मानेवर पाय ठेऊन धावावंच लागतं. बाई सरकारी नोकरीत असेल तर तिला बाळंतपणाची पगारी रजा, कार्यालयात तिच्यासाठी सुरक्षा समित्या; पण बाई उघड्या जगात कष्ट करणारी असंल तर तिला काही मिळणार नाही. नोकरदार बायांना काही देऊ नका असं म्हणणं चुकीचं आहे. प्रश्न आहे तो कष्टकरी बायांच्या वाट्याला हे सारं, निदान अंशतः तरी का येत नाही? सगळ्या बाया एकसमान, त्यांचं दुःख समान मग असा भेद का, असा प्रश्न तयार होतो. बाया-बायांत भेद करणं कोणत्याच दृष्टीनं उचित नाहीय.

आता हा प्रश्न सोडवायचा कसा? त्याचं साधं उत्तर आहे की, पाळीच्या काळात बुडणारा चार दिवसांचा रोजगार शासन आणि साखर कारखान्यांनी एकत्रित येऊन द्यायला हवा. त्याची एक व्यवस्था तयार करायला हवी. जर कामगाराची प्रकृती चांगली राहिली, भाकरीची गॅरंटी त्याला मिळाली तर तो अधिक चांगलं काम करू शकतो. काही राज्यांत भगवी धारण करणाऱ्यांना, गायी राखणाऱ्यांना मासिक पेन्शन सुरू झाली आहे. ऐतखाऊ असणाऱ्यांना, बुवाबाबांना पेन्शन मिळते तर मग या कष्टकरी महिलांना का मिळू नये? त्यासाठी केवळ महिलांनीच नव्हे तर जाणत्या समाजांनीच पुढाकार घ्यायला पाहिजे. सरकारवर विधायक दबाव आणला पाहिजे.

## प्रामाणिकतेचं नाव कामगार

ऊसतोडणी कामगारांच्या बाबतीतच घडलेली ही एक सुखद घटना. मजुराइतका प्रामाणिक कोणी नाही असा संदेश देते. मजूर म्हणजे केवळ युनियन बांधणार, सारखी पगारवाढ मागणारा घटक नव्हे तर तो इमानदारीचं, प्रामाणिकपणाचं प्रतीकही असणे हे पुन्हा एकदा कोल्हापूर जिल्ह्यातील

शिरोळ्यामध्ये घडला. महाराष्ट्रात स्वच्छ, गुणवत्तापूर्ण आणि पारदर्शक चालणारे साखर कारखाने कमी आहेत. कारखान्याशी जोडल्या गेलेल्या सर्वच घटकांचा सम्यक विचार आणि विकास करणारे कारखाने कमी आहेत. त्यात शिरोळचा एक श्री दत्त कारखाना. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील यांनी तो जन्माला घातला. त्याचा विकास केला. आता त्यांचे पुत्र गणपतराव पाटील हे तीच परंपरा घेऊन कारखाना चालवतात. सहकारी क्षेत्राचा मासळी बाजार होत असल्याच्या काळात असे काही कारखाने जागल्याची भूमिका करताना आणि दीपस्तंभाची भूमिका करताना दिसतात.

तर त्याचं झालं असं, नुकत्याच सरलेल्या १५ जानेवारीला श्री दत्त कारखान्याच्या कार्यक्षेत्रावरच मजुरांच्या वस्तीत पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम सुरू होता. तो सुरू असतानाच सूत्रसंचालकाने एक घोषणा केली. सापडलेले बारा हजार रुपये प्रामाणिकपणे परत करणाऱ्या तारामतीचा सत्कार आता होणार आहे. ही तारामती बीड जिल्ह्यातल्या बेलगावची. तिचं सगळं नाव तारामती सिद्धेश्वर चौरे. रंगानं गडद काळी. अंगानं सडपातळ. ऊसतोडणी मजूर म्हणून ती दत्त कारखान्याच्या परिसरात आलेली. लेकराबाळासह झोपडीत राहणारी. कोयत्याची एक मेंबर म्हणून फडात जाऊन ऊसावर सपासप कोयता चालवणारी. म्हणजे कोयतेवाली. तिचा सत्कार एका महिलेनं केला. तिच्या हातात हात दिला आणि लागलीच तो काढून घेत माझ्याकडं पाहत म्हणाली, सर बघा बघा हिचा तळहात बघा. मी लागलीच तिच्या हातात हात दिला. एका क्षणातच असं वाटलं की बोरीबाभळीच्या काट्यानं भरलेल्या फांद्याच हातात धरल्या आहेत. जणू काही तिचा तळहात काट्यांनीच भरलेला आहे. मीही हात काढून घेतला आणि तिच्या तळहातावरून बोटे फिरवली तर सगळा तळहात काटेरी वाटत होता. कोयता चालवून, उसाचा काटेरी पाला सोलून, बैलांचा टणक दोर पकडून तिच्या नाजूक तळहाताची अक्षरशः वाट लागलेली. टोकदार खडकांचा जणू काही छोटा प्रदेशच तेथे तयार झालेला आहे. क्षणभर मन हळहळलं.

महात्मे नावाच्या खानावळीजवळ या तारामतीला पैशानं भरलेली थैली सापडली. ती तिनं उचलली. थेट ती कारखान्यात गेली. गणपतराव पाटलांच्या हातात दिली. थैली उघडून पैसे मोजण्यात आले. ते निघाले बारा हजार रुपये. कारखान्यानं चौकशी केली तर हे पैसे निघाले एका पुरवठादाराचे. मजुरांचा पगार भागवण्यासाठी हे पैसे तो घेऊन जात होता आणि ते हरवले. तारामतीनं एका पैशाला हात लावला नाही. खरं तर, तिच्या दरिद्री आयुष्याला एखादं ठिगळ जोडण्यासाठी पैशाची मदत झाली असतीही. पण तिचा प्रामाणिकपणा तिला या मोहात पडू दिला नाही. फुकटच्या पैशानं अंगावर चट्टे उठतात. पाप होतं अशा कष्टकऱ्यांच्या भावना असतात. त्यापैकी एक तारामती. गणपतरावांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसमोर तिचा सत्कार केला. कुणाकडून काही न घेता ती पालावर



आली. आपल्या हातून कोणतं तरी पुण्य घडलं आहे याच भावनेत ती होती आणि या समारंभात याच भावनेनं ती आली होती.

तारामतीचं हे काम ऐकून खूप आनंद वाटला. तिच्या तळहातावर उगवलेली काटेरी झुडपं मृदू होती असं वाटायला लागलं. कष्ट, प्रामाणिकपणा आणि सरळ मार्गानं जगण्याची जिद्द म्हणजे तिचे तळहात होय असं वाटायला लागलं. तिच्या इमानदारीला मनातल्या मनात सलाम केला. मनातल्या मनात एवढ्याचसाठी की छोटा सत्कार घेऊन फाटक्या झोपडीसमोरची चूल पेटवायला ती कधीच निघून गेली होती. कौतुकाचे शब्द न ऐकताच.

## भारतीय कुटुंबांना जातोय तडा

पन्नास साठ वर्षांपूर्वी जत्रा-यात्रात भाकीतं केली जायची. खरं तर ती आजही केली जातात. अनेक भाकितांपैकी एक भाकीत पुन्हा पुन्हा जोर देऊन सांगितलं जायचं आणि ते म्हणजे लोक हो गावागावातल्या घरातल्या भिंतींना भूकंप नसताना तडे जातील. पाऊस नसताना तडे जातील. घराचा आतला भाग भिंतींनी भरून जाईल. एकेका घरात अनेक चुली जळतील. माणसं एकमेकांकडं तोंड नव्हं तर पाठ करतील... अजूनही बरंच काही सांगितलं जायचं. भिंतींना तडे जातील आणि एकेका घरात अनेक चुली उभ्या राहतील हे भाकीत मात्र महत्त्वाचं मानलं जायचं. अर्थात, हे सांकेतिक असायचं. सांकेतिक शब्दाचं पोट चिरलं की त्यातून एक अर्थ बाहेर पडायचा आणि तो म्हणजे संयुक्त कुटुंब पद्धतीला तडे जाणार आहेत. विभक्त कुटुंबाचा जमाना येणार आहे. खरं तर औद्योगिक क्रांतीपासून असं भाकीत केलं जात आहे. शहरात जन्माला आलेल्या माणसानं खेड्यातल्या माणसाला ओढून शहरासाठी केलं. एकत्र कुटुंबाला पहिल्यांदा तेथे तडा गेला. पंक्तीत सर्वांबरोबर जेवणारा माणूस शहरात जाऊन नाश्ता, लंच, डिनर वगैरे बरंच काही करू लागला. हे सारं यंत्राच्या आदेशावरून चाललेलं होतं. न्याहारी कधी करायची, दुपारचं जेवण कधी करायचं आणि रात्रपाळीत भोजन घरी करून यायचं की कारखान्यात पंधरा मिनिटांत उरकायचं, हेही यंत्र ठरवत होतं. म्हणजे त्याचं संगोपन करणारी भांडवलशाही

ठरवत होती. माणूस शहरात छोट्याशा जागेत गेला. तिथं त्याचं कुटुंब वाढलं तेव्हा कुटुंबातील सदस्य इतरत्र रहायला गेले. म्हणजे खेड्यातलं आणि शहरातलंही एकत्र कुटुंब भग्न पावत गेलं. शेती अडचणीत यायला लागली तशी गावच्या गावं शहराकडं सरकू लागली. झोपडपट्ट्यांत, फूटपाथवर अतिक्रमण केलेल्या जागांवर झोपड्या उभ्या करू लागली. या शर्यतीतही कुटुंब फुटत होतं. सर्वांना एकत्रित राहणं शक्य नव्हतं. कुटुंबाला जाणारे तडे रोखणे अशक्य होत होते.

शहरातही बरीच वर्षे एकत्र कुटुंबात राहण्याचा प्रयत्न माणसानं केला नाही असं नाही. पण परिस्थिती या प्रयत्नांना साथ देत नव्हती. घरं सोडण्याची आणखीही काही कारणं तयार होत होती. रोजगारासाठी घर सोडून बाहेरच कुटुंबाशिवाय स्थायिक होण्याबरोबरच शिक्षणाचंही कारण पुढं आलं. गावात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नाही. गावात नोकरीच्या, विकासाच्या, प्रगतीच्या, व्यक्तिविकासाच्या संधी नाहीत म्हणूनही हजारो, कोट्यवधी युवक घर सोडून बाहेर पडले. जे बाहेर पडले ते परत आलेच नाहीत. गावात जाऊन काय करायचं? हा सर्वांत मोठा प्रश्न त्यांच्यासमोर होता. शहरातच ते दाटीवाटीच्या जगात स्थायिक झाले. या छोट्याशा घरात गावाकडच्या नातेवाईकांना जागा नव्हती. एकाची दोन, दोनाची चार अशी स्वतंत्र कुटुंबं होत राहिली. तीच नवी संस्कृती बनली. जे कुटुंबात राहतात त्यांचा कुटुंबातल्या अन्य सदस्यांशी संबंध कमी होऊ लागला. जो तो आपल्या आपल्या जगण्याच्या स्पर्धेत होता. धावत होता. कुटुंबातल्या सदस्यांशी संवाद करण्यासाठी, संपर्क ठेवण्यासाठी त्याच्याकडं वेळ राहिला नाही. लग्नाच्या आणि कुटुंबाच्या कल्पना बदलल्या. कोणा एका कुटुंबप्रमुखाच्या नियंत्रणाखाली न राहता स्वतः स्वतंत्रपणे जगावं या गोष्टीला महत्त्व प्राप्त झालं. आपल्या सदस्यांचा विकास घर सोडल्यावरच होतो म्हणजे कुटुंबाला तडे गेल्यानंतरच होतो असा विचार पुढं आला. कुटुंबप्रमुख स्वतः हूनच आपल्या पाल्यांना घर सोडण्यास प्रोत्साहन देऊ लागले. सारं जगच स्थलांतर करतेय, तू इथे घरकोंबड्यासारखा राहून काय उपयोग, असा उपदेश पुढं आला. म्हणजे दिवसेंदिवस कुटुंब संकुचित होऊ लागलं. 'लिव इन रिलेशन'पर्यंत ते पोहोचलं. आता लग्न न करता एखाद्याला पती-पत्नीसारखं राहता येते. लग्न म्हणजे एक मूर्खपणा इथपर्यंत नवे जग पोहोचलं. एकसंध कुटुंब कटपिस बनले आणि काही कटपिस लयासही जाऊ लागली. भारतापुरतं बोलायचं तर आतापर्यंत पन्नास टक्के कुटुंबांना तडे गेले आहेत. बाकीची कुटुंबे याच छायेत आहेत. ●●●

पान ३९ वरून

## डॅशिंग राजकारणी मात्र साधी राहणी : ममता बॅनर्जी


लक्ष वळवण्यासाठी रचलेले नोटाबंदी हे नाटक असल्याचे टीकास्त्रही त्यांनी सोडले होते. एवढेच नाही तर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांनी, विरोधी युती केंद्रात सत्तेत आली तर निश्चलनीकरणाची चौकशी करण्याचे आणि नियोजन आयोग पुनर्प्रस्थापित करण्याचे आश्वासन दिले होते.

नुकतेच नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या अंबलबजावणीच्या अनुषंगाने त्यांनी घेतलेली भूमिका केंद्र सरकारला थेट विरोध करणारी होती. भाजपला बहुमत मिळालं याचा अर्थ, त्यांनी मनमानी करावी असे नाही. भाजपमध्ये हिंमत असेल तर त्यांनी सीएए आणि एनआरसी या दोन्ही कायद्यांबाबत संयुक्त राष्ट्राच्या देखरेखीखाली मतदान घ्यावं. त्यात ते अपयशी ठरले तर सत्ता सोडावी. आज अटल बिहारी वाजपेयी असते तर त्यांनी भाजपला राजधर्माची आठवण करून दिली असती, अशी टीका त्यांनी मोदी सरकारवर केली.

मुख्यमंत्रीपदाच्या दुसऱ्या टर्ममध्ये ममता बॅनर्जी यांनी अनेक वादग्रस्त निर्णय घेतले. दुपारी चारनंतर दुर्गा विसर्जन करण्यावर बंदी घालण्याच्या निर्णयाबद्दल बॅनर्जी सरकार मुस्लिमांचा अनुनय करण्याचं धोरण अवलंबल्याची टीका झाली. त्यांचा निर्णय फिरवताना कलकत्ता उच्च न्यायालयाने हा मुस्लिमांची खुशामत करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले होते. ममता बॅनर्जी यांनी मोदींबरोबरच केंद्रीय तपास संस्था सीबीआयशीही पंगा घेण्यास मागेपुढे पाहिले नाही. केंद्रातील नरेंद मोदी सरकार या केंद्रीय तपास संस्थेचा गैरवापर करीत असल्यामुळे राज्य सरकारांचा सीबीआयवरील विश्वास उडाल्याचा आरोप विरोधकांनी केल्यानंतर आंध्रप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी सीबीआयला राज्यात बंदी घातली. त्यापाठोपाठ ममता बॅनर्जी यांनीही सीबीआयला दिलेला सामान्य मान्यता आदेश नोव्हेंबर २०१८ मध्ये मागे घेतला.


**अनेक मानसन्मान :** २०१२ मध्ये टाइम मासिकाने जगातील अत्यंत प्रभावशाली १०० लोकांची जी यादी प्रसिद्ध केली होती, तीत ममता बॅनर्जी यांचा समावेश होता. ब्लूमबर्ग मार्केट्स या मासिकाने याच वर्षी प्रसिद्ध केलेल्या वित्तीय जगतातील ५० अतिप्रभावशाली व्यक्तींच्या यादीतही त्यांना स्थान देण्यात आले होते. २०१८ मध्ये स्कोच चिफ मिनिस्टर ऑफ दि इयर अवॉर्डने त्यांना सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर भुवनेश्वर येथील कलिंगा इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल टेक्नॉलॉजी या संस्थेकडून सन्माननीय डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. कलकत्ता विद्यापीठाने त्यांना डी.लिट. पदवीने सन्मानित केले. ●●●

# ग्रेट थॉट्स



मानवासाठी अनेक धर्म अस्तित्वात आले, पण धर्म सगळ्या मानवांसाठी का निर्माण झाला नाही.

– **महात्मा जोतिराव फुले** (आद्य समाजसुधारक)




इतरांच्या सेवेत स्वतःला हरवणे हाच स्वतःचा शोध घेण्याचा उत्कृष्ट मार्ग होय.

– **महात्मा गांधी** (भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी)

एखाद्याला हरविण्यापेक्षा एखाद्याला जिंकणे जास्त अवघड असते.

– **ए.पी.जे. अब्दुल कलाम** (माजी राष्ट्रपती)



प्रश्न विचारण्याचा अधिकार हा संपूर्ण मानवी प्रगतीचा आधार असतो.

– **इंदिरा गांधी** (भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान)





आपण बदलत्या काळाशी जुळवून घेतलेच पाहिजे आणि तरीही आपल्या तत्वाशी बांधील राहिले पाहिजे.

– **जिमी कार्टर** (अमेरिकेचे ३९ वे राष्ट्रपती)



सुरुवात कशी झाली यावर बऱ्याच घटनांचा शेवट अवलंबून असतो.

– **संत गाडगेबाबा** (ज्येष्ठ समाजसुधारक)


जगातली सर्वोत्कृष्ट वस्तू पाहिली जाऊ शकत नाही किंवा ऐकलीही जाऊ शकत नाही, पण मनापासून तिची जाणीव होत असतेच.

– **हेलन केलर** (कला शाखेत पदवी मिळवणारी पहिली बंधीर, अंध)



मुर्ख स्वतःला शहाणा समाजतो; परंतु शहाणा मात्र स्वतःला मुर्ख मानतो.


– **विल्यम शेक्सपिअर**





सर्व अवघड कामांमध्ये, सगळ्यात अवघड काम म्हणजे एक चांगला शिक्षक बनणे.

– **मॅगी गॅलाघर** (अमेरिकन लेखिका)



दृष्टिकोनाचा दुबळेपणाच चारित्र्य दुर्बल बनवत असते.

– **अल्बर्ट आईन्स्टाईन** (जर्मनीत जन्मलेला सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञ)

## हम देखेंगे

लाजिम है कि हम भी देखेंगे
वो दिन कि जिस का वादा है
जो लौह-ए-अजल में लिख्खा है
जब जुल्म-ओ-सितम के कोह-ए-गिराँ
रूई की तरह उड जाएँगे
हम महकूमों के पाँव-तले
जब धरती धड-धड धडकेगी
और अहल-ए-हकम के सर-ऊपर
जब बिजली कड-कड कडकेगी
जब अर्ज-ए-खुदा के काबे से
सब बुत उठवाए जाएँगे
हम अहल-ए-सफा मरदूद-ए-हरम
मसनद पे बिठाए जाएँगे
सब ताज उछाले जाएँगे
सब तख्त गिराए जाएँगे
बस नाम रहेगा अल्लाह का
जो गाएब भी है हाजिर भी
जो मंजर भी है नाजिर भी
उट्ठेगा अनल-हक का नारा
जो मैं भी हूँ और तुम भी हो
और राज करेगी खल्क-ए-खुदा
जो मैं भी हूँ और तुम भी हो

**- फैज**

## आटू दे हा भुकेचा झरा

तुम्ही उठवू नका आवया
देश महासत्ता झाल्याच्या
इथल्या तळा-तळात अजून
भूक नासत चालली आहे...

तुम्ही गप्पा मारता
मशाली पेटवता, विजयोत्सव साजरे करता
अणुबॉम्ब बनवले म्हणता
पाचशे-हजार किलोटन अण्वस्त्र टाकलं तर.
दोन-तीन सेकंदात
तीन-साडेतीन चौरस किलोमीटरची भूमी
मूल, फूलं, माणसं, झाडं, इथल्या माणसाच्या
संस्कृतीसह
भस्म होईल
असं छाती काढून अभिमानाने सांगता
इतकी प्रगती केली
तेवढं भूक बंद होण्याचं
संशोधन करा...

साली चिरंजीव आहे
हरामखोर आहे
रोज रोज जिवंतपणी जाळते
एका पोटातून दुसऱ्या पोटात
अमर होऊन फिरते
माणसाला हरामखोर बनवते
रक्ताशिवाय जगता येईल
असं तरी काही करा

नाही तर ठोका त्याच्या मेंदूत
जन्मतःच एक स्क्रू
त्याचा विचार बंद करा
मांजरीण खाते आपल्याच पिलांना
तसं माणसं माणसाला खाऊ द्या
काहीतरी करा
आटू द्या हा
भुकेचा झरा...

**- इंद्रजित घुले**

# कोण काय बोलत




**– अब्दुल नबी अल शोला** (बहारिनचे माजी मंत्री)

महात्मा गांधींचे विचार अजरामर आहेत. ते जगाने आचरणात आणण्याची गरज आहे.



**– उद्धव ठाकरे** (महाराष्ट्राचे मुख्यमंत्री)

अनुदान घेणाऱ्या शाळांमधून दर्जेदार शिक्षण दिले जाते का, हे अधिकाऱ्यांनी तपासावे.



**– बाळासाहेब थोरात** (काँग्रेस प्रदेशाध्यक्ष, राज्याचे महसूलमंत्री)

राज्यात काँग्रेस पक्ष मजबूत करण्यासाठी गाव तिथे काँग्रेस अभियान राबविणार.



**– वर्षा गायकवाड** (महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्री)

विद्यार्थ्यांमध्ये राजकीय विचार पसरविण्यासाठी विद्यार्थ्यांचा वापर टाळण्याच्या दृष्टीने शाळेत राजकीय कार्यक्रमांवर बंदी.



**– नितीशकुमार** (बिहारचे मुख्यमंत्री)

नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीजन्स (एनआरसी) बिहारमध्ये लागू करणार नाही. एनआरसी देशभरातही लागू करण्याची आवश्यकता नाही.




**– अरुणा रॉय** (माहिती अधिकार कायद्याच्या प्रणेत्या)

नागरिकत्वाच्या अधिकाराविषयीचा निर्णय घेण्याची ताकद संसदीय सदस्याच्या हातात देणे हीच लोकशाही आहे का?



**– रा.रं. बोराडे** (ज्येष्ठ साहित्यिक)

देशातील दहशतवादावर सगळेच बोलतात. साहित्यातील दहशतवादाबद्दल कोण बोलणार?



**– शत्रुघ्न सिन्हा** (ज्येष्ठ अभिनेते आणि वरिष्ठ काँग्रेस नेते)

एनआरसी, सीएए आणि एपीआर हे कायदे लादण्यासाठी भाजप देशात दबावाचे राजकारण करीत आहे.



**– लोकेश राहुल** (भारताचा सलामीवीर)

परिस्थितीनुसार धावा कशा काढायच्या, धावसंख्येला आकार कसा द्यायचा, याची कला आता मला चांगलीच अवगत झालीय.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460



With Best
Compliments from

AJIT CONSTRUCTION